



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, बुधवार ८ जूलै २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०


## नवी मुंबईत बेदरकारपणे कार चालवली

## 10 जणांना उडवले



## भीषण अपघातात एकाचा मृत्यू

**मुंबई/प्रतिनिधी :**मुंबईसह उपनगरात एकीकडे पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं असताना दुसरीकडे नवी मुंबईत अपघाताची भीषण दुर्घटना घडली आहे. येथील तळोजा सेक्टर १० मध्ये भीषण अपघात झाला असून कार चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने कारचालकाने ८ ते १० जणांना उडवले. या दुर्घटनेत एकाचा मृत्यू झाला असून ८ जण जखमी आहेत. जखमींना खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं असून काहींची प्रकृती स्थिर असल्याचे समजते. तळोजातील येथील कार अपघातात नदीम खान (वय ३५ वर्षे) यांचा मृत्यू झाल्याची माहिती असून अपघाताच्या घटनेनंतर स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेत पोलिसांनाही घटनेची माहिती दिली. दरम्यान, अपघातानंतर कारचालक गाडी सोडून घटनास्थळावरुन फरार झाल्याची माहिती आहे. याप्रकरणी, पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून अधिक तपास सुरू आहे. अपघातात अनेक वाहनांचे नुकसान झाले असून एका रिक्षाचा चेंदामेंदा झाल्याचं दिसून येत आहे.

# देशातील 58 इंजिनीअरिंग महाविद्यालयांना कुलूप

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**एक काळ असा होता की जेव्हा मुलाने कसेही करून एकदा इंजिनीअरिंग कॉलेजची पायरी ओलांडली की त्याचे भविष्य सुरक्षित झाले, असे स्वप्न आई-वडील पाहायचे. मात्र, आता परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या ताज्या आकडेवारीनुसार, देशातील इंजिनीअरिंगच्या ब-याच क?लेजला आता कुलूप लागत असल्याचे समोर आले आहे. या वर्षी देशभरातील एकूण ५८ इंजिनीअरिंग आणि तंत्रशिक्षण महाविद्यालये बंद झाली आहेत. यामध्ये सर्वात वाईट अवस्था महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशची असून इथे सर्वाधिक कालेज बंद करण्यात आले आहेत. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ दरम्यान देशभरातील ५८ इंजिनीअरिंग आणि तंत्रशिक्षण संस्थांना प्रोग्रेसिव्ह क्लोजर म्हणजेच संस्था बंद करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. याचा अर्थ असा की, ही कॉलेजेस आता पहिल्या वर्षासाठी नवीन विद्यार्थ्यांचे प्रवेश घेउ शकणार नाहीत. मात्र, जे विद्यार्थी आधीपासूनच तिथे शिकत आहेत, त्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण करता येईल. याशिवाय, विविध कालेजमध्ये चालणारे सुमारे ९५० हून अधिक अभ्यासक्रमही पूर्णपणे बंद



करण्यात आले आहेत.

**कॉलेज बंद होण्यामागची मुख्य कारणे-** यामागे विद्यार्थ्यांनी इंजिनीअरिंगकडे पाठ फिरवली असे नसून, यामागे काही गंभीर कारणे आहेत. या महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांच्या जागा मोकळ्या राहत होत्या. वर्गखोल्याच रिकाम्या राहिल्यावर महाविद्यालयांचा खर्च भागवणे अशक्य झाले होते. या संस्थांकडे विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञान शिकवू शकतील असे तज्ज्ञ प्राध्यापक आणि मार्गदर्शकच नव्हते. तसेच अनेक महाविद्यालयांकडे ना काम्प्युटर लॅब होत्या, ना पायाभूत सुविधा. केवळ कागदावर आणि मोठ्या इमारतींमध्ये चालणा-या या महाविद्यालयांमध्ये प्रात्यक्षिक शिक्षण मिळत नव्हते. त्यामुळे इथून पदवी घेउन बाहेर पडणा-या तरुणांना साधी नोकरी मिळणेही कठीण झाले होते. त्यांच्याकडे फक्तपदवी होती, कोणतेही कौशल्य नव्हते.

**एआयचा काळ आणि जुना अभ्यासक्रम-** सध्या तंत्रज्ञान क्षेत्रात आर्टिफिशियल इंटेलिजन्स आल्यामुळे साफटवेअर डेव्हलपमेंट, कोडिंग आणि आयटी क्षेत्राचे स्वरूप बदलले आहे. ज्या इंजिनीअरला कोडिंगसाठी बराच वेळ लागायचा ते आता एआय टूल्स वापरुन काही सेकंदांत करतात. त्यामुळे कंपन्यांना आता एआय टूल्स व्यवस्थापित करू शकणा-या आणि चौकस विचार करू शकणा-या इंजिनीअर्सची गरज आहे.

### 950 पेक्षा जास्त अभ्यासक्रम बंद

एआयसीटीईच्या अधिका-यांच्या मते, ही कारवाई केवळ कॉलेज बंद करण्यापुरती मर्यादित नाही. याच दरम्यान देशभरातील विविध तांत्रिक संस्थांमध्ये सुरू असलेले ९५० हून अधिक अभ्यासक्रम (Technical and Engineering Courses) देखील कायमस्वरूपी बंद करण्यात आले आहेत. ज्या अभ्यासक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना रस नव्हता किंवा ज्यांना चालवण्यासाठी कॉलेजकडे योग्य संसाधने नव्हती, त्यांना यादीतून वगळण्यात आले आहे. एआयसीटीई ही भारतात तांत्रिक शिक्षणासाठी वैधानिक सल्लागार संस्था आणि नियामक आहे. ही अभियांत्रिकी, वास्तुकला, व्यवस्थापन आणि फार्मसीच्या कार्यक्रमांवर देखरेख करते. AICTE कमी विद्यार्थ्यांचे प्रवेश, आवश्यक संख्येने शिक्षक टिकवून ठेवण्यात असमर्थता, पायाभूत सुविधा आणि परिचालन म-ानकांचे पालन न करणे इत्यादी अनेक कारणांमुळे संस्था बंद करण्याचे आदेश देते.

| राज्य | बंद कॉलेज |
|---|---|
| महाराष्ट्र | 12 |
| उत्तर प्रदेश | 12 |
| मध्यप्रदेश | 8 |
| तेलंगणा | 4 |
| पंजाब | 4 |
| आंधप्रदेश | 3 |
| राजस्थान | 3 |
| गुजरात | 2 |
| कर्नाटक | 2 |
| तामिळनाडू | 2 |
| हरियाण | 1 |
| ओडीशा | 1 |
| उत्तराखंड | 1 |
| पश्चिम बंगाल | 1 |
| एकुण | 58 |

## डीएसपीकडे 300 कोटींची मालमत्ता सापडली

***हैदराबाद-*** *तेलंगणामध्ये एका पोलीस अधिका-याकडे कोट्यवधी रुपयांची बेनामी मालमत्ता सापडली आहे. सोमवारी संध्याकाळी त्यांना उत्पन्नापेक्षा अधिक मालमत्ता असल्याच्या प्रकरणात अटक करण्यात आली. आरोपीची ओळख संकीरेड्डी भीम रेड्डी अशी झाली आहे. भीम रेड्डी हैदराबादमधील पोलीस काम्प्युटर सर्विहसेसमध्ये पोलीस उपअधीक्षक (डिप्टी सुपरिटेंडेंट ऑफ पुलिस) पदावर कार्यरत आहेत. तपासात असे समोर आले आहे की, रेड्डीने तेलंगणा आणि कर्नाटकमध्ये आपल्या नातेवाईक, मित्र, कथित बेनामीदार आणि सहका-यांच्या नावावर कोट्यवधींची मालमत्ता खरेदी केली होती.*

## वाहनचालक परवान्यासाठी 1 ऑगस्टपासून महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र अनिवार्य

**मुंबई / प्रतिनिधी-**राज्यात वाहनचालक परवाना मिळविण्यासाठी १ ऑगस्ट २०२६ पासून नवीन नियमावली लागू करण्यात येणार असून त्यानुसार महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र अनिवार्य करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात दिली. विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सदस्य दिलीप लांडे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री सरनाईक बोलत होते. मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, ड्रायव्हिंग परवाना नवीन नियमावलीचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला असून मंजुरीनंतर त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

त्याचबरोबर राज्यात सुरू असलेल्या अनधिकृत बाईक टॅक्सी सेवांवर दंडात्मक कारवाई सुरू आहे. या क्षेत्राचे नियमन करून राज्याला महसूल मिळावा आणि तरुण-तरुणींना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने शासन नियोजन करत आहे.



या नव्या व्यवस्थेनुसार बाईक टॅक्सी चालकांकडून दररोज पाच रुपये महसूल जमा करण्यात येणार आहे. प्रत्येक राईडमागे दोन रुपये कल्याण निधीसाठी जमा करणे बंधनकारक करण्याचा प्रस्ताव आहे; तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणारे किंवा चुकीच्या पद्धतीने वाहन चालविणा-यांवर परिवहन विभागाकडून कठोर दंडात्मक कारवाई केली जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र बाईक टॅक्सी नियमांमध्ये महिला, विद्यार्थी आणि अल्पवयीन प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. बाईक टॅक्सी चालकाकडे मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ३ नुसार वैध वाहनचालक परवाना; तसेच महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ४ नुसार सार्वजनिक सेवा वाहन चालविण्याचे अधिकारपत्र (बॅज) असणे बंधनकारक करण्यात आले आहे. हा बॅज देण्यापूर्वी अर्जदाराची पोलिस विभागामार्फत चारित्र्य पडताळणी करण्याचीही तरतूद करण्यात आली आहे.

## वृद्ध महिलेवर बलात्कार करून हत्या


**नागपूर/ प्रतिनिधी-**नागपूरमध्ये वृद्ध महिलेवर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली. नागपूर जिल्ह्यातील पाटणसावंगी येथे ही घटना घडली. आरोपीने वृद्ध महिलेवर आधी बलात्कार केला. त्यानंतर अमानुष मारहाण करत तिला संपवण्यात आले. या प्रकरणाचा ९ दिवसांनंतर उलगडा झाला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल करत त्याला अटक केली. या घटनेमुळे नागपूरमध्ये खळबळ उडाली. नागपूर जिल्ह्यातील पाटणसावंगी येथे वृद्ध महिलेवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली होती. ९ दिवसांनंतर या हत्याकांडाची घटना समोर आली. घटनेचा तपास करून आरोपीला बेड्या ठोकण्यात सावनेर पोलिस आणि गुन्हे शाखेच्या पथकाला यश आले. बलात्कार करून तिची हत्या करणा-या आरोपीला एलसीबीच्या पथकाने बोखारा येथून ताब्यात घेतले. तांत्रिक पुरावे आणि चौकशीनंतर आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. गंगाबाई असे मृत महिलेच्या हातावर गोंदलेले नाव आहे. मात्र तिची वास्तविक ओळख अद्याप पटली नाही.

## 38 दहशतवाद्यांची फाशी कायम


### अहमदाबाद साखळी बाम्बस्फोट प्रकरण :

### गुजरात हायकोर्टाचा मोठा निर्णय; 70 मिनिटांत झाले होते 21 ब्लास्ट!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** २००८ च्या अहमदाबाद साखळी बाम्बस्फोट प्रकरणी मंगळवारी गुजरात उच्च न्यायालयाने अत्यंत महत्वाचा निर्णय सुनावला. विशेष न्यायालयाच्या आदेशावर शिक्कामोर्तब करत उच्च न्यायालयाने ३८ दहशतवाद्यांची फाशी आणि ११ जणांची जन्मठेप कायम ठेवली आहे. एवढेच नाही तर, या स्फोटांमध्ये मरण पावलेल्या एकूण ५६ जणांच्या नातलगांना प्रत्येकी १० लाख रुपये, तर २०० हून अधिक जखमींना प्रत्येकी १ लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेशही न्यायालयाने यावेळी दिले आहेत. अहमदाबाद येथे २६ जुलै २००८ रोजी, केवळ ७० मिनिटांत एकापाठोपाठ एक असे तब्बल २१ बाम्बस्फोट झाले होते. रुग्णालये, बसेस, सार्वजनिक ठिकाणे आणि बाजारपेठांना करण्यात आलं होतं लक्ष्य -हल्लेखोर दहशतवाद्यांनी नरोदा, बापूनगर, सरखेज आणि हटकेश्वर आदी गजबजलेल्या भागांमध्ये हे स्फोट घडवून आणले होते. यासाठी दहशतवाद्यांनी सायकल आणि टिफिन बाक्सचा वापर केला होता. त्यांनी सायकलवर टिफिन बाक्समध्ये बाम्ब पेरून, रुग्णालये, बसेस, सार्वजनिक ठिकाणे आणि बाजारपेठांना लक्ष्य केले होते. सुरुवातीच्या स्फोटांनंतर साधारणपणे ४० मिनिटांच्या अंतराने दोन वेगवेगळया रुग्णालयांच्या आवारात स्फोट घडवून आणण्यात आले होते.या घटनेच्या १४ वर्षांनंतर अर्थात २०२२ मध्ये सत्र न्यायालयाने ३८ दहशतवाद्यांना फाशी आणि ११ जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. न्यायालयाने हे प्रकरण 'दुर्मिळातील दुर्मिळ' असल्याचे म्हटले होते. एकाच प्रकरणात एवढ्या मोठ्या संख्येने आरोपींना फाशीची शिक्षा सुनावण्याची ही पहिलीच वेळ होती. या विरोधात दोषींनी उच्च न्यायालयात अपील केले होते, तर राज्य सरकारनेही त्यांच्या फाशीच्या शिक्षेला मंजुरी देण्यासाठी याचिका दाखल केली होती. कायद्यानुसार फाशीच्या शिक्षेसाठी साठी उच्च न्यायालयाची मंजुरी आवश्यक असते.



## लोणावळ्यात रिसॉर्ट परिसरात भूस्खलन, दरड कोसळून दोघे अडकले



**पुणे/प्रतिनिधी :** राज्यातील मुसळधार पावसामुळे अनेक जिल्ह्यात जनजीवन विस्कळीत झाले असून काही ठिकाणी पुराच्या घटनाही घडल्या आहेत. तर, काही ठिकाणी झाडपडी, घर कोसळण्याचे प्रकार समोर आले आहेत, लोणावळा घाटात दरडी कोसळल्याच्याही घटना समोर आल्या आहेत. त्यातच, लोणावळा येथील नार्थ पाइंट आणि थ्री सिक्सटी रिसार्ट परिसरात आज अचानक भीषण भूस्खलन झाल्याची धक्कादायक घटना घडली. या दुर्घटनेत दोन व्यक्ती ढिगा-याखाली अडकल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.

घटनेची माहिती मिळताच प्रशासनाचे मदत पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले असून, एसडीओ महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली शोध व बचावकार्य युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे. मातीचा ढिगारा बाजूला करून अडकलेल्या नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले जात आहेत. त्यातच, पुण्याच्या जिल्हाधिका-यांनी लोणावळ्यातील पर्यटनस्थळी कलम १६३ लागू केले आहे. त्यामुळे, पर्यटनस्थळी काही निर्बंध घालण्यात आले आहेत. दरम्यान, मुख्यमंत्र देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या मुंबई-पुणे कनेक्टींग लिंकवर देखील दरड कोसळल्याची घटना घडली होती. त्यानंतर, प्रशासनाने तातडीने कार्यवाही करत ती दरड हटविण्याचे काम केले. मात्र, २४ तास येथील वाहतूक बंद झाली होती.

**मुंबई-गोवा महामार्गावरही दरड कोसळली-** मुंबई-गोवा महामार्गावरील लोटे येथे वाहतूक पोलीस चौकीसमोर डोंगरावरील दरडीचा भाग कोसळला. मुसळधार पावसामुळे डोंगरातील मोठे दगड, माती आणि झाडे कोसळल्याने भूसखलनाचा धोका वाढला. गोव्याकडे जाणारी वाहतूक पोलिसांनी बंद करून दुस-या लेनने सुरू केली आहे. मात्र, दरडी कोसळत असल्याने मातीचा मोठा ढीग रस्त्यावर कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे.

## वायनाड भूस्खलनात तिघांचा मृत्यू, 7 बेपत्ता



**बंगळुरू/वृत्तसंस्था :** केरळमध्ये खासदार प्रियांका गांधी यांच्या वायनाड मतदारसंघात भूस्खलनाची भयावह घटना घडली आहे. मेप्पाडीजवळील कल्लाडी येथे अचानक भूस्खलन झाल्याने (दरड कोसळल्याने) तीन जणांचा मृत्यू झाला तर ७ जण बेपत्ता असल्याचे समजते. ही दुर्घटना वायनाड बोगदा प्रकल्प परिसरात घडली. दुर्घटनेची सीसीटीव्ही फुटेजही आता समोर आले आहे.

**२४ तासांत या परिसरात २६५ मिमी पावसाची नोंद -** कल्लाडी बोगदा बांधकाम ठिकाणी खोदकामादरम्यान जमा झालेला ढिगारा अचानक खाली घसरल्याने रस्ते बंद झाले आहेत. या ढिगा-याखाली आल्याने ५ जण जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असल्याचे समजते. तर दोघांना वाचवण्यात यश आले आहे. सध्या ७ जण बेपत्ता असून त्यांचा शोध सुरू असल्याचे सांगण्यात येते. महत्वाचे म्हणजे, गेल्या २४ तासांत या परिसरात २६५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. पावसामुळे या प्रकल्पाचे काम कालपासून बंद होते. मात्र जे लोक परिसरात फिरत होते, ते या दुर्घटनेच्या तडाख्यात सापडले.

**काही लोक ढिगा-याखाली अडकल्याची भीती, बचावकार्य सुरू** - केरळ राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने (KSDMA) दिलेल्या माहितीनुसार, काही लोक ढिगा-याखाली अडकल्याची भीती आहे. मीनाक्षी पुलाजवळ ही दुर्घटना घडली. या दुर्घटनेत एक चर्च, एक चहाचे दुकान आणि बस स्थानक ढिगा-याखाली गाडले गेले आहे. घटनास्थळी वायनाड-मलप्पुरम बोगदा रस्ता प्रकल्पाचे काम सुरू होते. अग्निशामक दल, बचाव दल, पोलीस तसेच राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या (NDRF) तुकड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून युद्धपातळीवर बचावकार्य सुरू आहे. केंद्रीय राज्यमंत्री सुरेश गोपी यांनी परिस्थिती पूर्णपणे राज्य सरकारच्या नियंत्रणात असल्याचे सांगितले आहे. तसेच, जर त्यांना अधिक मनुष्यबळ अथव तज्ज्ञांची गरज भासल्यास, पुरवली जाईल. ही सेवा अथवा मदत नाही. ही आमची जबाबदारी आहे.'यासंदर्भात बोलताना खासदार प्रियांका गांधी म्हणाल्या, अडकलेल्या लोकांना वाचवण्यासाठी प्रशासन, एनडीआरएफ, एसडीआरएफ (SDRF), नागरी संरक्षण दल आणि स्थानिक पदाधिकारी सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत.

## नाशिककरांवरील 'ढगफुटी'चे संकट टळले!

**नाशिक/ प्रतिनिधी-** हवामान खात्याने नाशिक शहर आणि त्र्यंबकेश्वर परिसरात तब्बल ३५० मिलीमीटर पावसाचा, म्हणजेच ढगफुटीचा धडकी भरवणारा इशारा दिला होता. मात्र, पालघरमध्ये हाहाकार उडवणारा पावसाचा भोवरा ऐनवेळी नाशिकच्या वेशीवरून उत्तरेकडे गुजरातच्या सुरतच्या दिशेने आणि दक्षिणेकडे अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले परिसराकडे सरकला आहे. पालघर जिल्ह्यात तब्बल ४५० मिमी पावसाची नोंद करणारा हवामानातील तोच भोवरा सोमवारी रात्री त्र्यंबकेश्वर-नाशिक मार्गे सरकण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला होता. यामुळे नाशिकमध्ये हाय अलर्ट जारी करण्यात आला होता. सोमवारी रात्रभर पावसाने शहरात जोरदार हजेरीही लावली. मात्र, मंगळवारी सकाळी हवामानाच्या स्थितीत मोठा बदल झाला. हा भोवरा नाशिककडे न येता उत्तरेकडे गुजरातच्या सुरतच्या दिशेने आणि दक्षिणेकडे अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले परिसराकडे सरकला आहे. यामुळे नाशिक आणि त्र्यंबकेश्वर वरील ढगफुटीचा धोका ब-याच अंशी कमी झाला आहे.राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाची संततधार सुरूच असून हवामान विभागाने आज अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, बीड, परभणी, जालना, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांत मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

**घाटमाथ्यावर अद्यापही धोक्याचा इशारा-** शहरावरील संकट टळले असले तरी, आणि मंगळवारी सकाळी नाशिक शहरात पावसाने थोडी विश्रांती घेतली असली तरी घाटमाथ्यावरील परिस्थिती अद्यापही गंभीर आहे. इगतपुरी, कसारा आणि त्र्यंबकेश्वर भागात मुसळधार पाउस सतत कोसळत आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांनी आणि विशेषतः पर्यटकांनी विनाकारण घराबाहेर किंवा धबधब्यांच्या ठिकाणी जाउ नये, असे कडक आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.



## आजपासून राज्यातील बहुतांश भागांमध्ये पावसात घट

**पुणे/प्रतिनिधी :**जुलै महिन्याच्या सुरुवातीला मुंबईसह पश्चिम महाराष्ट्रात अतिवृष्टी झाली असली तरी राज्यातील विविध भागांमध्ये आतापर्यंत सरासरी पेक्षा कमी पाउस झाला आहे. विशेषतः खानदेश (धुळे व नंदुरबार), मध्य महाराष्ट्र (अहिल्यानगर व सोलापूर), पश्चिम विदर्भ आणि मराठवाड्यातील काही भागांमध्ये पावसाचे प्रमाण कमी आहे. ८ जुलैपासून राज्यातील बहुतांश भागांमध्ये पावसाच्या प्रमाणात लक्षणीय घट होण्याचा अंदाज असून, ही परिस्थिती किमान पुढील १० दिवस कायम राहण्याची शक्यता आहे. या दरम्यान राज्यातील विविध भागांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाउस अपेक्षित आहे. तसेच राज्यातील कमाल तापमानात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हवामान विभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार जुलै महिन्याच्या दुस-या पंधरवड्यात पहिल्या पंधरवड्याच्या तुलनेत पावसाचे प्रमाण अत्यल्प राहू शकते. दरम्यान, शेतक-यांनी हवामानाच्या या स्थितीनुसार शेतीचे नियोजन करावे. राज्यातील ज्या भागांमध्ये अद्याप समाधानकारक पाउस झालेला नाही, तेथील शेतक-यांनी जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण झाल्याशिवाय पेरणीची घाई करू नये, असे आवाहन राज्याच्या कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

## धावत्या ट्रेनमध्ये महिलांचा विनयभंग

### तक्रार करूनही पोलिसांची मदत नाही

**नागपूर / प्रतिनिधी-**देवदर्शन करून उत्तर प्रदेशातील वाराणसीहून नागपूरकडे परतणा-या नागपूरमधील एका कुटुंबातील काही महिलांचा दानापूर-सिकंदराबाद एक्सप्रेसमध्ये प्रवासादरम्यान विनयभंग करण्यात आला. संतापजनक म्हणजे महिलांनी तक्रार करूनही पोलिसांनी तात्काळ कारवाई केली नसल्याचे म्हटले जात आहे. दरम्यान या घटनेने प्रवाशांकडून संताप व्यक्त केला जात आहे.मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित महिला आपल्या कुटुंबीयांसह वाराणसी येथून नागपूरकडे परतत होत्या. त्यांची बुकिंग असल्याने त्या रिझर्व्हेशन डब्यातून प्रवास करत होत्या. मात्र, गाडी सुटल्यानंतर डब्यात क्षमतेपेक्षा जास्त गर्दी झाल्याचे त्यांनी सांगितले. आरक्षित डब्यात मोठ्या प्रमाणात विनातिकीट प्रवासी शिरल्याने प्रवाशांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागला. महिलांच्या आरोपानुसार, गर्दीचा फायदा घेत काही प्रवाशांनी धक्काबुक्की केली, अश्लील शेरेबाजी केली तसेच विनयभंग केला.या प्रकारामुळे महिला आणि त्यांच्या कुटुंबीयांना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागला. परिस्थिती गंभीर होत असल्याचे लक्षात आल्यान्तर त्यांनी रेल्वे हेल्पलाइन १३९ वर संपर्क साधला. मात्र, तत्काळ आणि प्रभावी मदत मिळाली नसल्याचा दावा पीडित महिलांनी केला आहे.




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# डॉक्टर्स डे व सी.ए. डे निमित्त मान्यवरांचा सत्कार

**अमरावती/प्रतिनिधीः-**
लायन्स क्लब अमरावती रियल तसेच लॉयन क्लब अमरावती रियल सफायर यांच्या वतीने डॉक्टर्स डे व सी.ए. डे निमित्त जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, अमरावती येथे एका दिमाखदार सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात अमरावती विभागाचे प्रादेशिक सहआयुक्त डॉ. यसूदेव वंजारी, सहाय्यक आयुक्त डॉ. पुरुषोत्तम सोलंके, पशुधन विकास अधिकारी डॉ. मिलिंद काळे, डॉ. नितीन पाटणे, डॉ.संतोष भोसले, डॉ. वैभव सानप तसेच प्रख्यात




बालरोगतज्ज्ञ डॉ. सतीश तिवारी व तरुण स्त्री शक्तीच्या प्रतिनिधित्व डॉ.तेजवानी यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

तसेच सी.ए. डे निमित्त ज्येष्ठ सनदी लेखापाल सी.ए. विजय जाधव यांचाही शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी समाजाच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्याची लायन्स क्लबची परंपरा कौतुकास्पद असल्याचे सांगत, अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक प्रेरणा निर्माण होत असल्याचे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे आयोजन लायन क्लब अमरावती रियल चे डॉ. दीपक कऱ्हे (अध्यक्ष) यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीरीत्या पार पडले. कार्यक्रमास लायन श्याम जाडिया (सचिव), लायन गौरव कोटवानी (कोषाध्यक्ष) त्याचप्रमाणे लायन क्लब अमरावती रियल सफायर चे नेहा हरेश उदासी (अध्यक्ष), योगिता चेतन पटेल (सचिव) कशिश राजा किंगराणी (कोषाध्यक्ष) उपस्थित होते तसेच लॉयन दिनेश अग्रवाल, लायन राजा किंगराणी, लायन हेमंत वालचाळे, लॉयन सोहेल टॉपर, लायन हरीश उदासी ,लायन चंद्रदत्त मिश्रा, लायन मनोज मिश्रा, लायन जितेंद्र झा, लायन ज्योती कऱ्हे, लायन गीता मिश्रा,लायन रितू जय तेजवानी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## १ व १० वरिल उर्वरित

### जुन्या वादात तरूणावर चाकूने

जखमींना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार त्यांची प्रकृती गंभीर आहे. सुनील लौदासे यांनी आपला मुलगा चेतन लौदासे आणि अमिश लौदासे यांना घटनेची वस्तुस्थिती सांगितली.चेतन लौदासे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आणि आरोपी अविनाश मेश्राम याला ताब्यात घेतले. इतर आरोपींचा शोध घेतला जात आहे. घटनेची माहिती मिळताच बडनेरा पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. पोलिस ठाणे प्रभारी यांच्या मार्गदर्शनाखाली डिबी टीमने तांत्रिक माहिती आणि खबऱ्यांच्या मदतीने काही तासांतच आरोपी अविनाश अशोकराव मेश्राम याला अटक केली. या कारवाईत डीबी पथकाचे सुधीर पढके, निलेश गुल्हाने, वचन पंडित, मोहम्मद समीर आणि रितेश चव्हाण यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून हल्ल्याचे कारण आणि इतर मुद्द्यांचा तपास सुरू केला आहे. घटनेनंतर गावात काही काळ तणावाचे वातावरण होते, मात्र पोलिसांच्या तातडीच्या कारवाईमुळे परिस्थिती नियंत्रणात आहे.

### नागरिकांना सेवा विहित कालावधीत

करण्यात यावी. सेवा हक्क हमी कायद्याच्या अंमलबजावणीबाबत दर तीन महिन्यांनी आढावा घेण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्हा आणि कार्यालय पातळीवर सेवांच्या कालवधीची अंतिम मुदत लक्षा घेऊन अर्ज निकाली काढण्यात यावेत, अशा सूचनाही डोंगरे यांनी दिल्या.

### नमुना गल्लीतील विद्यार्थिनींच्या

यावेळी खोलीतील दोन एलपीजी सिलेंडर सुरक्षित बाहेर काढून त्यांचे रेग्युलेटर बंद करण्यात आले. त्यामुळे स्फोटाचा धोका टळून शेजारील घरे सुरक्षित राहिली. आगीत विद्यार्थिनींची शैक्षणिक पुस्तके, गॅस शेगडी, मिक्सर, पंखा तसेच अन्य घरगुती साहित्य जळून खाक झाले. प्राथमिक अंदाजानुसार सुमारे ७० ते ८० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच सिटी कोतवाली पोलिस, महावितरणचे कर्मचारी आणि स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली होती. अग्निशमन दलाच्या वेळेवर झालेल्या हस्तक्षेपामुळे आग इतर घरांपर्यंत पसरण्यापूर्वीच नियंत्रणात आली आणि मोठी दुर्घटना टळली.

आगीमुळे संपूर्ण खोली धुराने भरून गेली असतानाही अग्निशमन कर्मचाऱ्यांनी जीवाची पर्वा न करता आत प्रवेश केला. वेळेवर सिलेंडर बाहेर काढण्यात यश आल्याने संभाव्य स्फोटाचा धोका टळला. परिसरातील नागरिकांनी अग्निशमन दलाच्या तत्पर कामगिरीचे कौतुक केले.

### बँकेतून पैसे काढणारे टार्गेट,

विक्रम सिंग सिसोदिया (वय २५, रा. कडीया पोस्ट पिपरीया, तहसील पचोर, जिल्हा - राजगड, मध्यप्रदेश) असे अटक आरोपीचे नाव आहे. माहितीनुसार सोमवार ६ जुलै रोजी परिमल विजय पुरी, (रा. अभिनव कॉलनी अचलपूर) यांनी अचलपूर येथील एसबीआय मुख्य शाखांमधून १ लाख २० रुपये हजार काढले होते. ते पैसे त्यांनी मोपेडच्या डिक्कीत ठेवले होते. आरोपींनी त्यांचा पाठलाग करून परतवाडा येथील मिल कॉलनी स्टॉप वरून त्यांच्या गाडीच्या डिक्कीतून संपूर्ण रक्कम लंपास केली. या प्रकरणी त्यांनी परतवाडा ठाण्यात तक्रार दिली होती. पोलिसांनी नाकाबंदी करून तपास सुरू केला आणि परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. सदर गुन्ह्याचा तपास करताना अंजनगाव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला अंजनगाव येथील एसबीआय बँकेच्या शाखेत एक संशयित इसम आढळून आला. त्याने आपले नाव बाबू विक्रम सिंह सिसोदिया (वय २५,कडीया पोस्ट पिपरीया, तहसील पचोर, जिल्हा - राजगड, मध्यप्रदेश) असे सांगितले.चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याने आपले साथीदार शिवराज सोनू सांसी रा. हुलखेडी, पचोर आणि वसंत बनवारी सांसी रा. कडीया, पचोर यांच्यासह मिळून चोरी केल्याचे सांगितले. आरोपीला पुढील तपासासाठी परतवाडा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. त्याच्याकडून चोरीतील ९० हजार रुपये जप्त करण्यात आले. इतर दोन फरार आरोपींचा आणि उर्वरित रकमेचा शोध परतवाडा पोलीस घेत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी माधवराव गरूड यांच्या मार्गदर्शनाखाली अंजनगावचे ठाणेदार सुरज बोंडे, परतवाडा चे ठाणेदार अजय आकरे यांच्या नेतृत्वात निरीक्षक आकाश शिवणकर, सचिन होले, सुधीर राऊत, शुभम शर्मा, सचिन कोकणे, घनश्याम किरोले, जितेश बांबील, रवी राठोड, शुभम मार्कंड, आकाश रंगारी, अमित घाटे यांनी केली.

### ऑनलाइन चक्री जुगारावर गुन्हे

☞(पान २ वर)अवैध धंद्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वाखालील पथकाला यशोदा नगर क्रमांक १, गल्ली क्रमांक २ येथील एका दुकानात ‘फन टार्गेट’ व ‘गोल्डन चान्स’ या वेबसाइटच्या माध्यमातून ऑनलाइन चक्री जुगार सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला. त्यावेळी संगणकाच्या स्क्रीनवर ऑनलाइन गेमवर पैशांची देवाणघेवाण करून जुगार खेळला जात असल्याचे आढळून आले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत दोघांना ताब्यात घेतले. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींची नावे सुरज उर्फ भुर्या बबन ढोके (वय १९, रा. यशोदा नगर, अमरावती) व निलेश किसन थोरात (वय २१, रा. चव्हरे नगर, अमरावती) अशी आहेत. आरोपींकडून रोख रक्कम, ऑनलाइन जुगारासाठी वापरण्यात येणारे साहित्य असा एकूण १४,३८० चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ४ व ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, श्याम घुगे, प्रांजली सोनवणे तसेच सहायक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पोलीस निरीक्षक अतुल वर, पोलीस निरीक्षक दिनेश दाहातोंडे यांच्यासह गुन्हे शाखेच्या पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

### लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये

ती ८ महिन्यांची गर्भवती असल्याचे सांगितल्यावर नांदगाव पेठ पोलिसांना याबाबत माहिती देण्यात आली.पोलिसांनी रुग्णालयात जाऊन पीडितेचा जबाब नोंदवला. तिने सांगितले की, डिसेंबर २०२५ मध्ये तिला गर्भवती असल्याचे समजले. त्यानंतर ३ जुलै रोजी पोटदुखी झाल्याने तिला रुग्णालयात भरती करण्यात आले.तपासात समोर आले की, शहरातील २१ वर्षीय राज नावक युवकाशी पीडितेचे प्रेमसंबंधात होते. दोघे पती-पत्नीप्रमाणे एकत्र राहत होते. याच दरम्यान त्यांच्यात अनेकदा शारीरिक संबंध झाले. घटना घडली तेव्हा पीडित अल्पवयीन होती.लिव्ह-इनमध्ये राहत असताना तिचे शारीरिक शोषण करण्यात आले. पीडितेच्या बयानावरून नांदगाव पेठ पोलिसांनी कलम ६४ (२) आणि पोक्सो कलम ४ व ६ नुसार आरोपी राज याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### नालसाबपुरात गोवंशाच्या हत्येचा

या घटनेची माहिती हिंदू हुंकार संघटनेने पोलिसांना दिली.पोलिसांनी तपास करून घटनास्थळी पंचनामा केला. यात मांसाचे तुकडे आणि अवशेष आढळून आले. याप्रकरणी सैय्यद अय्युब सैय्यद महेबूब (वय ५०, रा. नालसाबपुरा) याला बीएनएस व प्राणी संरक्षण कायद्यानुसार अटक करण्यात आली आहे. त्याचा मुलगा सैय्यद तनवीर सैय्यद अय्युब हा फरार असून त्याचा शोध सुरू आहे. या संदर्भात हिंदू हुंकार संघटनेचे अध्यक्ष सुधीर बोपुळकर यांनी ठाणेदार सीमा दाताळकर यांना निवेदन देऊन माहिती दिली होती की यापूर्वीही साबणपुरा परिसरात एका कंटेनर मध्ये एक गोवंशीय वासराचे कापलेले डोकं आढळले होते. या प्रकरणात कुणाविरुद्धही कार्यवाही झाली नव्हती. गोवंश हत्या प्रतिबंधक कायदा लागू असल्यावरही गोवंशाची कत्तल करण्यात येत आहे आणि गोमांस विकले जात आहे. सोशल मीडियावर वायरल झालेली व्हिडिओ क्लिप त्यांना दाखवण्यात आली आहे. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळाचे निरीक्षण केले आणि आरोपी सय्यद अयुब यांच्या घरातील समोरील भागांमधून गोमांस चे तुकडे जप्त केले आहे. फरार आरोपी सय्यद तनवीर याचा शोध सुरू आहे.

### मूर्तिकाराची ६.७० लाखांनी फसव

होते. हा मेसेज पाहताच सूरज रोकडे यांच्या पायाखालची जमीन सरकली. ते तात्काळ बँकेत गेले, मात्र बँक बंद होती. दुसऱ्या दिवशी बँकेत जाऊन त्यांनी खात्यातून पैसे काढल्याची खात्री केली.त्यांनी तात्काळ बँक मॅनेजरला याबद्दल माहिती दिली. मॅनेजरने त्यांची शेष रक्कम होल्ड ठेवली.यानंतर सूरज रोकडे यांनी चांदूर बाजार पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलिसांनी त्यांच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपी विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला असून ऑनलाइन व्यवहारांचा आणि मेसेजचा तपास सुरू केला आहे.

### बांबु गार्डन येथे अत्याधुनिक

तातडीने उपचार करण्यासाठी कोणतीही आधुनिक सुविधा उपलब्ध नाही. तसेच वन्यजीव तस्करांकडून सुद्धा वन्यजीव प्राण्यांना विष देण्याचे प्रकार समोर आले असून त्यांच्या सुरक्षा व उपचार संदर्भातही प्रश्न निर्माण झाला आहे. अशा घटनांमधील वन्यजीवांना उपचार व त्यांचे पुनर्वसन कण्यासाठी नागपूर येथे जावे लागते. अमरावती विभागातील वनक्षेत्रात रस्ते, रेल्वे अपघात, विद्युत प्रवाहाचा धक्का, विहिरींमध्ये पडलेले वन्यजीव, मानव-वन्यजीव संघर्ष, अनाथ पिल्ले तसेच जप्त वन्यजीवांच्या उपचार व पुनर्वसनासाठी आधुनिक सुविधा उपलब्ध नसल्याची बाब सुद्धा आमदार संजय खोडके यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिली.

अमरावती हे अकोला, वाशीम, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा जिल्ह्यांशी उत्कृष्ट रस्ते संपर्काने जोडलेले असल्याने अमरावती महसूल विभागासाठी अमरावती येथे वन्यजीव बचाव व पुनर्वसन केंद्र म्हणून विकसित करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने अमरावती विभागातील मेळघाट व्याघ्र प्रकल्प, काटेपूर्णा, कारंजा-सोहोळ, ज्ञानगंगा, पैनगंगा, लोणार, इसापूर, टिपेश्वर वन्यजीव अभयारण्ये तसेच पोहरा-मालखेड वनक्षेत्रातील वाढत्या वन्यजीव बचाव प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर अमरावती येथे प्रादेशिक वन्यजीव बचाव व पुनर्वसन केंद्र स्थापन करणे गरजेचे आहे. यासंदर्भात शासनाकडे प्रस्ताव आला आहे का ? असल्यास उपाययोजना व कार्यवाही संदर्भात खुलासा करावा अशी लक्षवेधी आमदार संजय खोडके यांनी लावून धरली.

यावर उत्तर देतांना राज्याचे वनमंत्री नामदार गणेश नाईक यांनी सांगितले कि, अमरावती विभागात वन्यजीवांच्या उपचार , उपाययोजना व पुनर्वसन बाबत कुठलीही सुविधा उपलब्ध नाही, हे खरे असले तरी या संदर्भात अमरावतीच्या बांबू गार्डन येथे समर्पित प्रादेशिक वन्यजीव बचाव, उपचार व पुनर्वसन केंद्र स्थापन करण्यासंदर्भात अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके यांचा प्रस्ताव शासनाकडे आला आहे. याबाबत शासन सकारात्मक असून लवकरच केंद्राच्या उभारणीस शासन मान्यता व निधी देऊन कार्यवाही करण्यात येणार असल्याचे उत्तर मंत्रीमहोदयांनी दिले.

### दुचाकी चोरीचा गुन्हा उघड,

म्यान समोर आले की, मूळ निळ्या रंगाच्या असलेल्या वाहनाला सिल्वर रंग देण्यात आला होता. पोलिसांनी पुढील चौकशी करून आझाद नगर येथील संशयिताला ताब्यात घेतले आणि त्याच्याकडून होंडा कंपनीची सिल्वर रंगाची दुचाकी जप्त केली.

वाहनाची माहिती तपासल्यानंतर सदर दुचाकी चोरीस गेल्याची नोंद वर्धा शहर पोलीस ठाण्यात असल्याचे निष्पन्न झाले. यानंतर वर्धा शहर पोलिसांना याबाबत माहिती देण्यात आली. पुढील तपासासाठी आरोपी आणि जप्त वाहन वर्धा शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव दानीश अली वल्द जावेद अली (वय २७, रा. आझाद नगर, अमरावती) असे आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त (मुख्यालय) प्रांजली सोनावणे, सहायक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर व निलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे, सहायक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे, दशरथ आडे तसेच गुन्हे शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

००००००००००००००००००००००००००


## -सायटेशन/जाहीरनामा-

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.४१८/२०२६ — ने.ता.२०.०८.२०२६

अर्जदार -
१. **श्री.मोतीराम गोविंदराव कुरवाडे** वय ७७ वर्षे, धंदा - मजुरी
२. **श्री.उकंडराव गोविंदराव कुरवाडे** वय ६५ वर्षे, धंदा - मजुरी
३. **वच्छला विठ्ठलराव अमझरे** वय ७५ वर्षे, धंदा - घरकाम
तिघेही रा.निंभार्णी, ता.मोर्शी, जि.अमरावती
४. **मनुबाई दगडु नान्ने** वय ८२ वर्षे, धंदा - घरकाम
रा.राळेगांव, ता.राळेगांव, जि.यवतमाळ

-- विरुध्द --
**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब, (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-(८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदारांचे वडिल नामे **गोविंदराव उपाशा कुरवाडे** हे **दिनांक १६/११/२०११** रोजी **राजुरवाडी, ता.मोर्शी, जि.अमरावती** येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**दिनांक ०३.०७.२०२६**

शिक्का — आदेशान्वये, **सहाय्यक अधीक्षक** दिवाणी न्यायालय, मोर्शी

## -सायटेशन/जाहीरनामा-

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.४३५/२०२६ — ने.ता.२५.०८.२०२६

अर्जदार -
१. **श्री.रामकृष्ण उकंडराव तिरंगसे,** वय ७० वर्षे, धंदा - शेती
२. **श्री.शंकर उकंडराव तिरंगसे,** वय ६९ वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा.मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. **सौ.कांताबाई जयकृष्णराव आगरकर,** वय ५७ वर्षे, धंदा - घरकाम
रा.तळेगाव शामजीपंत, ता.आष्टी, जि.अमरावती

-- विरुध्द --
**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब, (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-(८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदारांचे वडिल नामे **उकंडराव गंगाराम तिरंगसे** हे **दिनांक २५/१२/२०२५** रोजी त्यांचे राहते घरी मोर्शी,ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मय्यत झालेले आहे. तसेच अर्जदाराची आई नामे **कलावंती उकंडराव तिरंगसे** ही दिनांक **२६/०१/२०२०** रोजी मोर्शी,ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मय्यत झालेली आहे.त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०६.०७.२०२६

शिक्का — आदेशान्वये, **सहाय्यक अधीक्षक** दिवाणी न्यायालय, मोर्शी

## वणी नगर परिषद कार्यालय, जि. यवतमाळ

**(सामान्य प्रशासन विभाग )**

**जा.क्र./नपव/साप्र.वि/निमु/६६२/२०२६** — **दिनांक - ०७/०/२०२६**

**निविदा सुचना**

मुख्याधिकारी, नगर परिषद वणी, जिल्हा यवतमाळ यांचे वतीने खालील कामांच्या ऑफलाईन व्दिलिफाफा पध्दतीने सतेच निविदेतील अटी व शर्ती मध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक पात्रता पुर्ण करणा-या कंत्राटदार/पुरवठादार यांचेकडून सिलंबद लिफाफ्यामध्ये निविदा मागविण्यात येत आहे. खालील कामांची निविदा केवळ दोन लिफाफा पध्दतीने **दि.०८/०७/२०२६** ते **दि.२०/०७/२०२६** रोजी कार्यालयीन वेळेपर्यत नगर परिषदेच्या निविदा पेटीमध्ये सादर करावयाच्या आहे. निविदेचा विस्तृत नमुना नगर परिषद समाान्य प्रशासन विभाग येथे दिनांक **०८/०७/२०२६** पासून पाहण्यास उपलब्ध आहे. कामाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| १. | नगर परिषद वणी सामान्य प्रशासन विभाग अंतर्गत वेळोवेळी आवश्यकतेनुसार मंडप डेकोरेशन करणे, स्टेज तयार करणे, कमान उभारणी करणे, बॅरीकेड लावणे, साउंड सिस्टीम व लायटिंग पुरवठा करुन नियोजित ठिकाणी लावुन देणे तसेच इतर आवश्यक कामे करणे. |
| २. | नगर परिषद वणी सामान्य प्रशासन विभाग अंतर्गत लेखा संहितेनुसार स्टेशनरी छपाई करुन पुरवठा करणे. |

-स्वा- **(सौ.विद्या खेमराज आत्राम)** अध्यक्ष, नगर परिषद, वणी
-स्वा- **(श्री राकेश लक्ष्मण बुग्गेवार)** उपाध्यक्ष, नगर परिषद, वणी
-स्वा- **(डॉ.सचिन शंकरराव गाडे)** मुख्याधिकारी, नगर परिषद, वणी

## दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे, जि.अमरावती यांचे न्यायालय

**जाहीरनामा**

**आर.एम.जे.सी.क्र.१४०/२०२६** — **ने.ता.०६.०८.२०२६**

अर्जदार -
१. **विजय प्रभाकर दाढे (नातू)**, वय ३१ वर्षे, व्यवसाय - शेती
रा.फुबगाव, ता.नांदगाव खंडे. जि.अमरावती
२. **सुधाकर तानबाजी दाढे (मुलगा),** वय ८० वर्षे, व्यवसाय - शेती
३. **भास्कर तानबाजी दाढे (मुलगा),** वय ८० वर्षे, व्यवसाय - शेती
रा.जवळा, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
४. **अरुण तानबाजी दाढे (मुलगा),** वय ६३ वर्षे, व्यवसाय - शेती
रा.जवळा, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
५. **आशा एकनाथ जोगी (मुलगी),** वय ५७ वर्षे, व्यवसाय - शेती
रा.भाम देवी, ता.कारंजा, जि.वाशिम

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** **निरंक**

या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **विजय प्रभाकर दाढे व इतर** यांनी दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर), चांदूर रेल्वे यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे भाग ८ कलम २ प्रमाणे** अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, **तानबाजी उकंडराव दाढे,** यांचा मृत्यू दिनांक ३०.०७.२००३ रोजी मौजा जवळा धोतरा, ता.चांदूर रेल्वे, जि. अमरावती येथे झाला. अर्जदार यांचेशिवाय मयतांचे ईतर कोणीही वारसदार नाही असे अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केले आहे.

वरीलप्रमाणे सदहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषित करुन देण्यात येईल.

आज दि.०४ माहे जुलै २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहाय्यक अधीक्षक** दिवाणी न्यायालय, चांदूर रेल्वे

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१२६८/२०२६**
**छाया व इतर विरुध्द निरंक**
**पुढील ता.२५.०८.२०२६**

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार ः
1. **Chya Arunrao Tekade** Age 55 Yrs. Occu.: Household
2. **Shailesh Arunrao Tekade** Age 29 Yrs. Occu.: Household
R/o. Ward No. 2. Gurukunj Ashram Mojhari, Tq. Tiosa, Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत अरुण भिमराव टेकाडे** हे **दि.१०.०४.२०२६** रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **छाया व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **छाया व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०१.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक** दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

## -सायटेशन/जाहीरनामा-

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.४१७/२०२६ — ने.ता.२०.०८.२०२६

अर्जदार -
१. **श्रीमती विमल भानुदास कोंडलकर**, वय ५१ वर्षे, धंदा - घरकाम
२. **प्रज्वल भानुदास कोंडलकर** , वय २३ वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा.निंभी, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. **सौ.मनिषा राजेश नरसिंगकर**, वय २९ वर्षे, धंदा - घरकाम
रा.पिंपळखुटा मोठा, ता.मोर्शी, जि.अमरावती
४. **सौ. शिवानी नितिन गायकी,** वय २६ वर्षे, धंदा - घरकाम
रा.लहान आर्वी, ता.आष्टी, जि.वर्धा

-- विरुध्द --
**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब, (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-(८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.२ ते ४ चे वडिल नामे **भानुदास किशन कोंडलकर हे दिनांक ०३/०५/२०२६** रोजी **पीडीएमसी हॉस्पिटल, अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**दिनांक ०३.०७.२०२६**

शिक्का — आदेशान्वये, **सहाय्यक अधीक्षक** दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर नोटीस/सायटेशन

**५ वे सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) अचलपूर यांच्या न्यायालयातील**

**नियमित दिवाणी दावा क्र.१०५/२०२६** — **ने.ता.२९/०७/२०२५**

रिता बुल वादी
-- विरुध्द --
महाराष्ट्र सरकार तर्फे जिल्हाधिकारी, अमरावती प्रतिवादी

वादी ः १. रिता बाबुराव बुल, वय ३७ वर्षे
रा.खराळा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
विरुध्द
प्रतिवादी ः १. जिल्हाधिकारी अमरावती
ता.जि.अमरावती

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, वरील वादी रिता बाबुराव बुल यांनी वरील न्यायालयामध्ये बाबुराव दामोधरराव बुल हे **दि.१०.०१.२०१८** पासून बेपत्ता असल्याबाबत पोलीस स्टेशन चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे तक्रार दाखल केली होती. **दिवाणी मृत्यू झाल्याची घोषणा करणेबाबत (कलम १११ भारतीय साक्ष अधिनियम २०२३)** चा दावा दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा वरील बाबत कोणास हरकत घ्यावयाची असल्यास त्यांचे दाव्याचे सुनावणी करिता दिनांक **२९/०७/२०२६** रोजी सकाळी **१०.३०** वा. वरील न्यायालयामध्ये स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर राहावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज **दि.०२.०७.२०२६** रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला असे.

शिक्का — **आदेशानुसार, सहायक अधीक्षक दिवाणी न्यायालय (व.स्तर) अचलपूर**

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, ८ जुलै २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# 'आपण दोघे भाऊ-भाऊ... बायोमायनिंगचा मलिदा मिळून-मिसळून खाऊ ?'

● सत्ताधारी-विरोधकांच्या 'संशयास्पद मौना'ने अकोटकर संतप्त ● २.०७ कोटींच्या बायोमायनिंग प्रकरणी उच्चस्तरीय चौकशीची मागणी ● प्रशासनाची धावपळ, राजकीय शांतता आणि वाढते प्रश्न ● 'सत्य कागदपत्रांत असेल तर ती लपविण्याची गरज काय ?'



संग्रहित छायाचित्र

**उच्चस्तरीय चौकशीची मागणी**

**नागरिकांच्या मते या प्रकरणाची चौकशी खालील बाबींवर केंद्रित व्हावी.**

- *लेगसी वेस्टचे प्रत्यक्ष मोजमाप.*
- *बायो-कल्चरचा वापर झाला का?*
- *आरडीएफ प्रत्यक्ष तयार झाला का?*
- *आरडीएफची अधिकृत विल्हेवाट कुठे लावली?*
- *पर्यावरणीय नियमांचे पालन झाले का?*
- *प्रकल्पात आर्थिक किंवा प्रशासकीय अनियमितता झाली का?*

■ ॲड. समीर ठाकूर ■

**अकोट :** अकोट नगर परिषदेच्या २ कोटी ७ लाख रुपयांच्या बायोमायनिंग प्रकल्पाभोवती निर्माण झालेल्या प्रश्नांच्या भोवऱ्याने आता केवळ प्रशासकीयच नव्हे, तर राजकीय व्यवस्थेलाही कोंडीत पकडल्याचे चित्र दिसू लागले आहे. प्रकल्पातील कथित अनियमिततेसंदर्भात सलग वृत्त प्रसिद्ध होत असताना प्रशासनात फाईलांची हालचाल, तातडीच्या बैठका आणि अंतर्गत खलबते सुरू असल्याची चर्चा आहे; मात्र दुसरीकडे सत्ताधारी आणि विरोधक या दोघांनीही साधलेले मौन नागरिकांच्या संशयाला अधिकच खतपाणी घालत आहे.

शहरात आता उपरोधिक भाषेत एकच वाक्य वारंवार ऐकू येत आहे ते म्हणजे 'आपण दोघे भाऊ-भाऊ... बायोमायनिंगचा मलिदा मिळून-मिसळून खाऊ!'. विशेष म्हणजे ही प्रतिक्रिया कोणत्याही पुराव्यावर आधारित नसून, सार्वजनिक निधीशी संबंधित गंभीर प्रश्नांवर राजकीय पक्षांकडून होत नसलेल्या प्रतिक्रियेबद्दल नागरिकांमध्ये निर्माण झालेल्या असंतोषाचे प्रतीक म्हणून व्यक्त होत असल्याचे बोलले जात आहे.

**प्रश्नांचा भडिमार... पण उत्तरांचा दुष्काळ!**

या प्रकरणात आतापर्यंत अनेक मूलभूत प्रश्न उपस्थित झाले आहेत. डम्पिंग ग्राऊंडवर प्रत्यक्षात किती लेगसी वेस्ट उपलब्ध होते? त्याचे मोजमाप कोणत्या अधिकृत सर्वेक्षणावर आधारित होते? बायो-कल्चरचा वापर झाला का? तयार झालेला आरडीएफ (ॅलि अॅग्न् इलत) कोणत्या उद्योगाला पाठविण्यात आला? त्यासंबंधी ई-वे बिल, जीएसटी चलने, स्वीकार प्रमाणपत्र कुठे आहेत? महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे निरीक्षण अहवाल, तृतीय पक्ष तपासणी, प्रयोगशाळा चाचणी, ड्रोन सर्व्हे, मोजमाप पुस्तिका (एम.बी.) आणि देयक मंजुरीची प्रक्रिया काय होती?

या सर्व प्रश्नांवर प्रशासनाने अद्याप कोणतेही अधिकृत उत्तर दिलेले नाही. उलट वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर संबंधित फाईल तातडीने मागविणे आणि बंदद्वार बैठक झाल्याची माहिती समोर आल्याने नागरिकांच्या मनातील शंका आणखी गडद झाल्या आहेत.

**लोकशाहीत विरोधकांचे मौनही तितकेच गंभीर**

या प्रकरणातील सर्वांत धक्कादायक बाब म्हणजे केवळ सत्ताधारी नव्हे, तर विरोधकही पूर्णपणे शांत आहेत. लोकशाही व्यवस्थेत सार्वजनिक निधीच्या वापराबाबत प्रश्न विचारणे ही विरोधी पक्षाची घटनात्मक जबाबदारी मानली जाते. दुसरीकडे प्रशासनावर विश्वास निर्माण करण्याची जबाबदारी सत्ताधाऱ्यांवर असते. मात्र अकोटमध्ये या दोन्ही भूमिका गायब झाल्याचे चित्र आहे. नगराध्यक्ष, संबंधित सभापती, सत्ताधारी गटाचे पदाधिकारी, विरोधी पक्षाचे नगरसेवक किंवा इतर प्रमुख लोकप्रतिनिधी- यापैकी एकाही व्यक्तीने अधिकृत पत्रकार परिषद घेऊन भूमिका स्पष्ट केलेली नाही. त्यामुळे 'मौन हेच सर्वांत मोठे उत्तर ठरत आहे का?' असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

**पारदर्शकता ही पर्याय नव्हे, तर सामूहिक जबाबदारी**

**कायदेशीर सूचना**

या वृत्तात उल्लेख केलेले आरोप, संशय, चर्चा आणि नागरिकांच्या प्रतिक्रिया यांची अधिकृत पुष्टी झालेली नाही. संबंधित प्रशासन, कंत्राटदार, लोकप्रतिनिधी किंवा इतर संबंधितांची बाजू अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे या वृत्तातील मांडणी उपलब्ध कागदपत्रे, विश्वसनीय सूत्रांकडून मिळालेली माहिती, सार्वजनिक चर्चेत असलेले मुद्दे आणि नागरिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर आधारित असून, संबंधितांचे स्पष्टीकरण प्राप्त झाल्यास तेही प्रसिद्ध करण्यात येईल.

सार्वजनिक निधीतून राबविण्यात येणाऱ्या कोणत्याही विकासकामात पारदर्शकता हा मूलभूत प्रशासनिक सिद्धांत आहे. घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६, तसेच शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांवरील आर्थिक उत्तरदायित्वाच्या तत्त्वांनुसार, प्रकल्पाशी संबंधित सर्व नोंदी, तांत्रिक अहवाल, मोजमाप, देयकांची कारणमीमांसा आणि अंमलबजावणीचा तपशील आवश्यकतेनुसार पडताळणीसाठी उपलब्ध असणे अपेक्षित असते. त्यामुळे या प्रकरणात निर्माण झालेल्या शंका दूर करण्याचा सर्वांत सोपा मार्ग म्हणजे संपूर्ण प्रकल्पाची कागदपत्रे नागरिकांसमोर ठेवणे. कागदपत्रे स्पष्ट असतील तर प्रशासनावरील विश्वास वाढेल; अन्यथा संशय वाढतच राहील.

## बायोमायनिंग : कचऱ्याच्या डोंगरातून पर्यावरण संरक्षणाकडे... विज्ञानाधारित परिवर्तनाची प्रक्रिया

देशातील शहरांमध्ये अनेक वर्षांपासून साचत गेलेल्या घनकचऱ्याच्या डोंगरांमुळे पर्यावरण, सार्वजनिक आरोग्य आणि शहरी विकासासमोर गंभीर आव्हाने निर्माण झाली. डम्पिंग ग्राऊंडमधून झिरपणारे दूषित पाणी (लीचेट), मिथेन वायूचे उत्सर्जन, दुर्गंधी, आग लागण्याच्या घटना आणि भूजल प्रदूषण यामुळे अनेक शहरांमध्ये परिस्थिती चिंताजनक बनली होती. या समस्येवर कायमस्वरूपी आणि वैज्ञानिक उपाय म्हणून केंद्र शासनाने बायोमायनिंग या प्रक्रियेला विशेष महत्त्व दिले आहे.

बायोमायनिंग म्हणजे जुन्या डम्पिंग ग्राऊंडवर वर्षानुवर्षे साचलेल्या लेगसी वेस्टचे वैज्ञानिक पद्धतीने उत्खनन करून त्याचे वर्गीकरण, पुनर्प्रक्रिया आणि पर्यावरणपूरक विल्हेवाट लावण्याची प्रक्रिया होय. या प्रक्रियेत कचरा केवळ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलविला जात नाही, तर त्यातील उपयुक्त घटक वेगळे करून उर्वरित कचऱ्याची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावली जाते. त्यामुळे डम्पिंग ग्राऊंडवरील जागा पुन्हा विकासासाठी उपलब्ध होण्यास मदत होते. बायोमायनिंगची सुरुवात संबंधित डम्पिंग ग्राऊंडवरील लेगसी वेस्टचे सर्वेक्षण करण्यापासून होते. ड्रोन सर्व्हे, जीपीएस मोजणी, घनफळ आणि मेट्रिक टन निश्चित करून प्रत्यक्ष किती कचरा उपलब्ध आहे, याची नोंद केली जाते. त्यानंतर यंत्रसामग्रीच्या सहाय्याने कचरा बाहेर काढला जातो. काही ठिकाणी कचऱ्याचे जैविक विघटन वेगाने होण्यासाठी बायो-कल्चर किंवा सूक्ष्मजीवांचा वापर केला जातो.

उत्खननानंतर कचरा ट्रॉमल मशीनमधून वर्गीकृत केला जातो. या प्रक्रियेत माती, प्लास्टिक, धातू, काच, दगड आणि ज्वलनशील कचरा असे विविध घटक वेगळे केले जातात. ज्वलनशील कचऱ्यापासून आरडीएफ तयार केले जाते. हे इंधन सिमेंट उद्योग किंवा अधिकृत औद्योगिक प्रकल्पांमध्ये वापरले जाते. धातू, प्लास्टिक आणि इतर पुनर्वापरयोग्य साहित्य पुनर्प्रक्रियेसाठी पाठविले जाते, तर योग्य तपासणीनंतर मातीचा उपयोग भराव किंवा इतर विकासकामांसाठी केला जाऊ शकतो. बायोमायनिंग ही केवळ कचरा हटविण्याची योजना नसून, ती पर्यावरणीय पुनर्स्थापनेची प्रक्रिया आहे. यामुळे डम्पिंग ग्राऊंडमधून होणारे भूजल प्रदूषण कमी होते, मिथेन वायूचे उत्सर्जन आटोक्यात येते, दुर्गंधी कमी होते आणि शहरांना कचऱ्याच्या डोंगरांपासून मुक्त करण्यास मदत मिळते. तसेच, वर्षानुवर्षे कचऱ्याखाली अडकून पडलेली जमीन पुन्हा सार्वजनिक उपयोगासाठी उपलब्ध होते.

याच कारणामुळे केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान (शहरी) तसेच घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अंतर्गत देशभरातील जुन्या डम्पिंग ग्राऊंडचे निर्मूलन करण्यासाठी बायोमायनिंगला प्राधान्य दिले आहे. विविध राज्यांमध्ये या प्रक्रियेसाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वैज्ञानिक पद्धतीने घनकचरा व्यवस्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

मात्र, बायोमायनिंग ही अत्यंत तांत्रिक आणि कागदपत्राधारित प्रक्रिया असल्याने तिच्यात पारदर्शकता अत्यंत महत्त्वाची ठरते. लेगसी वेस्टचे अधिकृत सर्वेक्षण, मोजमाप पुस्तिका (एम.बी.), ड्रोन सर्व्हे अहवाल, बायो-कल्चर वापराच्या नोंदी, आरडीएफ निर्मिती व विल्हेवाटीची कागदपत्रे, ई-वे बिल, जीएसटी चलने, प्रयोगशाळा अहवाल, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या परवानग्या, तृतीय पक्ष तपासणी आणि देयक मंजुरीशी संबंधित सर्व नोंदी व्यवस्थित उपलब्ध असणे आवश्यक असते. कारण सार्वजनिक निधीतून राबविण्यात येणाऱ्या अशा प्रकल्पांचे यश केवळ कचरा हटविण्यावर नव्हे, तर संपूर्ण प्रक्रियेच्या पारदर्शकता, वैज्ञानिक अंमलबजावणी आणि उत्तरदायित्वावर अवलंबून असते.

**प्रशासनाच्या शांततेने संशय वाढतोय?**


विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर संबंधित प्रकल्पाची फाईल तातडीने मागविण्यात आली. अधिकाऱ्यांची बैठक झाली. कागदपत्रांची पडताळणी झाल्याची चर्चा रंगली. जर हा नियमित प्रशासकीय भाग असेल, तर त्याबाबत अधिकृत माहिती देण्यात अडचण नसावी. परंतु प्रशासनाने मौन बाळगल्यामुळे नागरिक विविध तर्क-वितर्क लावत आहेत.

# सापळी - सोंडा रस्त्याची दुरावस्था जिल्हा परिषद प्रशासनाचे दुर्लक्ष

## चिखलमय रस्त्याने ये-जा करताना अबाल वृद्धांची कसरत

■ प्रतिनिधी | वाशिम ■

तालुक्यातील वाशीम - पुसद मार्गावर असलेल्या सापळी फाटा ते सोंडा या रस्त्याची दुरवस्था झाली आहे. पावसाळा सुरू झाल्याने 'हा' रस्ता चिखलमय झाल्याने या रस्त्याने ये-जा करताना अबालवृद्धांना दररोज तारेवरची कसरत करण्याची वेळ आली आहे. दोन्ही गावातील लोकांनी हा रस्ता दुरूस्त करण्यासाठी अथवा नविन रस्ता करून देण्याची प्रशासनाकडे अनेकवेळा मागणी केलेली आहे. परंतु जिल्हा व जिल्हा परिषद प्रशासनाने दोन्ही गावातील रस्त्यापासून त्रस्त असलेल्या लोकांच्या न्याय्य मागणीकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे.



सापळी—सोंडा रस्ता जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडे आहे. जवळपास १५ वर्षापुर्वी हा रस्ता पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून करण्यात आला होता. हा रस्ता झाला तेव्हा कार्यरत असलेल्या लोकप्रतिनिधींनी या रस्त्याच्या कामाकडे दुर्लक्ष केल्याने तत्कालीन जबाबदार अधिकारी व पदाधिका—यांनी त्यांचे खिसे गरम केल्याने सापळी—सोंडा रस्त्याचे काम थातुर—मातुर पद्धतीने केल्याचा आरोप दोन्ही गावातील लोकांकडून होत आहे.

सापळी हे गाव अनसिंग जि.प.गटात येते. तर सोंडा हे गाव वारला जि.प.गटात येते. दोन्ही गावाचे जि.प. व पंचायत समितीचे वेगळे सदस्य असतात. कमीत कमी आपल्या सर्कलमध्ये असलेल्या विकास कामासाठी 'त्या' सदस्यांनी एकत्र राहून प्रशासनाकडून आपल्या सर्कल मधील प्रलंबित कामासाठी आणि नविन कामासाठी वरिष्ठ अधिकारी आणि संबंधीत लोकप्रतिनिधी, पदाधिकारी यांचेकडे पाठपुरावा करून आपल्या सर्कलचा विकास करून घेण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज असल्याची माहिती सोंडा येथील जागरूक नागरिकांनी दिली. १५ वर्षापुर्वी पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून झालेल्या सापळी—सोंडा रस्त्याची मागील दोन वर्षापासून चाळणी झाल्याने हा रस्ता सद्या चिखलमय झाला आहे. या चिखलमय रस्त्याने दररोज शेकडो दुचाकी वाहने, ऑटो, मालवाहू वाहने ये-जा करतात. परंतु ही वाहने चिखलातुन चालवतांना दररोज कसरत करण्याची वेळ आल्याची माहिती सोंडा येथील युवा सरपंच नवनाथ वाबळे यांनी दिली.

सापळी-सोंडा या रस्त्याची चाळणी झाल्याने दोन्ही गावातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी आणि रूग्णांना अनसिंग, वाशीमला येताना-जाताना अनेक संकटांना तोंड देण्याची वेळ आल्याची चर्चा आहे.

वाशीमचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी आणि वाशीम जि.प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी या दोन्ही 'सनदी' अधिका-यांनी सापळी-सोंडा रस्त्याची दुरूस्ती करण्यासह हा रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून करण्यासाठी पुढाकार घ्यावा. अशी मागणी सापळी, सोंडा येथील त्रस्त लोकांकडून केल्या जात आहे.

## नांदेड-लोकमान्य टिळक टर्मिनसदरम्यान आठवड्यातून दोन रेल्वे सेवा सुरू

■ प्रतिनिधी | वाशिम ■

दक्षिण मध्य रेल्वेने प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन हजूर साहिब नांदेड-लोकमान्य टिळक टर्मिनस (मुंबई) दरम्यान आठवड्यातून दोन विशेष रेल्वे सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या सेवेमुळे नांदेड, पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशिम, अकोला तसेच मुंबईकडे प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

पहिली साप्ताहिक सेवा गाडी क्र. १७६६७ ही प्रत्येक बुधवारी रात्री ९.१५ वाजता नांदेड येथून सुटेल. पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशिम, अकोला आणि मनमाड मार्गे ती गुरुवारी दुपारी १.०० वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पोहोचेल. ८ जुलै २०२६ पासून सुरू होणार आहे. परतीची गाडी क्र. १७६६८ प्रत्येक गुरुवारी सायंकाळी ४.५५ वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथून सुटेल. मनमाड, अकोला, वाशिम, हिंगोली, बसमत व पूर्णा मार्गे ती शुक्रवारी सकाळी ९.१० वाजता नांदेड येथे पोहोचेल. या गाडीची सेवा ९ जुलै २०२६ पासून सुरू होईल. याशिवाय दुसरी साप्ताहिक सेवा गाडी क्र. १७६६५ प्रत्येक सोमवारी रात्री ९.१५ वाजता नांदेड येथून सुटून पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशिम, अकोला आणि मनमाड मार्गे मंगळवारी दुपारी १.४० वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पोहोचेल.

## एसटी आरक्षण मागणी संदर्भात आयोजित सहविचार सभा उत्साहात



■ प्रतिनिधी | मानोरा ■

संभाजीनगर येथे दि. १२ जुलै २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या एसटी आरक्षण मेळाव्याच्या पार्श्वभूमीवर मानोरा तालुक्यातील सकल गोर बंजारा समाजाच्या वतीने एसटी आरक्षण मागणीहसंदर्भात सविचार सभेचे आयोजन करण्यात आले. समाजातील विविध स्तरांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून एसटी आरक्षणाच्या विषयावर सखोल चर्चा केली.

सभेला प्रा. डॉ. अनिल राठोड (वाशिम) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या समितीच्या कामकाजाबाबत तसेच एसटी आरक्षणाच्या सद्यस्थितीवर सविस्तर मार्गदर्शन केले. आरक्षणाच्या लढ्याला समाजाने एकजुटीने आणि संघटितपणे पुढे नेण्याचे आवाहन त्यांनी केले.

या सविचार सभेमध्ये समाजातील राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. उपस्थितांनी एसटी आरक्षणाच्या अनुषंगाने आपापली मते, सूचना आणि भूमिका मांडल्या. समाजाच्या हक्कासाठी एकदिलाने लढा उभारण्याची गरज सर्व वक्त्यांनी अधोरेखित केली. यावेळी प्रमुख उपस्थितींमध्ये संजय महाराज, भाऊ नाईक, चिंतामण चव्हाण, रोहिदास राठोड, मनोहर जाधव, रामराव चव्हाण, मनोहर राठोड, श्याम राठोड, वसंता राठोड, विशाल राठोड, रोशन चव्हाण, नितीन राठोड, धर्मराज आडे, धनराज राठोड, रोहित राठोड, राम जाधव, गोपाल चव्हाण, सुनील राठोड, विजय जाधव, लखन राठोड, पंकज चव्हाण, नेमीचंद राठोड, अरुण जाधव, गोपाल राठोड, रामजीवन राठोड आणि डॉ. सुधाकर राठोड आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान भाऊ नाईक, संथारा पूर राठोड, विशाल राठोड आणि चिंतामण चव्हाण यांनी एसटी आरक्षणाच्या प्रश्नावर आपली सविस्तर मते मांडली. समाजातील युवकांनी या लढ्यात सक्रिय सहभाग घ्यावा तसेच आगामी मेळावा यशस्वी करण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहन वक्त्यांनी केले.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाची कारवाई

- **प्रतिबंधित विदेशी मद्यसाठा जप्त**
- **४.८५ लाखांचा मुद्देमाल हस्तगत, दोघांना अटक**



■ प्रतिनिधी | वाशिम ■

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने अवैध मद्यवाहतुकीविरोधात मोठी कारवाई करत गोवा राज्यात विक्रीस असलेला व महाराष्ट्रात विक्रीस प्रतिबंधित विदेशी मद्याचा साठा जप्त केला आहे. या कारवाईत तब्बल ४ लाख ८५ हजार ६८० किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून दोन आरोपींना अटक करण्यात आली.

ही कारवाई डॉ. राजेश देशमुख (आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई), प्रसाद सुर्वे (सह आयुक्त), डॉ. पराग नवलकर (विभागीय उपआयुक्त, अमरावती विभाग) तसेच श्रीमती सीमा झावरे (अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, वाशिम) यांच्या मार्गदर्शनाखाली ४ जुलै २०२६ रोजी पार पडली.

राज्य उत्पादन शुल्क विभागाला मिळालेल्या खात्रीलायक व गोपनीय माहितीनुसार, मानोली ते मोतसावंगा रोड (ता. मंगरुळपीर, जि. वाशिम) येथे काही इसम गोवा राज्यात विक्रीस असलेले विदेशी मद्य एका चारचाकी वाहनातून बेकायदेशीररीत्या वाहतूक करीत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ अंतर्गत भरारी पथकाने सापळा रचून संशयित वाहनाची तपासणी केली.

तपासणीदरम्यान टाटा कंपनीचे MEGA XL (नोंदणी क्रमांक MH-47-4-3611) या बंदिस्त वाहनातून मोठ्या प्रमाणात विदेशी मद्याचा साठा आढळून आला. वाहनातून १८० मिली क्षमतेच्या रॉयल चॅलेंज व्हिस्की, आयकॉनीक व्हाईट व्हिस्की, रॉयल स्टॅग व्हिस्की या ब्रँडच्या ३६० सीलबंद बाटल्या (८ पेट्या) तसेच ७५० मिली क्षमतेच्या रॉयल क्वीन व्हिस्की आणि गोल्ड ॲण्ड ब्लॅक XXX रमच्या १४४ सीलबंद बाटल्या (१२ पेट्या) असा एकूण २० पेट्यांचा विदेशी मद्यसाठा जप्त करण्यात आला. या प्रकरणी दिगंबर रमेश पवार (वय ३७, रा. भिलडोंगर, ता. मानोरा, ह.मु. शिवाजी नगर, वाशिम) आणि प्रविण भगवानदास वर्मा (वय ५०, रा. सोनखास, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम) यांना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

## सोमठाण्याचे सुपुत्र बाबूसिंग राठोड यांच्या 'भारताचे भाग्यविधाते' पुस्तकातील उतारा 'शिकू मराठी आनंदाने' मध्ये

■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील सोमठाणा या गावचे मूळ रहिवासी व सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी, ज्येष्ठ लेखक बाबूसिंग मोहनसिंग राठोड यांच्या साहित्याने मानोरा तालुक्याचा मान राज्यभर उंचावला आहे.



राज्य शासनाने नुकत्याच प्रकाशित केलेल्या इयत्ता सहावीच्या 'शिकू मराठी आनंदाने' या मराठीच्या पाठ्यपुस्तकात राठोड लिखित 'भारताचे भाग्यविधाते' या पुस्तकातील उताऱ्याचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे तालुक्यातील प्रसिद्ध लेखकाच्या लेखणीतून साकार झालेल्या साहित्यकृतीचे वाचन करून राज्यभरातील विद्यार्थी घडणार आहेत. पाठ्यपुस्तकाच्या पान क्र.६४ वर 'थोरांची ओळख' या पाठात बाबूसिंग राठोड (१९५४) यांचा उल्लेख 'प्रसिद्ध लेखक' असा करण्यात आला आहे. त्यांच्या 'भारताचे भाग्यविधाते' या पुस्तकातून डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम व लालबहादूर शास्त्री यांच्या कार्याची ओळख विद्यार्थ्यांना करून देण्यात आली आहे.

'श्रीसमर्थ रामदास स्वामींचे श्लोक मनोबोध ओवीरूप दासबोध व करूणाष्टके' हे राठोड यांचे आणखी एक प्रसिद्ध पुस्तक आहे, अशी नोंदही पाठ्यपुस्तकात घेण्यात आली आहे.

बाबूसिंग मोहनसिंग राठोड हे मूळचे सोमठाणा, ता. मानोरा येथील. शासकीय सेवेतून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी लेखन-वाचनाला वाहून घेतले. बंजारा समाजाचा इतिहास, संत साहित्य व थोर व्यक्तींची चरित्रे यावर त्यांनी विपुल लेखन केले आहे. 'भारताचे भाग्यविधाते' या पुस्तकात त्यांनी भारत घडवणाऱ्या थोर महापुरुषांच्या कार्याचा वेध घेतला आहे.


## बुलडाणा अर्बन को-ऑप.क्रेडीट सोसायटी लि. बुलडाणा मल्टीस्टेट र.नं. २६७

### -: निविदा सूचना :-

### शाखा ईमारत, व्यापारी गाळे, कर्मचारी निवासस्थान व इतर संलग्न बांधकामा करीता निविदा सूचना

संस्थेला खालील ठीकाणी शाखा ईमारत, व्यापारी गाळे, कर्मचारी निवासस्थान व इतर संलग्न कामा करीता सिलबंद निविदा टर्न की बेसिसवर व विना अटीसह अनुभवी कंत्राटदाराद्वारे मागविण्यांत येत आहे. कंत्राटदारानी कोरी निविदा मागवितांना अनुभवास्तव केलेल्या कामाची तथा हाती घेतलेल्या कामांची यादी जोडावी. सदर कामाची कोरी निविदा दि.०८/०७/२०२६ पासून दि. १५/०७/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळात कार्यालयात कोऱ्या निविदेच्या प्रपत्राची किंमत रु.५,०००/- अदा केल्या नंतर मिळतील व कामाची सिलबंद निविदा दि. १६/०७/२०२६ रोजी कार्यालयात दुपारी २.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास त्याच दिवशी उघडण्यात येतील.

**शाखा कार्यालय, व्यापारी गाळे व कर्मचारी निवासस्थानाचे बांधकाम :-**

| अ.क्र. | जिल्हा | गावाचे नाव | कामाचे स्वरुप | अंदाजीत क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|
| १. | बुलडाणा | मु.पो. पिंपळगांव राजा ता. खामगांव | तळ मजला + २ | ४३०० (sqft) |

**निविदेच्या अटी :-** (१) काम कुशल कामगारांकडूनच करावे लागेल व त्यांच्या जीवीताची व अपघाताची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. त्यासाठी कामगारांचा विमा काढण्यांत यावा तसेच कामगार कल्याण विभाग व पी.एफ. ऑफीसशी संबंधीत सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता कंत्राटदारास करावी लागेल. (२) निविदेसोबतच्या सर्व अटी व नियम संस्थेच्या मुख्यालयात कार्यालयीन कामाचे दिवशी व वेळेत पहावयास मिळतील. (३) कोणतेही कारण न दर्शविता एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार संस्थेने राखून ठेवला आहे. (४) कोरे निविदा प्रपत्र पोष्टाने पाठविण्यात येणार नाही.

**सरव्यवस्थापक,**
बुलडाणा अर्बन को-ऑप.क्रेडीट सोसायटी मर्यादीत, बुलडाणा (मल्टीस्टेट) र.नं. २६७
मुख्य कार्यालय, सहकार सेतू, हुतात्मा गोरे पथ, बुलडाणा - ४४३००१.
टेलीफॅक्स (०७२६२) २४२७०५

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २२१ ■ बुधवार, ८ जुलै २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## मध्यरात्री वनविभागाचा छापा; अवैध मुरूम वाहतुकीचे दोन डम्पर जप्त

### -बोटोणा शिवारातील कारवाई; जेसीबी पसार, खनिज माफियांमध्ये खळबळ

**आष्टी शहीद जनमाध्यम-** तालुक्यातील तळेगाव शा. प. वनपरीक्षेत्रांतर्गत बोटोणा शिवारात सुरू असलेल्या कथित अवैध मुरूम उत्खनन व वाहतुकीवर वनविभागाने रविवारी मध्यरात्री धाड टाकून दोन डम्पर जप्त केले. या कारवाईमुळे अवैध गौण खनिज वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.



वनविभागाला मिळालेल्या माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. बोटोणा येथील एका शेतातून जेसीबीच्या साहाय्याने मुरूमाचा उपसा करून डम्परद्वारे बोरखेडी येथील पुलाजवळ गड्डा भरण्यासाठी वाहतूक केली जात होती. वनक्षेत्रातून आवश्यक परवानगीशिवाय ही वाहतूक सुरू असल्याचे निदर्शनास आल्यानंतर वनविभागाच्या पथकाने घटनास्थळी धाड टाकली. या वेळी दोन डम्पर ताब्यात घेण्यात आले. मात्र कारवाईची चाहूल लागताच जेसीबी चालक वाहनासह घटनास्थळावरून पसार झाला.

जप्त करण्यात आलेले दोन्ही डम्पर पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी तळेगाव वनविभाग कार्यालयात आणण्यात आले आहेत. वनपरीक्षेत्र अधिकारी गवरले यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल मोहन सोडगीर, बिट गार्ड, वन कर्मचारी सावंत व इतर कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली. कारवाईदरम्यान बोटोणा व बोरखेडी परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने घटनास्थळी उपस्थित होते. वृत्त लिहितोवर पंचनामा सुरू असून संबंधितांची चौकशी केली जात आहे. या संपूर्ण कारवाईचे चित्रीकरणही करण्यात आल्याची माहिती असून अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीविरोधात वनविभागाने घेतलेल्या या धाडसी भूमिकेचे नागरिकांनी स्वागत केले आहे.

# उगवलेच नाही सोयाबीन, ७२ शेतकऱ्यांचा विश्वासघात

## बुस्टरसह अनेक कंपन्यांच्या बियाण्यांवर प्रश्न, देवळीत सर्वाधिक फटका, दुबार पेरणीचे संकट गडद

**वर्धा जनमाध्यम :** पावसाच्या भरवशावर कर्ज काढून महागडे बियाणे खरेदी करून पेरणी करणाऱ्या वर्धा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आशांवर पाणी फिरले आहे. सोयाबीन उगवले नसल्याच्या तब्बल ७२ तक्रारी कृषी विभागाकडे दाखल झाल्या असून, सर्वाधिक तक्रारी बुस्टर कंपनीच्या बियाण्यांविरोधात आहेत. या प्रकारामुळे हजारो रुपयांचा खर्च वाया गेला असून शेतकऱ्यांसमोर आता दुबार पेरणीचे भीषण संकट उभे ठाकले आहे.

खरीप हंगामापूर्वी बोगस बियाण्यांना आळा घालण्यासाठी कृषी विभागाने नऊ भरारी पथके तयार करून मोठमोठ्या घोषणा केल्या होत्या. काही ठिकाणी प्रतिबंधित बियाणे जप्तही करण्यात आले. मात्र प्रत्यक्ष शेतात पेरलेले बियाणेच उगवले नसल्याने या यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्न निर्माण झाला आहे.



संग्रहीत फोटो

शेतकऱ्यांनी केलेला खर्च, मेहनत आणि वेळ वाया गेल्याने ग्रामीण भागात तीव्र संताप व्यक्त होत आहे. कृषी विभागाच्या नोंदीनुसार बुस्टर, यशोदा, महाबीज, इनोवेज, अंकूर, कृषीधन आणि दफ्तरी या कंपन्यांच्या सोयाबीन बियाण्यांबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

तक्रारीनंतर कृषी विभागाने ३ जुलैपासून विशेष पाहणी मोहीम सुरू केली असून आतापर्यंत ३५ शेतांमध्ये प्रत्यक्ष पंचनामा व तज्ज्ञांकडून पाहणी करण्यात आली आहे.

**देवळी तालुकाच सर्वाधिक होरपळला-** एकूण ७२ तक्रारींपैकी ५१ तक्रारी देवळी तालुक्यातील आहेत. आर्वीत ९, वर्धा व हिंगणघाटमध्ये प्रत्येकी ५, तर समुद्रपूर आणि आष्टी येथे प्रत्येकी १ तक्रार नोंदविण्यात आली आहे.

त्यामुळे देवळी तालुक्यातील परिस्थिती सर्वाधिक गंभीर बनली आहे.

### दुबार पेरणीचा डोंगर, मदतीची प्रतीक्षा

सोयाबीन उगवले नसल्याने अनेक शेतकऱ्यांना पुन्हा बियाणे, मजुरी आणि मशागतीचा खर्च करावा लागणार आहे. आधीच आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना हा दुहेरी फटका बसला आहे. दोषी बियाणे कंपन्यांवर कठोर कारवाई करून नुकसानभरपाई आणि दुबार पेरणीसाठी तातडीची शासकीय मदत द्यावी, अशी जोरदार मागणी शेतकरी करीत आहेत.

### तालुकानिहाय तक्रारी

देवळी ५१, आर्वी ९
वर्धा ५, हिंगणघाट ५
समुद्रपूर १, आष्टी १

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अरविंद उपरीकर यांनी सांगितले की, आतापर्यंत ७२ तक्रारी प्राप्त झाल्या असून ३५ तक्रारींची प्रत्यक्ष पाहणी पूर्ण झाली आहे. सोयाबीन, कपाशी किंवा तुरीचे बियाणे उगवले नसल्यास शेतकऱ्यांनी तातडीने कृषी विभागाकडे लेखी तक्रार करावी. नियमानुसार पुढील कार्यवाही केली जाईल.

## आमदारांच्या दुर्लक्षामुळे पारधी मुलांचे शिक्षण धोक्यात

### सातीच्या पारधी मुलांचा जीव नाल्यात...

**कानगाव (देवळी) जनमाध्यम** शिक्षण हा प्रत्येक बालकाचा हक्क अशा घोषणा शासनाकडून दिल्या जात असल्या, तरी देवळी पुलगाव विधानसभा मतदारसंघातील साती येथील पारधी तांड्यावर आजही शिक्षणाचा मार्ग चिखल, नाले आणि खड्ड्यांतूनच जात आहे. शाळेत जाण्याची जिद्द असलेल्या चिमुकल्यांना रोज जीव मुठीत धरून नाला ओलांडावा लागत आहे. त्यामुळे विकासाच्या गप्पा मारणाऱ्या लोकप्रतिनिधींना या मुलांचे अश्रू दिसत नाहीत का, असा प्रश्न ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत.

साती गावालगतच्या पारधी तांड्यावर सुमारे दीड डझन कुटुंबे वास्तव्यास आहेत. मजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या या कुटुंबांच्या मुलांना शिक्षणाची ओढ आहे. मात्र तांड्यापासून गावापर्यंत जाण्यासाठी पक्का रस्ता नाही. मध्ये खोल नाला असल्याने उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा अशा प्रत्येक ऋतूत विद्यार्थ्यांना जीव धोक्यात घालून शाळेत जावे लागते. त्यामुळे अनेक पालक भीतीपोटी मुलांना शाळेत पाठवण्यास धजावत नाहीत.

विद्यार्थ्यांना एसटीच्या मोफत पासची सुविधा असली तरी नियोजित वेळेत बस उपलब्ध नसल्याने त्या योजनेचाही काही उपयोग होत नाही. परिणामी अनेक विद्यार्थ्यांचे शिक्षण अर्धवट सुटण्याची वेळ आली आहे. मागील काही वर्षांत तांड्यातील शाळकरी मुलांची संख्या सातत्याने घटत असल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली. विशेष म्हणजे शासनाने लाखो रुपये खर्च करून नाल्याच्या काही अंतरावर बंधारा उभारला. मात्र जिथे विद्यार्थ्यांना दररोज ये जा करावी लागते, त्या ठिकाणी पूल आणि रस्ता उभारण्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. दाखवण्यासाठी विकास आणि प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना चिखलात ढकलण्याचे राजकारण सुरू आहे का, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

ही वसाहत आजी ग्रामपंचायतीच्या हद्दीत येत असली तरी मूलभूत सुविधांकडे वर्षानुवर्षे दुर्लक्ष झाले आहे. शासनाच्या अनेक योजनांची माहितीही या कुटुंबांपर्यंत पोहोचलेली नाही. मतांच्या वेळी पारधी तांड्यावर जाणारे लोकप्रतिनिधी शिक्षणासाठी रस्ता आणि पूल देताना मात्र का गायब होतात, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.



पारधी समाजातील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची भाषा करणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी आणि आमदार राजेश बकाने यांनी आता घोषणांपेक्षा कृती दाखवावी, अशी मागणी जोर धरत आहे. तांड्यापर्यंत पक्का रस्ता आणि नाल्यावर पूल उभारल्यास शेकडो मुलांच्या शिक्षणाचा मार्ग कायमचा मोकळा होईल. अन्यथा विकासाच्या घोषणा केवळ फलकांपुरत्याच राहतील आणि पारधी समाजाची पुढील पिढीही अंधारातच ढकलली जाईल.

## कर्जमाफीच्या मागणीसाठी शेतकरी अन्नत्यागावर; सहाव्या दिवशी प्रकृती चिंताजनक

### मेलो तरी माघार नाहीः प्रशासनाच्या भूमिकेवर संताप

**सेलू जनमाध्यम :** तालुक्यातील दहेगाव गोसावी येथील शेतकरी अशोक गलांडे यांनी शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमाफीच्या मागणीसाठी २ जुलैपासून सुरू केलेले अन्नत्याग आंदोलन मंगळवारी (७ जुलै) सहाव्या दिवशीही सुरूच होते. सलग सहा दिवस अन्नत्याग केल्याने त्यांची प्रकृती खालावली असून, मागण्या मान्य झाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.



वैद्यकीय तपासणीत त्यांच्या वजनात लक्षणीय घट झाल्याचे तसेच रक्तदाब वाढल्याचे समोर आले आहे. प्रकृती ढासळत असतानाही गलांडे यांनी आंदोलन सुरूच ठेवले आहे. त्यामुळे त्यांच्या आरोग्याबाबत चिंता व्यक्त होत आहे.

आंदोलनाला सहा दिवस पूर्ण होऊनही तालुका व जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी किंवा लोकप्रतिनिधींनी आंदोलनस्थळी भेट न दिल्याने आंदोलनकर्त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. शेतकरी जीव धोक्यात घालून आंदोलन करत असताना प्रशासनाकडून कोणतीही ठोस दखल घेतली जात नसल्याचा आरोप त्यांनी केला.

कर्जमाफीच्या मागणीकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान, अशोक गलांडे यांच्या प्रकृतीवर वैद्यकीय पथकाकडून नियमित लक्ष ठेवण्यात येत असून, परिस्थिती गंभीर बनू नये यासाठी प्रशासनाने तातडीने पुढाकार घ्यावा, अशी मागणी परिसरातील शेतकरी व नागरिकांकडून होत आहे.

## सेलडोहजवळील हिवरा रस्त्याची दुरावस्था

### पावसामुळे चिखल, विद्यार्थ्यांचे हाल बेहाल

**सेलु जनमाध्यम :** गेल्या काही दिवसांपासून पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे सेलडोह पासून ३ कि.मी. अंतरावर हिवरा हे गाव आहे या रस्त्यावर एक कापसाची जिनिंग असल्याने नेहमीच जड वाहनांची ये-जा सुरु असते.यामुळे हा रस्ता पूर्णपणे चाळणी झाला आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने रस्ता चिखलमय झाला आहे. या रस्त्यावरून रोज अनेक विद्यार्थी शाळा-कॉलेजला सेलडोह,सिंदी रेल्वे, वर्धा,सेलु येथे ये-जा करतात. परंतु सध्या रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाल्याने विद्यार्थ्यांना पायदळ जातानाही तारेवरची कसरत करावी लागत आहे.

रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे आणि गुडघाभर चिखल साचल्याने सायकल चालवणे तर दूरच, पण चालणे देखील कठीण झाले आहे. अनेक विद्यार्थिनींना ओले कपडे आणि चिखलाने माखलेले युनिफॉर्म घेऊनच शाळेत जावे लागत आहे.

या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी तेथील नागरिकांनी जिनिंग ला दिलेले ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याची मागणी धरुन लावली आहे. यासाठीविद्यार्थ्यांनी आमदार समीर कुणावर यांना साद घातली आहे.परंतु त्यांचेकडूनही उन्हाळ्याचे दिवसापासून पाठपुरावा केल्या जात असून ही सपशेल दूर्लक्ष होत असल्याने पावसाळ्यात विद्यार्थ्यांना शाळेत पोहोचणे खूप अवघड झाले आहे. अपघाताची भीती नेहमीच असते. कृपया आमच्या रस्त्याचे काम लवकरात लवकर करून द्यावे अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे.



पावसाळा अजून संपलेला नाही. त्यामुळे हा रस्ता लवकरात लवकर डांबरीकरण किंवा खडीकरण करून वाहतुकीसाठी योग्य करावा, अशी मागणी गावकरी आणि विद्यार्थी वर्गातून जोर धरत आहे.

प्रशासन आणि संबंधित आमदारांनी याची तातडीने दखल घेऊन विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी पावले उचलावीत, अशी सर्वत्र मागणी होत आहे.

### कर्जाच्या विळख्यात आणखी एक बळी

## अंबिकापूरच्या शेतकऱ्याची विहिरीत उडी घेऊन आत्महत्या

**आष्टी (शहीद) जनमाध्यम :** आष्टी तालुक्यातील अंबिकापूर येथील कर्जबाजारी शेतकरी प्रभाकर नत्थूजी डोळस (वय ६५) यांनी विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. सोमवारी दुपारी सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास शेतातील विहिरीत त्यांचा मृतदेह तरंगताना आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली.



मिळालेल्या माहितीनुसार, प्रभाकर डोळस यांच्याकडे सुमारे दोन एकर शेती होती. त्यांच्यावर स्टेट बँकेचे सुमारे दोन लाख रुपये आणि बँक ऑफ इंडियाचे सुमारे एक लाख रुपये असे एकूण तीन लाख रुपयांचे कर्ज होते. सततची नापिकी, शेतीमालाला मिळणारा अपुरा भाव आणि वाढत्या कर्जबोज्यामुळे ते आर्थिक विवंचनेत असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली. यंदाच्या हंगामात त्यांनी पेरणी न करता चणा पिकासाठी शेत राखून ठेवले होते.

घटनेची माहिती मिळताच आष्टी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. पोलीस उपनिरीक्षक हर्षल नगरकर यांच्या मार्गदर्शनाखाली मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी आष्टी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला. प्रभाकर डोळस यांच्या पश्चात एक मुलगा व दोन विवाहित मुली असा परिवार आहे.

## मकोकातील फरार आरोपीला अखेर बेड्या

**वर्धा जनमाध्यम:** मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आलेल्या गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने अखेर बेड्या ठोकल्या. दहेगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सुजातपूर येथून मंगेश चिंतामण मडावी (वय ३६, रा. इतवारा बाजार, वर्धा) याला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली.

६ मे २०२६ रोजी इतवारा परिसरातील विकास पांडे यांच्यावर चाकूने जीवघेणा हल्ला झाल्याप्रकरणी अमोल गणेश गेडाम आणि मंगेश मडावी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला होता. गुन्हा दाखल होताच दोन्ही आरोपी फरार झाले होते. त्यापैकी अमोल गेडाम याला यापूर्वीच अटक करण्यात आली होती, मात्र मंगेश मडावी पोलिसांना गुंगारा देत होता. स्थानिक गुन्हे शाखेला मंगेश मडावी हा सुजातपूर येथे लपून बसल्याची गोपनीय माहिती मिळताच पोलिसांच्या पथकाने तातडीने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर त्याला अटक करून पुढील कायदेशीर कारवाई करण्यात आली.



ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल व अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विनोद चौधरी, पोलिस उपनिरीक्षक विजयसिंग गोमलाडु, भुषण निघोट, धर्मेंद्र अकाली, अमोल नगराळे, मंगेश चावरे आणि अक्षय राऊत यांच्या पथकाने केली.


### नावात बदल

माझे पासपोर्ट नंबरAA547667 वरील माझे **ANANDKUMAR DARDA** असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील **ANAND PRAFULLAKUMAR DARDA** नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :-** आर के कॉलनी नाचणगाव रोड पुलगाव ता देवळी जिल्हा वर्धा ४४२३०२

### नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर A2539276 वरील माझे **KISHOR ARATMAL KRUPLANI** असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील **KISHOR ARATMAL KRIPLANI** नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :-** पोद्दार बगीचा आंध्रा बँक जवळ वर्धा ४४२००१

### नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर N8916157 वरील माझे **PRAMILA NAGRALE** असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील **PREMILA DHARMAPAL NAGARALE** नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :-** वॉर्ड नं १ केदार लेआऊट देवळी जिल्हा वर्धा ४४२१०१

### नावात बदल

माझे पूर्वी **SHABINAANJUM RAHEMANKHA PATHAN** असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील **SHAHIN SHAJID SAIYYAD** नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :-** नूर मस्जिद जवळ डायमंड सोसायटी साई ताज नगर बोरी नागपूर ४४११०८


## आगाराचा हलगर्जीपणा की विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ

### तक्रारींची दखल नाही, विद्यार्थ्यांचा ठिय्या आंदोलनाचा इशारा

**आर्वी जनमाध्यम :** आर्वी एसटी आगाराच्या कथित बेजबाबदार आणि मनमानी कारभाराचा फटका थेट विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बसत आहे. वेळापत्रकाची अक्षरशः पायमल्ली करत बस फेऱ्या उशिराने सोडल्या जात असल्याने नांदपूर येथील मॉडेल हायस्कूलमधील शंभरहून अधिक विद्यार्थी रोज शाळेत उशिरा पोहोचत आहेत. वारंवार तक्रारी, निवेदने आणि पत्रव्यवहार करूनही आगार प्रशासन ढिम्म असल्याचा आरोप होत असून, संतप्त विद्यार्थ्यांनी आता आर्वी बस आगारात ठिय्या आंदोलनाचा इशारा दिला आहे.

नांदपूर येथील मॉडेल हायस्कूलमध्ये अंबिकापूर, राजापूर, इठलापूर, अहीरवाडा आदी गावांतील विद्यार्थी एसटी बसने ये-जा करतात. मात्र सकाळी १०.४५ वाजेपर्यंत पोहोचणे अपेक्षित असलेली बस प्रत्यक्षात दुपारी १२.३० वाजता पोहोचत असल्याचा आरोप आहे. परिणामी विद्यार्थ्यांचे दोन-दोन तासांचे अध्यापन बुडत आहे. सायंकाळी ५.१५ वाजता पोहोचणारी बसही तब्बल ६.३० वाजता येत असल्याने विद्यार्थी अंधारात घरी परतत आहेत.

या गंभीर समस्येबाबत शाळेचे मुख्याध्यापक सतीश लोखंडे यांनी अनेकदा लेखी पत्रव्यवहार करून बससेवा नियमित करण्याची मागणी केली. मात्र त्यानंतरही कोणतीही सुधारणा न झाल्याने आगार प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

शिक्षक उमाकांत पाटील यांनी सांगितले की, बस वेळेवर न आल्याने विद्यार्थ्यांना एक ते दोन तास बसस्थानकावर ताटकळत उभे राहावे लागते. यामुळे शैक्षणिक नुकसान तर होतच आहे, शिवाय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. दरम्यान, बससेवा तातडीने नियमित न झाल्यास आर्वी बस आगारात ठिय्या आंदोलन छेडण्याचा इशारा विद्यार्थ्यांनी दिला आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणापेक्षा एसटी प्रशासनासाठी मनमानी महत्त्वाची आहे का असा प्रश्न पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. आता तरी संबंधित अधिकाऱ्यांना जाग येणार की विद्यार्थ्यांचा संताप आंदोलनाच्या रूपाने रस्त्यावर उतरणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


## Municipal Council, Wardha,

## Tender Notice

**Tender Notice No.3329/2026**
**Dt.07.07.2026**

Municipal Council, Wardha, invited proposals from reputed and experienced bidders/contractors to participate in the competitive bidding process of Street Light arrangement near Chatrapati Shivaji Maharaj Square under M.C.Wardha.

For the detailed Tender document, interested bidders should visit Electrical Department Muncipal Council, Wardha Tender submission would be Offline and the deadline to submit the proposals is 10.07.2026 upto 5.45 pm.

| President | Dy.President | Chief Officer, |
| --- | --- | --- |
| Muncipal Council, | Muncipal Council, | Muncipal Council, |
| Wardha | Wardha | Wardha |

### प्रवेश जाहिरात

हजरत अबुबकर सिद्दीक उर्दु अध्यापक विद्यालय
डॉ. जाकीर हुसैन कॉलनी वर्धा,

व्यवस्थापन कोटा प्रवेश प्रक्रिया

D.EL.ED प्रथम वर्ष २०२६-२७
विशेष फेरी वेळापत्रक

ऑनलाईन अर्ज भरने :- दि.०८/०७/२०२६ ते १२/०७/२०२६
विद्यालयात अर्ज जमा करणे व प्रवेश निश्चित करणे: ०८/०७/२०२६ ते १४/०७/२०२६
अधिक माहितीसाठी व प्रवेश सुचना :- www.maa.ac.in

प्राचार्य
मो.क. :- ९९२२१८२४७४

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# मुली शिक्षणादरम्यान गर्भवती होतात;जबाबदारी सरकारवर येते

## यूपीच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल | प्रेम करा पण लग्न आत्मनिर्भर झाल्यावर







**लखनऊ/वृत्तसंस्था** : राज्यपाल आनंदीबेन पटेल यांनी मंगळवारी सांगितले की, अभ्यासादरम्यान मुली गर्भवती होतात. काहींना बाळही होते. त्या बाळाची जबाबदारी कोणावर येते, हे तुम्हाला माहीत आहे का? सरकारवर येते. असे पराक्रम तुम्ही करू नका. या पराक्रमांपासून दूर राहा.लखनऊ येथील डा. एपीजे अब्दुल कलाम प्राविधिक विद्यापीठाच्या २४ व्या दीक्षांत समारंभात कुलाधिपती म्हणून उपस्थित असलेल्या राज्यपालांनी सांगितले की,मी प्रेमविवाहाच्या विरोधात नाही, तुम्ही प्रेमविवाह करा. तुम्हाला त्यांच्यावर प्रेम आहे, त्यांना तुमच्यावर प्रेम आहे तर लग्न करा. पण, लग्न तेव्हाच करा जेव्हा तुम्ही आत्मनिर्भर व्हाल. माझा मुलगा बंगळुरूला शिकायला गेला. मी त्याला सांगितले होते की, जर एखादी मुलगी आवडली तर सांग, आम्ही लग्न लावून देऊ. त्याला कोणीच आवडली नाही.

**तंत्रज्ञानाचे केवळ ग्राहक न बनता, त्याचे निर्मातेही बना** : तंत्रज्ञानामुळे जर आपली ओळख हरवत असेल तर ते योग्य आहे का? खरा विकास तोच आहे जो आधुनिकता आणि परंपरा यांचा उत्तम समन्वय साधतो. आज अनेक विद्यापीठांमध्ये हस्तलिखिते पडून आहेत, त्यांना कोणी पाहणारे नाही. म्हणूनच, आपल्या पंतप्रधानांनी दुर्मिळ हस्तलिखितांच्या डिजिटल संरक्षणासाठी त्यांना दिल्लीतील एका केंद्रात एकत्र केले आहे. तुम्ही केवळ तंत्रज्ञानाचे ग्राहक बनू नका, तर त्याचे निर्मातेही बना.

**आम्ही घाबरणारे नाही, घाबरवणारेही नाही** : DRDO चे वैज्ञानिक कृत्रिम क्षेपणास्त्रेही बनवत आहेत. आजूबाजूचे लोक भारताला घाबरवतात ना? आम्ही घाबरणारे नाही. घाबरवणारेही नाही. आधी आम्ही सर्व क्षेपणास्त्रे आणि तोफा परदेशातून मागवत होतो, आज अशी वेळ आली आहे की आम्ही परदेशांना देतो. अलीकडेच क्षःच धुना गिरीसह एकूण ३ युद्धनौका सैन्याला सुपूर्द करण्यात आल्या आहेत. यांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यांची संकल्पना आणि निर्मिती पूर्णपणे स्वदेशी आहे. भविष्यात अशा शस्त्रांच्या निर्मितीचा विचार करा. अशाच प्रकारे स्वदेशी तंत्रज्ञानाने बनवलेल्या ४० विमानांची निर्मितीही होत आहे. तुमचे स्वप्न असायला हवे की आपण यातही काम केले पाहिजे.

**कुलगुरूंनी सुवर्णपदक विजेत्या विद्यार्थ्यांना मंचावर पालकांसह बोलावले. सरकारचा पैसा फक्त पूर्ण खर्च करण्यासाठी नाही** : ३ विद्यापीठांना भेट दिली, जिथे प्रशासकीय कारिडार होता. एका कोप-यात प्रशासकीय इमारतीत २ मजली ग्रंथालय बांधले आहे. ग्रंथालयात मुले १ किमी दूरून वाचायला जातात, २ किमी दूर वसतिगृह आहे. तिथे कोण वाचणार? राज्य सरकारने जे बजेट दिले, त्याचा फक्त उपयोगच करायचा आहे का? एक अॅक्टिव्हिटी रूम हवी असेल तर मोठे मोठे ३ हॉल का बांधले? तुमच्या बांधकाम विभागाची अशी अवस्था आहे का? कधीकधी असे वाटते की बनावट पदवी मिळवून बांधकाम विभागात भरती झाले नाहीत ना.

**२०० विद्यार्थ्यांच्या वसतिगृहातील धुण्याचे ठिकाण घरातील इतक्याच आकाराचे** : वर्गखोल्यांच्या रचनेत, एनईपीनुसार ६० पेक्षा जास्त विद्यार्थी नसावेत. वसतिगृहाच्या वरच्या मजल्यावर जो पंखा लावला आहे, त्याला डोके लागत आहे. लावणा-याला दिसले नाही, पण तुम्हाला तरी दिसले पाहिजे. मी जेव्हा विद्यापीठात जाते, अंगणवाडीत जाते, तेव्हा खूप निराशा होते. खोलीत स्विच बोर्ड चुकीच्या ठिकाणी असतात. मी अंगणवाडीत आरसा दिला, तेव्हा तो वर टांगण्यात आला. खिडक्या आणि स्टापरसुद्धा चुकीच्या ठिकाणी असतात. वसतिगृहात २०० मुले आहेत, जी मेसमध्ये जेवतात आणि त्यांची भांडी धुण्यासाठी घरातील इतक्याच आकाराचे धुण्याचे ठिकाण असते.

**खिडकी नसलेले वसतिगृह, टाकीत माकड आंघोळ करतात** : मुलींच्या वसतिगृहातही त्रुटी आढळल्या. आतमध्ये कोणतीही खिडकी नव्हती. पुस्तके ठेवण्यासाठी जागा नव्हती. जेव्हा उघडले, तेव्हा आतून उंदीर बाहेर आला. तिस-या मजल्यावर पाण्याची टाकी आहे, ज्यावर कोणतेही झाकण नाही. माकडं त्यात आंघोळ करतात. एक वर्गखोली बघायला गेले, तेव्हा ब्लॅकबोर्डची उंची पाहिली. त्याला मुले पोहोचू शकत नाहीत. मेसमध्ये कोणता मसाला येतो, हे बघत राहा. मुदतवाढ संपलेला तर येत नाही ना? नॉनव्हेज तर येत नाही ना? परिस्थिती अशी होती की छतावर एक-एक फुटाची झाडे उगवली होती. मी माझ्या PSO ला सांगितले की, यांना उपटून टाका.

## कोणताही नवीन पक्ष एनडीएमध्ययेणार नाही

**मुंबई/प्रतिनिधी** : 'महाराष्ट्रातून एनडीएमध्ये कोणताही नवीन पक्ष येणार नाही. आता जे पक्ष आहेत, तेच पक्ष राहतील. कोणताही नवीन पक्ष एनडीएमध्ये येण्याची आमची कुठलीही चर्चा नाही', असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एनडीएमध्ये सामील होणार असल्याच्या चर्चा फेटाळून लावल्या. मुख्यमंत्री फडणवीस दिल्लीत माध्यमांशी बोलत होते. भाजपाचे नेते आणि खासदार विनोद तावडे आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते जयंत पाटील यांची बैठक झाल्याचे वृत्त समोर आल्यानंतर या चर्चेला तोंड फुटले. राष्ट्रवादी काँग्रेस एनडीएसोबत जाउन महायुती सरकारमध्ये सामील होणार असल्याचे बोलले गेले. पण, या चर्चा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फेटाळल्या आहेत.



**पवारांचे खासदार-आमदार तोडण्याचा प्रयत्न नाही-** सोबतचे लोक सोडून जाउ नये म्हणून अशा स्वरुपाच्या बातम्या पेरल्या जात आहेत का?, या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'आम्ही सोबतच्या कोणालाही तोडण्याचा प्रयत्न करत नाही. जे त्यांच्यासोबत आहेत, शरद पवारांच्या पक्षात जे खासदार आणि आमदार आहेत, त्यांना कोणालाही तोडण्याचा आमचा प्रयत्न नाही', असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसबद्दल गेल्या काही दिवसांपासून वेगवेगळ्या चर्चा सुरू आहे. एकीकडे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार काँग्रेसमध्ये विलीन करणार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले गेले. तर, दुसरीकडे एनडीएमध्ये सामील होणार असल्याचीही चर्चा आहे. जयंत पाटील यांनी विनोद तावडे यांची भेट घेतल्याने या चर्चेला हवा मिळाली, पण सुप्रिया सुळे यांनी असे काही नसल्याचे सांगितले.

## जयंत पाटील-विनोद तावडे यांच्यात गुप्त बैठक?

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या राजकीय घडामोडींच्या चर्चा रंगू लागल्या आहेत. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील आणि भाजपाचे वरिष्ठ नेते विनोद तावडे यांची एका पंचतारांकित हाटेलमध्ये भेट झाल्याची माहिती आहे. शुक्रवारी झालेल्या या भेटीमुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात विविध तर्कवितर्क लढवले जात आहेत. या भेटीनंतर शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीत सहभागी होणार का? अशा चर्चांना वेग आला आहे.माहितीनुसार, शरद पवारांची राष्ट्रवादी महायुतीत सहभागी झाल्यास पक्षाच्या वाट्याला काय येउ शकते याबाबत बैठकीत चर्चा झाल्याचे बोलले जात आहे. जयंत पाटील आणि विनोद तावडे यांच्या भेटीत नेमकी कोणत्या विषयावर चर्चा झाली. याबाबत दोन्ही बाजूंनी अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही परंतु मागील काही दिवसांपासून शरद पवारांची राष्ट्रवादी एनडीएचा घटक पक्ष होउ शकतो अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. अशावेळी पाटील-तावडे भेट महत्त्वाची मानली जाते. शुक्रवारी दुपारी सव्वा तीन ते सव्वा सहा वाजेपर्यंत या दोन्ही



नेत्यांमध्ये भेट झाली. या भेटीत एनडीएतील सहभागावर चर्चा झाल्याची माहिती आहे. विनोद तावडे यांच्या भेटीनंतर जयंत पाटील यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीतील एका वरिष्ठ नेत्याची भेट घेतली. सध्या अजित पवारांची राष्ट्रवादी महायुतीचा घटक पक्ष आहे. शरद पवारांची राष्ट्रवादी महायुतीत आल्यास दोन्ही राष्ट्रवादीचं भवितव्य काय असेल यावर या नेत्यांमध्ये चर्चा झाली. या भेटीबाबत माध्यमांच्या प्रतिनिधींनी जयंत पाटील यांच्याकडे विचारणा केली तेव्हा त्यांनी भेट झाल्याचे मान्य केले. परंतु ही भेट अनौपचारिक होती असे त्यांनी म्हटले. परंतु या भेटीमुळे राज्यातील राजकीय समीकरणे बदलणार या चर्चांनी जोर धरला आहे. तर शरद पवारांची राष्ट्रवादी महायुतीत सहभागी होणार का, तावडे-पाटील यांची भेट यावर पत्रकारांनी रोहित पवारांना प्रश्न केला. त्यावेळी याबाबतची कुठलीही चर्चा आमच्या पक्षात झाली नाही. आम्ही विद्यार्थी, शेतक-यांचे प्रश्न घेउन रस्त्यावर उतरत आहोत. त्यामुळे ज्या काही चर्चा सुरू आहेत त्या फक्तमाध्यमात आहेत असा दावा रोहित पवारांनी केला. तर जयंत पाटील आणि विनोद तावडे यांनी एकत्र काम केले आहे. या दोघांमध्ये मैत्री आहे. त्यामुळे मैत्रीच्या नात्याने ते भेटले असावेत अशी प्रतिक्रिया मंत्री दत्ता भरणे यांनी दिली. दरम्यान, शरद पवार यांच्या पक्षाच्या भूमिकेबाबत गेल्या काही दिवसांपासून विविध तर्कवितर्क सुरू आहेत.

## राममंदिर देणगी चोरी- ७० घटना CCTVत कैद:आरोपी खिसे-बूटात नोटांचे बंडल लपवताना


**अयोध्या/वृत्तसंस्था** :अयोध्या येथील राममंदिरातील देणगी चोरी प्रकरणी ट्रस्टची बैठक तथा चंपत राय व अनिल मिश्रा यांच्या राजीनाम्यानंतर, सोमवारी रात्री



### अनिल मिश्रांचे दुर्लक्ष- SIT चा ठपका

९ वाजता विशेष तपास पथकाचा प्राथमिक अहवाल समोर आला.या अहवालानुसार, २७ एप्रिल ते ५ जून दरम्यान सीसीटीव्हीमध्ये सुमारे ७० संशयास्पद घटना कैद झाल्या. फुटेजमध्ये पोलिसांच्या ताब्यात असलेले ८ आरोपी नोटांची बंडले खिसे आणि बुटांमध्ये लपवताना दिसले.SIT ने डा. अनिल मिश्रा यांच्यावरही गंभीर आरोप केले आहेत. SIT ने म्हटले आहे की, आधीपासून तयार केलेल्या तपासणी प्रणालीतील त्रु टींसाठी अनिल मिश्राच जबाबदार आहेत.चंपत राय यांचा चालक टिन्नू कोणत्याही आदेशाशिवाय मोजणी कक्षाची चावी स्वतःजवळ ठेवत असे. एवढेच नाही तर त्याने शिफारस करून आपला पुतण्या मनीष यादव याला देणगी मोजणीच्या कामात लावले होते. राममंदिरातील देणगी चोरीच्या तपासासाठी यूपी सरकारने SIT स्थापन केली होती. पथकाने २३ जून रोजी आपला प्राथमिक अहवाल सरकारला सादर केला होता.SIT मध्ये लखनउ विभागाचे विभागीय आयुक्त विजय विश्वास पंत, लखनउ रेंजचे आयजी किरण एस आणि यूपी सरकारमधील वित्त विभागाचे विशेष सचिव नील रतन यांचा समावेश आहे.

चोरीसाठी जबाबदार अनिल मिश्राः देणगी मोजण्याची संपूर्ण प्रक्रियाच त्रु टींनी भरलेली आढळली. डा. अनिल मिश्रा आर्थिक व्यवहार आणि रोख संकलन व्यवस्थापनावर लक्ष ठेवत होते. बँकेसोबत ठरवलेले SOP (मानक कार्यप्रणाली) आणि सहमतीचे मुद्दे तयार करण्यातही त्यांची महत्त्वाची भूमिका आहे.निगरानी प्रणालीतील त्रु टीः तपासणी करण्यात येत नसल्याची माहिती अनिल मिश्रा यांना अंतर्गत माध्यमातून देण्यात आली होती. पण त्यानंतरही त्यांनी कोणताही प्रभावी लेखी आदेश-निर्देश जारी केला नाही. आधी ठरवलेल्या शोध घेण्याच्या प्रणालीतही अनिल मिश्रा यांच्यामुळेच टाळाटाळ करण्यात आली.हजेरी नाही, कागदपत्रे नाहीत, त्यामुळे चोरांची हिंमत वाढली: कर्मचा-यांची बायोमेट्रिक हजेरी, निश्चित गणवेश, वैयक्तिक्र वस्तू खोलीत नेण्यावर बंदी, दानपेट्या, त्यातून निघालेल्या पैशांची-नोटांची नोंद, दैनंदिन अहवालासारख्या व्यवस्था लागू करण्यासाठी ठोस पावले उचलली नाहीत.



कमकुवत देखरेखीमुळे आरोपींची नियत बिघडली आणि ते रामललाच्या खजिन्यातून सतत चोरी करत राहिले. कपड्यांमध्ये, खिशात, बूट-मोज्यांमध्ये नोटांची बंडले लपवली: २७ एप्रिल ते ५ जून २०२६ पर्यंत मिळालेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये समोर आले की, देणग्यांची मोजणी होते, त्या खोलीत काम करणारे काही कर्मचारी वारंवार नोटांची बंडले व सुट्या नोटा त्यांच्या कपड्यांमध्ये, खिशांमध्ये, बूट-मोज्यांमध्ये लपवताना दिसले. प्रवेश-निर्गमन गेटवर तपासणी नसल्यामुळे रोख रक्कम बाहेर नेणे शक्य झाले.खिशात नोट भरताना, सहकारी इशारा करून सावध करत असतः ही एखाद दुसरी घटना नव्हती, तर सातत्याने घडलेली एक संघटित कृती होती. तपासात अशा ७० घटनांची नोंद झाली. काही कर्मचारी इशा-यांद्वारे एकमेकांना सावध करताना दिसले. एसआयटीनुसार, अविनाश शुक्ला, अनुकल्प मिश्रा, लवकुश मिश्रा, मनीष कुमार यादव, करुणेश पाण्डेय आणि रमाशंकर मिश्रा हे पहिल्या दृष्टीक्षेपातच यात सामील असल्याचे दिसले. सीसीटीव्ही फुटेज, जप्ती आणि बँक खात्यांच्या तपासणीत त्यांच्याविरुद्ध पुरेसे पुरावे मिळाले आहेत.अहवालात या सर्वांविरुद्ध चोरी, फौजदारी विश्वासभंग, फौजदारी गैरवापर, चोरीची मालमत्ता बाळगणे, कटकारस्थान यासह अनेक कलमांखाली गुन्हा दाखल करण्याची शिफारस करण्यात आली आहे. एसआयटीच्या अहवालाच्या आधारेच विश्वस्त कृष्ण मोहन यांनी गुन्हा दाखल केला होता. नंतर आरोपींना अटक करण्यात आली. आता सर्वजण तुरुंगात आहेत.

CIVIL JUDGE SENIOR DIVISION
IN THE COURT OF Shri R.M. Choutre
2nd Jt CJSD Amravati, Amravati, Amravati.

SUMMONS FOR SETTLEMENT OF ISSUES
(O. 5, R. 1, 5.)

Spl.C.S./105/2021
Bank of Maharashtra Through Branch Manager
Rahul Jain Vs Sachin Pandurang Koshti
Next Date : 16/07/2026

To,
Sachin Pandurang Koshti
R/o. Durgapur Road, New Town Badnera Tq. Dist. Amravati., Amravati, AMRAVATI, MAHARASHTRA

Whereas Bank of Maharashtra Through Branch Manager Rahul Jain has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in this Court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the suit, [illegible] on the 16/07/2026 at at 11:00 o'clock in the forenoon, to answer the claim; and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base your defence or claim for set-off or counterclaim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set-off or counterclaim, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement.
Take notice that, in default of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of the Court, this 11-05-2026

Seal
2nd Jt CJSD Amravati

## पंजाबमधील ड्रग्ज तस्करीतील फरार आरोपी नांदेडात जेरबंद

**नांदेड /प्रतिनिधी-**पंजाब राज्यातील अंमली पदार्थ(हेराईन) तस्करीच्या गंभीर गुन्ह्यात फरार असलेल्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तात्काळ कारवाई करत ४ जुलै रोजी अटक केली. राज्यांमधील प्रभावी समन्वयातून करण्यात आलेली ही कारवाई गुन्हेगारांविरुद्धच्या कठोर भूमिकेचे उदाहरण ठरली आहे.गुरु द्वारा परिसरात ४ जुलै रोजी संशयास्पद हालचाली करणा-या एका तरुणाची चौकशी करण्यात आली. त्याने त्याचे नाव जुगराज सिंह उर्फ गोलू किक्करसिंह ढिल्लो (रा. सराई अमानत खान, जि. तरनतारण, पंजाब) असे सांगितले. त्याची सखोल पडताळणी केली असता तो पंजाब राज्यातील अँटी नार्कोटिक्स टास्क फोर्स अमृतसर येथे दाखल असलेल्या गुन्हा (क्र. ९८/२०२६ )मधील फरार आरोपी असल्याचे निष्पन्न झाले. पंजाब पोलिसांना तपासादरम्यान आरोपी नांदेडमध्ये लपून बसल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पंजाबचे सहायक पोलिस निरीक्षक सत्यपालसिंह यांच्या नेतृत्वाखाली पंजाब पोलिसांचे पथक ४ जुलै रोजी नांदेडला पोहचले. त्यांनी नांदेडचे पोलिस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांची भेट घेउन सविस्तर माहिती दिली.त्यानंतर अत्यंत गोपनीय पध्दतीने एसपी निलाभ रोहन यांनी एक खास पथक नेमले व आरोपीवर पाळत ठेवली. पोलिसांनी सापळा रचून रविवारी जुगराजसिंहला ताब्यात घेतले. ५ जुलै रोजी नांदेड पोलिसांच्या मदतीने त्याला न्यायालयात हजर केल्यानंतर नांदेडच्या न्यायालयाने त्याची तीन दिवसांची प्रवास कोठडी मंजूर केली. त्यानंतर पंजाब पोलिस आरोपीला घेउन पुढील तपासासाठी पंजाबकडे रवाना झाले.यानंतर नांदेड पोलिसांनी आरोपीला नियमानुसार अटक करून पंजाब पोलिसांच्या ताब्यात देण्यासाठी आवश्यक न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण केली. संबंधित न्यायालयाकडून ट्रान्झिट रिमांड मंजूर झाल्यानंतर आरोपीला पुढील तपासासाठी पंजाब पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.ही कारवाई पोलिस अधीक्षक नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अतुल भोसले यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या मोहिमेत सहाय्यक पोलिस निरीक्षक विठ्ठल घोगरे, पोलिस उपनिरीक्षक हरजिंदरसिंह चावला, गुरु दीपसिंग कालरा, राजू बोधगीरे, साहेबराव शिंदे, गोविंद राठोड, विश्वनाथ पवार यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सक्रिय सहभाग घेतला. दोन राज्यांमधील समन्वयाच्या माध्यमातून गंभीर गुन्ह्यांतील आरोपींना अटक करून कायद्याच्या कचाट्यात आणण्याच्या दृष्टीने नांदेड पोलिसांची ही कारवाई उल्लेखनीय मानली जात आहे.

## चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्र परिसरातील पायाभूत सुविधांचे नूतनीकरणाबरोबरच डीपीआर करण्यात येणार

**मुंबई /प्रतिनिधी-** चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राच्या भटाडी खाणीतून कोळसा वाहतूक करणा-या पाईप कन्व्हेअर बेल्टसह परिसरातील जुन्या पायाभूत सुविधांचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत आज दिली.सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भटाडी खाणीतून कोळसा वाहतूक



करणा-या पाईप कन्व्हेअर बेल्ट परिसरात ५ मे २०२६ रोजी आग लागण्याची घटना घडली होती. ही आग कन्व्हेअर बेल्टच्या लोडिंग अथवा अनलोडिंग भागात लागलेली नव्हती. कन्व्हेअर बेल्ट ज्या भागातून जातो, त्या परिसरात अनेक शेतक-यांची शेती आहे. शेतातील अवशेष जाळल्यामुळे लागलेल्या आगीचा परिणाम कन्व्हेअर बेल्ट परिसरावर झाला आणि त्यातून ही घटना घडली. या घटनेत कोणतेही नुकसान झाले नसून आग तातडीने नियंत्रणात आणण्यात यश आले होते. आपत्कालीन प्रतिसाद पथकही अपेक्षित वेळेत घटनास्थळी पोहोचल्यामुळे परिस्थितीवर वेळीच नियंत्रण मिळविणे शक्य झाले. सदर प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्या परिसरातील नागरिकांमध्ये गवत व पीक अवशेष उघड्यावर न जाळण्याबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून आवश्यकतेनुसार जनजागृती करण्यात येईल. त्याचबरोबर जुन्या झालेल्या पायाभूत सुविधा व यंत्रणांचे नूतनीकरण करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी डीपीआर तयार करून टप्प्याटप्प्याने नूतनीकरणाची कामे हाती घेण्यात येतील, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## जळगाव जामोद येथील बेपत्ता महिलेच्या प्रकरणाची विभागीय चौकशी तीन महिन्यांत पूर्ण करा

**मुंबई** : जळगाव जामोद येथील बेपत्ता महिलेच्या प्रकरणात पोलिसांनी अत्यंत गंभीर स्वरूपाची चूक केली आहे. या प्रकरणातील संबंधित पोलिस अधिकारी आणि कर्मचा-यांवर नियमानुसार ठोस कारवाई करण्यात येत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात दिली.विधानसभेत सदस्य रोहित पवार यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संबंधित महिला बेपत्ता असल्याची तक्रार दाखल होती. त्यानंतर एक मृतदेह



सापडल्यानंतर तो याच महिलेचा असल्याचा निष्कर्ष पोलिसांनी घाईघाईने काढला. कोणताही अंतिम निष्कर्ष किंवा वैज्ञानिक पडताळणी न करता तपास पूर्ण झाल्याचे दाखविण्यात आले. एवढेच नव्हे, तर त्या महिलेच्या आई-वडिलांनाच तिच्या खुनाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली.मात्र, त्यानंतर संबंधित महिला जिवंत असल्याचे समोर आले आणि ती स्वतः पोलिस ठाण्यात हजर झाली. त्यामुळे पोलिसांना तिच्या आई-वडिलांची सुटका करावी लागली. दरम्यान, सापडलेल्या मृतदेहाचा स्वतंत्र तपास सुरू असून तो पूर्ण करण्यात येत आहे.या संपूर्ण प्रकरणात पोलिसांचे वर्तन अत्यंत चुकीचे असल्याचे स्पष्ट झाल्यामुळे संबंधित गुन्हे शाखेतील सर्व पोलिस निरीक्षक, पोलिस उपनिरीक्षक तसेच; या प्रकरणाशी संबंधित सर्व अधिका-यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच त्यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हेही दाखल करण्यात येणार आहेत. निलंबन ही केवळ प्राथमिक कारवाई असून, ज्यांचा या प्रकरणाशी थेट संबंध असल्याचे सिद्ध होईल अशा अधिका-यांवर विहित प्रक्रिया पूर्ण करून सेवेतून निष्कासनाची कारवाईही करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. राज्य शासनाने विकसित केलेल्या नवीन कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या मदतीने राज्यातील सुमारे १,६०० ते १,७०० बेपत्ता व्यक्तींच्या प्रकरणांचे विश्लेषण करण्यात आले आहे. त्यातून सात मृतदेहांची ओळख पटविण्यात यश आले आहे. या प्रकरणाचाही तपास त्याच तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सुरू आहे. या प्रकरणामुळे अन्याय सहन करावा लागलेल्या पीडित कुटुंबाला राज्य सरकारतर्फे आर्थिक मदत देण्यात येणार आहे. या संपूर्ण प्रकरणाची विभागीय चौकशी तीन महिन्यांत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले .

## मुंबई विमानतळावर 10.65 कोटी रुपये किमतीचे कोकेन जप्त

**मुंबई** : अंमली पदार्थांच्या तस्करीविरुद्ध केलेल्या एका मोठ्या कारवाईत, महसूल गुप्तचर संचालनालयाच्या (डीआरआय) मुंबई विभागीय पथकाने, फ्रीटाऊनहून नैरोबीमार्गे मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर (सी एस एम आय ए) आलेल्या एका महिला प्रवाशाकडून २.१२८ किलोग्राम कोकेन जप्त केले. या अंमली पदार्थाची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत अंदाजे १०.६५ कोटी रुपये इतकी आहे.प्राप्त झालेल्या विशिष्ट गुप्त माहितीच्या आधारे, अधिका-यांनी रविवारी (५ जुलै, २०२६) एका महिला प्रवाशाला हटकले. या प्रवाशाच्या सामानाची एक्स-रे मशीनद्वारे तपासणी केली असता, तिच्या टाली बॅग्सच्या धातूच्या



हँडल्समध्ये काहीतरी लपवल्याचे आढळून आले. त्यानंतर, त्या बॅग्समधील धातूचे हँडल्स काढून तपासले असता, त्यातून दंडगोलाकार आकाराची १७ पाकिटे सापडली. या पाकिटांमध्ये पांढ-या रंगाच्या पावडरसारखा पदार्थ आढळून आला; चाचणी उपकरणाद्वारे केलेल्या परीक्षणात तो पदार्थ 'कोकेन' असल्याचे निष्पन्न झाले. आंतरराष्ट्रीय बाजारात १०.६५ कोटी रुपये मूल्य असलेले एकूण २१२८ ग्रॅम (निव्वळ वजन) कोकेन यावेळी जप्त करण्यात आले.जप्त करण्यात आलेला हा प्रतिबंधित माल अंमलीपदार्थ आणि मनोव्यापारिक औषधे (एन डी पी एस) कायदा, १९८५ च्या तरतुदींनुसार जप्त करण्यात आला आहे. अंमली पदार्थांच्या तस्करीमागील व्यापक जाळे शोधून काढण्याच्या उद्देशाने पुढील तपास सुरू आहे.'नशा मुक्त भारत' घडवण्याच्या आपल्या संकल्पावर ठाम राहत अंमली पदार्थ जप्त करणे, आंतरराष्ट्रीय तस्करी टोळ्यांचा बिमोड करणे आणि देशाचे आरोग्य, कल्याण आणि सुरक्षा यांचे संरक्षण करणे यांसाठी महसूल गुप्तचर संचालनालय अविरत प्रयत्न करीत आहे.

## व्हेनेझुएला भूकंपात मृतांची संख्या 3,500 च्या वर

**काराकास/वृत्तसंस्था** : व्हेनेझुएलामध्ये झालेल्या भीषण भूकंपामुळे मोठ्या प्रमाणावर जीवित व वित्तहानी झाली आहे. सोमवारी जाहीर करण्यात आलेल्या ताज्या अधिकृत आकडेवारीनुसार, या नैसर्गिक आपत्तीत मृतांचा आकडा वाढून ३,५३५ वर पोहोचला असून १६,७०० हून अधिक जण जखमी झाले आहेत. २४ जून रोजी झालेल्या या विनाशकारी भूकंपांचा सर्वाधिक फटका राजधानी काराकासच्या उत्तरेला असलेल्या ला ग्वायरा राज्याला बसला आहे. येथे अनेक वस्त्या आणि संपूर्ण परिसर अक्षरशः मलब्याच्या ढिगा-यात रूपांतरित झाले आहेत.सलग आलेल्या या तीव्र भूकंपाच्या धक्क्यांमुळे अनेक इमारती कोसळल्या आणि मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. सरकारच्या माहितीनुसार, या दुर्घटनेत आतापर्यंत १६,७४० जण जखमी झाल्याची अधिकृत नोंद करण्यात आली आहे.तर १७ हजारांहून अधिक नागरिक बेघर झाले आहे. सध्या ढिगा-याखाली अडकलेल्या लोकांबाबतची परिस्थिती ही सर्वात मोठी चिंता बनली आहे. मलब्याखाली अडकलेले किंवा बेपत्ता असलेले नागरिक किती आहेत, याबाबत सरकारने अद्याप कोणतीही अधिकृत आकडेवारी जाहीर केलेली नाही.मात्र, संयुक्त राष्ट्रांच्या अंदाजानुसार सुमारे ५० हजार लोक अजूनही बेपत्ता असू शकतात. या नागरिकांचा शोध घेण्यासाठी बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. भूकंपात आपले घर आणि सर्वस्व गमावलेल्या नागरिकांना आता उघड्या आकाशाखाली राहण्याची वेळ आली आहे. आपत्तीग्रस्तांपैकी अनेक जण रस्त्यांवर, सार्वजनिक उद्यानांमध्ये किंवा वाहनतळांवर उभारलेल्या तात्पुरत्या निवारा छावण्यांमध्ये राहत आहेत. मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने या नागरिकांचे दैनंदिन जीवन अत्यंत कठीण बनले आहे. मदत व बचाव पथके सातत्याने प्रभावित भागांमध्ये मदत पोहोचवण्याचे प्रयत्न करत आहेत. मात्र, आपत्तीचे स्वरूप आणि नुकसानाची व्याप्ती इतकी मोठी आहे की परिस्थिती पूर्णपणे पूर्ववत होण्यासाठी अजून बराच कालावधी लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## इथेनॉलमिश्रित पेट्रोल

भारत हा कच्च्या तेलाचा जगातील सर्वात मोठा आयातदार देश आहे. देशाच्या गरजेपैकी ८५ टक्के कच्चे तेल आयात करावे लागते. भारतात आता ई- २० म्हणजेच २० टक्के इथेनॉल व ८० टक्के पेट्रोल मिश्रणाचा वापर वाढविण्यात येत आहे. मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल आयात करावे लागत असल्याने परकीय चलनावर मोठा ताण पडतो. म्हणूनच केंद्र सरकारने इथेनॉलमिश्रित इंधनाचा वापर करण्यास गती दिली आहे. कच्च्या तेलाची आयात कमी करणे, इंधन खर्चात बचत करणे, शेतकऱ्यांना उत्पन्नाचा अतिरिक्त स्रोत उपलब्ध करून देणे, पर्यावरणातील प्रदूषण कमी करणे, कार्बन उत्सर्जन कमी करून हरित ऊर्जेला चालना देणे, साखर उद्योगाला आर्थिक स्थैर्य मिळवून देणे असे अनेक फायदे इथेनॉलमिश्रित इंधनाचा वापर करण्याने होतील, असा दावा केंद्र सरकारने केला आहे. पेट्रोलमध्ये इथेनॉलचे मिश्रण केल्यामुळे पेट्रोलची बचत होईल, गरज कमी होईल व आयात कमी होऊन परकीय चलनाची बचत होईल.ऊस, मका, ज्वारी या पिकांना अतिरिक्त बाजारपेठ उपलब्ध होईल. साखर कारखान्यांना इथेनॉल विक्रीतून जादा उत्पन्न मिळू शकेल. इथेनॉल हे स्वच्छ इंधन आहे म्हणून कार्बनमोनॉक्साईड, हायड्रोकार्बन आदींचे उत्सर्जन कमी होईल. देशातील कच्च्या मालापासून इंधन तयार होत असल्याने ऊर्जा सुरक्षेला बळकटी मिळेल असे अनेक लाभ होतील, असे केंद्र सरकारने म्हटले आहे. देशात ई- २० इंधनाचा वापर सुरू झाल्यानंतर वाहनचालकांच्या तक्रारी मात्र वाढल्या आहेत व देशभर इथेनॉलमिश्रित पेट्रोलची सक्ती करण्यात सरकारने घाई कशासाठी केली, असा प्रश्न निर्माण झाला आहे. देशात पर्यावरणपूर्वक इंधनाला चालना देण्यासाठी ई- २० पेट्रोलचा वापर वाढवला आहे; मात्र या इंधनामुळे वाहनांच्या मायलेजवर काही प्रमाणात परिणाम होऊ शकतो, अशी कबुली पेट्रोलियम व नैसर्गिक वायुमंत्री हरदीपसिंह पुरी यांनीच दिली आहे. याचाच अर्थ वाहनचालकांच्या तक्रारी केंद्र सरकारपर्यंत पोहोचल्या आहेत व त्यात तथ्य असल्याची कबुलीही केंद्रीय मंत्र्यांनी दिली आहे. इथेनॉल बनविण्यासाठी ऊस, मका, तांदळाचे उत्पादन देशातच होते. प्रायोगिक तत्त्वावर देशातील काही पेट्रोल पंपांवर २००१ मध्ये ५ टक्के इथेनॉल मिश्रित पेट्रोल देण्यात आले.सुरुवातीला ९ राज्ये व ४ केंद्रशासित प्रदेशांत ५ टक्के इथेनॉलमिश्रित पेट्रोल देण्यात आले. हा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर २००३ मध्ये इथेनॉलमिश्रित पेट्रोल कार्यक्रमाला चालना मिळाली. २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार स्थापन झाल्यावर नितीन गडकरी परिवहनमंत्री झाले व त्यांनी या कार्यक्रमाला गती दिली. मोदी सरकारच्या सुरुवातीच्या काळात इथेनॉल मिश्रणाचे लक्ष्य ५ टक्क्यांवरून १० टक्के करण्यात आले. आता मात्र १ एप्रिल २०२६ पर्यंत देशात सर्वत्र ई- २० पेट्रोलचा वापर सुरू झाला आहे. देशातील ४८ पेट्रोल पंपांवर ई-८५ पेट्रोल देणे सुरू झाले आहे. डिसेंबर २०२६ पर्यंत ५०० पेट्रोल पंपांवर ई-८५ पेट्रोल उपलब्ध होणार आहे. विशेष म्हणजे, शंभर टक्के इथेनॉलवर चालणाऱ्या वाहनांना सरकारने मंजुरीही दिली आहे. इथेनॉलमिश्रित पेट्रोलच्या वापरामुळे गेल्या बारा वर्षांत परकीय चलनात किती बचत झाली, प्रदूषणात किती घट झाली किंवा शेतकऱ्यांच्या उत्पन्नात किती वाढ झाली याचे मोठे दावे केंद्र सरकारने केले असले, तरी प्रत्यक्षात वाहनांचा दुरुस्ती व देखभालीचा खर्च वाढला आहे व वाहनचालकांना इथेनॉलमिश्रित पेट्रोल ही मोठी डोकेदुखी निर्माण झाली आहे.इथेनॉलमिश्रित पेट्रोलमुळे वाहनाचे मायलेज कमी झाले आहे. अनेक वाहन उत्पादक कंपन्यांनीही ई- २० इंधनासाठी स्वतंत्रपणे सुसंगत इंजिनांची आवश्यकता असल्याचे स्पष्ट केले आहे. गेल्या काही वर्षांत तयार झालेल्या वाहनांमध्ये ई- २० चा वापर तुलनेने सुरक्षित मानला जात असला, तरी जुन्या वाहनांसाठी त्याबाबत साशंकता कायम आहे. देशातील रस्त्यांवर अद्याप मोठ्या प्रमाणावर जुन्या वाहनांचा वापर होत असल्याने या वाहनांच्या देखभाल खर्चात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे ई- २० इंधनाची अंमलबजावणी करताना वाहनांचे वय, तांत्रिक क्षमता आणि ग्राहकांवरील आर्थिक परिणाम यांचाही विचार करणे आवश्यक आहे. सरकार या मुद्द्यावर सावध भूमिका घेत असले, तरी सरकार व संबंधित संस्थांनी त्यांचा सर्व्हे करून तुलनात्मक आकडेवारी पुढे आणली पाहिजे.पेट्रोलमध्ये इथेनॉलचे प्रमाण वाढले तसे इंधनाच्या टँकमध्ये शेवाळ जमू लागते, अशा तक्रारी वाढल्या आहेत. इंधनाच्या संबंधित असणाऱ्या सुट्या भागांतही बिघाड होण्याचे प्रमाण वाढले आहे. ई- १० पेट्रोल वापरले जात होते तोपर्यंत तक्रारी मर्यादीत होत्या.आता ई- २० पेट्रोलमुळे बहुतेक गॅरेजेसवर वाहनांच्या दुरुस्ती-देखभालीसाठी रांगा लागून राहिल्या आहेत. एका मोठ्या मोटार उत्पादक कंपनीने शंभर टक्के पेट्रोल किंवा शंभर टक्के इथेनॉल अशा कोणत्याही मिश्रणावर चालणारी मोटार बाजारात आणली; पण त्याला फारच किरकोळ प्रतिसाद मिळाला. याचा अर्थ लोकांचा शंभर टक्के इथेनॉलचा वापर करून चालणाऱ्या वाहनांवर पूर्ण विश्वास अद्याप बसलेला नाही. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीच २०१८ मध्ये दावा केला होता की, इथेनॉलमिश्रित इंधनामुळे पेट्रोल-डिझेलच्या किमती बऱ्याच कमी होतील. प्रत्यक्षात तसे काही होऊ शकलेले नाही. इथेनॉलमिश्रित इंधन दिले जात असूनही कुठेही पेट्रोल वा डिझेलच्या दरात घट झालेली नाही. सध्या पेट्रोल-डिझेलचे दर जितके आहेत साधारण तेवढेच दर ई- २० पेट्रोलचेही आहेत. मग, त्याच किमतीत ई- २० पेट्रोल घेण्यात वाहनचालकांचा काय फायदा झाला? उलट वाहनांमधे बिघाड होत असल्याने खर्च व मनस्ताप वाढला. नीती आयोगाने २०२१ मध्ये शिफारस केली होती की, ई- २० पुरवठा सुरू झाल्यापासून इथेनॉलमिश्रित इंधन स्वस्त दरात विकले जावे; पण तसे प्रत्यक्षात घडलेले नाही. हे इंधन वापरणाऱ्या वाहनांना पुनर्विक्रीतही किंमत मिळणे कठीण होईल. भारतातील वाहनांवर इथेनॉलमिश्रित इंधनाचा काय परिणाम होईल, यावर ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडियाने सर्व्हे केला होता; पण त्याचा अहवाल जनतेपुढे आलाच नाही. इथेनॉलमिश्रित इंधनाचा वापर होताना लोकांना विश्वासात घेणे व प्रक्रियेत पादर्शकता असणे महत्त्वाचे आहे.ऊर्जा स्वावलंबन आणि पर्यावरण संरक्षण ही निश्चितच महत्त्वाची उद्दिष्टे आहेत; मात्र ती साध्य करताना वाहनचालकांचा अनुभव, तांत्रिक तयारी आणि पारदर्शक माहिती यांना तितकेच महत्त्व दिले पाहिजे. इथेनॉलमिश्रित इंधनाच्या धोरणाचे यश केवळ सरकारी दाव्यांवर नव्हे, तर जनतेचा विश्वास आणि प्रत्यक्ष परिणाम यांवरच ठरणार आहे.

## अपेक्षित राजकीय खेळी

**शिवसेनेतील ताज्या फुटीने अलीकडेच देशातले वातावरण ढवळून काढले. आज उद्धव ठाकरेंच्या तुलनेत एकनाथ शिंदे यांची सरशी होत आहे. अर्थात केंद्राचा भक्कम पाठिंबा त्यांना मिळत आहे. हे ही महत्त्वाचे. मात्र या सर्व घडामोडींमध्ये अंतिम फायदा भाजपचा आहे. भाजप राज्यसभा आणि लोकसभेत दोन तृतीयांश बहुमताच्या दिशेने वाटचाल करत आहे, हे या घडामोडींचे फलित आहे.**

शिवसेनेच्या निमित्ताने केंद्रातील राजकारण ढवळून काढणारे वातावरण अलीकडेच अनुभवायला मिळाले. मराठी माणसाच्या न्यायहक्कासाठी शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी १९ जून १९६ रोजी मुंबईत शिवसेना स्थापन केली. बाळासाहेबांच्या करारी आणि लढाऊ नेतृत्वाने शिवसेना नेहमीच धगधगत राहिली. मुंबईतील मराठी माणसाला ताठ मानेने उभे करण्यामागे ठाकरे व त्यांनी स्थापन केलेली शिवसेनाच होती. बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेना यांच्याविषयी मराठी माणसाच्या हृदयात माझा नेता आणि माझा पक्ष अशी भावना निर्माण झाली. याच शिवसेने मुंबईतील कामगार क्षेत्रातील लाल बावटा चळवळ संपवली. याच शिवसेनेने दोन्ही समाजवादी पक्षांना संकुचित केले हे त्यांनाही समजले नाही. तत्कालीन बलाढ्य काँग्रेस पक्षाला अगावर घेण्याचे काम याच शिवसेने केले. भूमिपुत्रांना नोकऱ्यांमध्ये आणि घरांमध्ये ८० टक्के हक्काचा वाटा मिळाला पाहिजे यासाठी लढणारी हीच शिवसेना होती. भारतीय कामगार सेना, स्थानिक लोकाधिकार समिती, विद्यार्थी सेना अशा आयाद्वारे शिवसेना नेहमीच सरव्यापक दिसायची. शिवसेना ही मुंबईतील मराठी माणसाची शक्ती होती, मराठी माणसाचे कवच होते. शिवसेना या चार अक्षरांचा मुंबईत जबरदस्त दरारा होता. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे या नावाचा सार्वजनिक जीवनात मोठा दबदबा होता. मातोश्रीवर रोज खुला जनता दरबार असायचा. आपले म्हणणे ऐकून घेणारा आणि न्याय मिळवून देणारा नेता अशी त्यांची जनतेत प्रतिमा होती. दत्ताजी साळवी, मनोहर जोशी, प्रमोद नवलकर, छगन भुजबळ, नारायण राणे, सुधीर जोशी, सतीश प्रधान, लीलाधर डाके, शरद आचार्य, दत्ताजी नलावडे, मधुकर सरपोतदार, सूर्यकांत महाडिक, सुभाष देसाई अशा अफाट जनसंपर्क असलेल्या नेत्यांची मालिका हे शिवसेनेचे वैभव होते. मात्र हे वैभव पुढील काळात उतरणीला लागले.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे



यांच्या निधनानंतर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना राज्याचे मुख्यमंत्री होण्याचीही संधी मिळाली. राज्यात शिवसेना- भाजपा युती असेपर्यंत गाडी रुळावर होती. पण स्वार्थिक आमदार असलेल्या भाजपाला दूर सारून आणि काँग्रेसशी आघाडी करून उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले, तेव्हापासूनच भाजपाच्या रडारवर त्यांचे नाव नोंदवले गेले. पंचवीस वर्षांच्या युतीतील मैत्रीचे रूपांतर राजकीय स्पर्धकांमध्ये झाले. त्याचे परिणाम उद्धव आणि त्यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला सतत चार वर्षे भोगावे लागत आहेत. पक्षाच्या सहा खासदारांनी उद्धव यांच्या नेतृत्वाविरोधात केलेला उठाव आणि एकनाथ शिंदे यांच्या पक्षाशी केलेला घराणोबा हे त्याचे ताजे उदाहरण आहे. २०१४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये ठाकरे यांच्या शिवसेनेचे नऊ खासदार निवडून आले. त्यातले संजय जाधव (४९,परभणी),भाऊसाहेब वाघचौरे (७६, शिर्डी), संजय देशमुख (५८, यवतमाळ-वाशीम), नागेश पाटील अष्टिकर (५४, हिंगोली), ओमराजे निंबाळकर (४२, धाराशिव), संजय दीना पाटील (५७, ईशान्य मुंबई) या सहा खासदारांनी ठाकरेंच्या शिवसेनेला 'जय महाराष्ट्र' केला. हे सर्व खासदार मशाल चिन्हावर निवडून आले होते.या सर्वांनी बाळासाहेब ठाकरे व उद्धव ठाकरे यांचे बोर्डवर फोटो लावून मते मागितली होती. ठाकरेंच्या शिवसैनिकांनी मेहनत करून त्यांचा प्रचार केला होता. भाजप-शिवसेना शिंदे पक्षाच्या विरोधात जनतेने त्यांना लोकसभेवर निवडून दिले होते. मग दोन वर्षांनी नेमके असे काय घडले की, त्यांना ठाकरेंच्या पक्षात राहणे नकोसे झाले?

### जनतेच्या जीवनात काय फरक पडणार?

येथे लक्षात घेण्याजोगी बाब अशी, की आपण पक्षनेतृत्वावर नाराज असल्याचे त्यांनी कधी सांगितले नाही. पक्षाच्या नेमक्या कोणत्या निर्णयाबद्दल त्यांचे मतभेद झाले हे कधी पुढे आले नाही. पक्ष सोडून जाण्याची खरी कारणे पुढे आलेली नाहीत. या फुटीर खासदारांनी दोन वर्षांमध्ये संसदेत महाराष्ट्राचे कोणते प्रश्न मांडले, मतदारसंघाला काय मिळवून दिले, पक्षाची कोणती भूमिका तडफेने मांडली? आता शिंदेंच्या पक्षात गेले, त्याचा राजकीय आणि आर्थिक लाभ त्यांना झाला असेल, पण जनतेच्या जीवनात काय फरक पडणार आहे? आता हे सर्व फुटीर शिवसेनेचे धनुष्यबाण हे चिन्ह हाती घेणार आहेत. म्हणून ते एनडीएमध्ये येतील. लोकसभेत एनडीए सरकार विधेयके किंवा ठराव सादर करील तेव्हा या खासदारांना सरकारच्या बाजूने मतदान करावे लागेल. महिला आरक्षण तसेच मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला याच खासदारांनी दोन महिन्यांपूर्वी लोकसभेत विरोध केला होता. आता ते पुन्हा सादर झाले की त्यावर एनडीएच्या बाजूने मतदान करावे लागेल. १९ जून हा शिवसेनेचा स्थापना दिवस. एकनाथ शिंदे यांनी बंडाचा झेंडा फडकावून शिवसेना हे नाव व निवडणूक चिन्ह काबीज केले, तेव्हापासून मुंबईत ठाकरे आणि शिंदे शिवसेनेचा वर्धापनदिन वेगवेगळा साजरा करतात. ठाकरेकडे सत्ता नाही. राज्य

### भाजपकडून आयारामना पायघड्या

आता बंडखोर खासदारांचे बॉस एकनाथ शिंदे आहेत. ते सर्व निर्णय मोदी- शहांना विचारूनच घेत असतात. शिवसेना वर्धापनदिनाच्या तोंडावर दिल्लीतून या सहा खासदारांनी वेगळा गट स्थापन करण्यासाठी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र दिले.

लोकसभा निवडणुकीत 'चार सौ पार'ची घोषणा देणाऱ्या भाजपाला बहुमताचा आकडाही गाठता आला नव्हता. मग चंद्राबू नायडू आणि नितीशकुमार यांना बरोबर घेऊन एनडीए सरकारची स्थापना झाली. विधेयके मंजूर करण्यासाठी लोकसभेत ३६२ खासदारांचे संख्याबळ गरजेचे आहे. म्हणूनच आयारामांना भाजपाकडून पायघड्या घातल्या जात आहेत. अगोदर पंजाबमधील आम आदमी पक्षाचे सात खासदार फुटले आणि भाजपामध्ये आले. नंतर तृणमूल काँग्रेसचे बावीस खासदार फुटले आणि त्यांना नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टीमध्ये विलीन केले. आता ठाकरेंच्या शिवसेनेचे सात खासदार फुटले आणि त्यांना शिंदेंच्या शिवसेने पायघड्या घातल्या. काँग्रेसशी संबंध तोडलेल्या द्रमुकच्या २ खासदारांवर भाजपाची नजर आहे. शिवाय सपाचे खासदार फुटणार अशी कुजबुज चालू आहे.

शिंदे यांच्या शिवसेनेचे लोकसभेवर सात खासदार निवडून आले आहेत. प्रतापराव जाधव केंद्रात मंत्री आहेत. ठाकरेंचे सहा खासदार मिळाल्याने शिंदे यांच्या खासदारांची संख्या तेरा झाली आहे. त्यामुळे त्यांना केंद्रात आणखी एक मंत्रिपद मिळेल अशी चर्चा सुरू आहे. भाजपाकडे आयारामांची रांग लागल्याने एनडीएएमधील चंद्राबू नायडू आणि नितीशकुमार यांचे महत्त्व कमी होईल, अशी चिन्हे आहेत.

### एकनाथ शिंदे यांचे महत्त्व

दुसरीकडे राज्याच्या राजकारणात एकनाथ शिंदे यांचे महत्त्व वाढेल. महाराष्ट्रात आपली राजकीय भूमिका अमलात आणण्यासाठी एकनाथ शिंदे अतिशय उपयुक्त नेते आहेत, असे मोदी-शहांना समजले आहे. एकनाथ शिंदे लोकांना जेवढे भेटतात, दौरे करतात तेवढे कोणी करत नाहीत. भाजपा हायकमांडशी सर्वाधिक जवळचे संबंध राखणारा हा नेता आहे. उद्धव ठाकरे यांचे नेतृत्व आणि यांचा पक्ष कमकुवत करण्यात एकनाथ शिंदे यांचा सिंहाचा वाटा आहे. आपणच शिवसेनाप्रमुखाचे सच्चे वारस आहोत, असा त्यांचा दावा आहे. ठाकरे पिता-पुत्र हे राज्यात कुठे फिरत नाहीत, फोन घेत नाहीत, जनसंपर्क नाही, पदाधिकारी-कार्यकर्ते यांच्याशी मुक्त संवाद नाही, पक्षाचे मुख्यालय असलेल्या शिवसेना भवनमध्ये ते नियमित जात नाहीत. मग जनमानस काय आहे, कार्यकर्त्यांची भावना काय आहे हे कसे समजणार? ठाकरे भेटत नाहीत आणि शिंदे रात्री उशिरापर्यंत मुंबई-ठाण्यात भेटत असतात. त्याचा लाभ त्यांना मिळतो. म्हणूनच आजच्या राजकारणामध्ये एकनाथ शिंदे यांची सरशी होत आहे. अर्थात या पलीकडे जाऊन केंद्राचा भक्कम पाठिंबा त्यांना मिळत आहे.

मात्र या सर्व घडामोडींमध्ये अंतिम फायदा भाजपाचा आहे. भाजप राज्यसभा आणि लोकसभेत दोन तृतीयांश बहुमताच्या दिशेने वाटचाल करत आहे, हे या सर्व घडामोडींचे फलित आहे.

**डॉ. सुकृत खांडेकर**

## शहरांच्या नियोजनाचा पुनर्विचार व्हावा!

### माझेही मत

मुंबईत मान्सूनने जोरदार सलामी दिली आहे.मागील ४८ तासांत मुंबईत ३८० मिली पाऊस झाला. या पावसाने १२ मुंबईकरांना हिरावून नेले. गेल्या तीन दिवसात मुंबईत १२ जणांना आपला जीव गमवावा लागला. या पावसाने क्षणात होत्याचे नव्हते झाले. दरवर्षीप्रमाणे यावेळीही पावसाने जोरदार हजेरी लावल्याने मुंबई पुन्हा एकदा तुंबली.महामार्गावर पाणी आल्याने शेकडो गाड्या जागेवरच थांबल्या त्यामुळे वाहतूक कोंडी झाली. रिक्षा, टॅक्सी यांनी जणू अघोषित संप पुकारला. रेल्वे मार्गावर पाणी साचून रूळ पाण्याखाली रेल्वेचे वेळापत्रक कोलमडले. एकूणच पावसाने मुंबईची चांगलीच दैना उडवली. या पावसाने २६ जुलै २००५ रोजी झालेल्या प्रलयकारी पावसाची आठवण झाली. पावसामुळे मुंबईची दैना झाल्यावर नेहमीप्रमाणे दोषारोपांची मालिका सुरू झाली. सत्ताधारी व विरोधक एकमेकांवर आरोपांच्या फैऱ्या झाडू लागले. पाऊस वाढला की मुंबईची तुंबई का होते ? या प्रश्नाकडे मात्र सर्वच पक्ष सोईस्कर डोळेझाक करीत आहेत.

मुंबई तुंबण्याचे आणखी एक कारण म्हणजे प्लास्टिक. राज्य सरकारने प्लास्टिकवर बंदी घातली असली तरी मुंबईत दररोज हजारो टण प्लास्टिक कचरा जमा होतो. या प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यात प्रशासन अपयशी ठरत आहे. हे प्लास्टिक नदी, नाल्यामध्ये अडकल्याने तेथून पावसाचे पाणी वाहत जाण्यास अडचण निर्माण होते. राज्य सरकारने प्लास्टिकवर घातलेली बंदी किती योग्य आहे हे या पावसामुळे तरी नागरिकांना समजेल. नागरिकांनीही प्लास्टिकचा वापर टाळायला हवा. पावसामुळे केवळ मुंबईचीच नाही तर सर्वच मोठ्या शहरांची अशीच अवस्था होते. दोन वर्षापूर्वी दिल्लीत झालेल्या मुसळधार पावसामुळे दिल्ली जलमय झाल्याचे आपण पाहिलेच आहे. सहा वर्षापुर्वी राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूर शहराचीही पावसामुळे दैना झाली होती. मुसळधार पावसामुळे नागपूर शहर पाण्याखाली गेले होते. त्यावेळी विधिमंडळाचे अधिवेशन नागपुरात सुरू होते. इतका पाऊस झाला की पावसाचे पाणी थेट विधान भवनात शिरले होते. त्यामुळे विधिमंडळाचे अधिवेशन तहकूब करावे लागले. मागील काही वर्षात पावसामुळे पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली ही शहरे जलमय झाल्याचे आपण पाहिले आहे. राज्यातील सर्वच शहरात कमी अधिक प्रमाणात हीच परिस्थिती आहे. पाऊसही बेभरवशाचा झाला आहे. पूर्वीसारखा पावसाचा देखील अंदाज येत नाही. दोन दोन महिने न येणारा पाऊस दोन तासात येऊन दोन महिन्यांची सरासरी गाठतो. या सर्व परिस्थितीचा विचार करता मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली यासारख्या मोठ्या शहरांच्या नियोजनाचा पुनर्विचार होणे गरजेचे आहे. जलव्यवस्थापनाची आजची पद्धत बदलून नवीन पद्धतीचा अवलंब करायला हवा. त्यासाठी उच्च तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. त्यासाठी परदेशातील तज्ज्ञांची मदत घ्यायला हवी. परदेशातील जलव्यवस्थापनाचा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञांना परदेशात पाठवायला हवे. परदेशातील अधिकाऱ्यांची त्यासाठी मदत घ्यायला हवी.

**श्याम ठाणेदार**

## कांदा उत्पादक शेतकऱ्याचे भले होण्यासाठी...

**शेतकऱ्यांनी रक्ताचे पाणी करून मोठ्या कष्टाने पिकविलेला कांदा दरवर्षी शेतकऱ्याला कवडीमोल दराने विकावा लागतो. केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे कांदा उत्पादक शेतकरी नेहमीच उद्ध्वस्त होत असतो. त्याला जगविण्यासाठी कांद्याला ३,००० रुपये प्रतिक्विंटल भाव दिलाच पाहिजे.**

राज्यातील कांदा उत्पादकांकडे राज्य सरकारी व केंद्र सरकारचे कायमच दुर्लक्ष होत आले आहे. कांद्याला किमान ५ रुपये प्रतिकिलो हमीभाव मिळाला पाहिजे, अशी यावेळी मागणी आहे. कांदा उत्पादक शेतकरी वर्गाची वस्तुस्थिती काय आहे ते सोलापूर जिल्ह्यातील घोडेश्वर येथील शेतकरी लखन माने यांच्याबाबत जे घडले त्यावरून दिसते. माने यांनी कांद्याच्या १०० गोण्या विक्रीसाठी बाजारात आणल्यावर त्यांना अवघे १४०० रुपये मिळाले. हमाली, तोलाई, वाहतूक खर्च इत्यादी खर्च वजावट जाता त्यांना फक्त १३५७ रुपये उरले. तेव्हा संतप्त होऊन या शेतकऱ्याने शेतातील २ एकर जमिनीतील कांद्याला आग लावून दिली. शेतकऱ्यास उत्पादन खर्चदेखील निघत नसेल तर कांदा उत्पादन का करावे? अशी कठीण परिस्थिती निर्माण होत आहे.

देशात कांद्याचे वार्षिक उत्पादन सुमारे ३०० ते ३२५ लाख टन आहे. त्यापैकी महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांकडून सुमारे ११० ते १५० लाख टन कांदा उत्पादन होते. लासलगाव (नाशिक) ही आशियातील सर्वात मोठी कांदा खरेदी-विक्रीची बाजारपेठ आहे. तसेच नाशिक, पुणे, अहिल्यानगर, सोलापूर, धुळे, जळगाव, छत्रपती संभाजीनगर हे प्रमुख जिल्हे कांदा उत्पादक आहेत.



कांद्याची देशांतर्गत वार्षिक मागणी व वापर २०४ लाख टन असून सरासरी ११ लाख टन कांदा निर्यात केला जातो. यातून शिल्लक राहिलेला कांदा ५ लाख टन कांदा योग्य साठवणूक व प्रक्रिया सुविधेच्या अभावामुळे खराब होतो किंवा सडून जातो. शिल्लक राहिलेल्या कांद्याचे योग्य नियोजन होत नसल्यामुळे, कांदा उत्पादक वर्ग व लोकप्रतिनिधी, सरकारच्या दुर्लक्षामुळे, शेतकऱ्यांच्या उदासीनतेमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. देशभरातून दरमहा १७ लाख टन कांदा खाण्यासाठी वापरला जातो. ग्राहक वर्गाला स्वस्तात व योग्य दरात कांदा मिळावा असाच सरकारचा कायम प्रयत्न असतो. तो चुकीचा नसला तरी त्या धोरणाचा फटका सामान्य कांदा उत्पादकांना नेहमीच बसतो. जानेवारी २०२६ ते फेब्रुवारी, मार्च, एप्रिलदरम्यान बाजार समितीत अनुक्रमे सरासरी प्रतिक्विंटल दर ८५० रु., ८०० रु., ६५० रु. आणि ६०० रु. असा दर प्राप्त झाल्याने तसेच केंद्राच्या निर्यात धोरणांमुळे सोलापूरच्या बाजार समितीच्या परिसरातील विक्रीमुळे ४०० कोटी रुपयांचे नुकसान झाले. यंदा कांद्याचे उत्पादन वाढले. मात्र इराण-अमेरिका युद्धामुळे कांदा निर्यातीवर विपरीत परिणाम झाला. बांगलादेशला यंदा कांदा पाठविता न आल्याने कांदा विक्रीवर मोठे संकट झाले. त्यामुळे कांद्याच्या दरात घसरण झाली. सरकारचे निर्यात धोरण स्पष्ट नाही. साठवणूक क्षमता अपूर्ण आहे. सरकार याबाबत वेळेवर निर्णय घेत नाही. ग्राहकांना स्वस्त दरात कांदा मिळावा असे सरकारचे वागणे आहे, पण कांदा उत्पादक शेतकरीदेखील जगला पाहिजे, याची जबाबदारी सरकार घेत नाही.

एका बाजूला शेतकरी हिताची गोलमाल भाषा आणि दुसऱ्या बाजूला बाजार समितीच्या कारभारात हस्तक्षेप करून भाव पाडण्याचे राजकारण असा दुटप्पीपणा सरकार करते. शेतकरी कांदा उत्पादनासाठी राबराब राबतो, कर्ज काढतो. पाणी, मजुरी, खत, औषधे यांसाठी भरपूर खर्च करतो, परंतु त्यांच्या कांद्याला योग्य भाव हमीभाव प्राप्त होत नाही. याबाबत सरकार वेळेवर दखल घेत नसल्याने शेतकरी वर्गाची परिस्थिती हलाखीची होत आहे. शेतकऱ्यांची ही क्रूर थट्टाच सरकार करीत आहे.

केंद्र सरकारने बाजार व्यवस्था आणि ग्राहक यांच्या समतोल दृष्टिकोनातून शेतकरी हिताचा योग्य निर्णय घेऊन कांद्याचा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. कांदा प्रक्रिया उद्योगावर भर दिला पाहिजे. हमीभाव योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी तत्पर झाले पाहिजे. निर्यातीचे स्थिर व दीर्घकालीन धोरण अमलात आणून शेतकरी वर्गाच्या हितासाठी प्रामाणिक प्रयत्न करणे हिताचे आहे. कांदा उत्पादकांच्या कष्टाचे चीज होऊन त्यांच्या हाती चार पैसे जास्त येतील अशा योजना राबविल्या पाहिजेत. तेव्हाच कांदा उत्पादक खुशीने जगू शकेल.

**सुभाषचंद्र सुराणा**

# फुलसावंगी जिल्हा परिषद शाळेत शिक्षकांचा दुष्काळ!

## ६५० विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ मनीष ढाले



**फुलसावंगी, दि. ७ :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर प्रशासनाच्या दुर्लक्षाचे गंभीर परिणाम फुलसावंगी येथील जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालयात दिसून येत आहेत. तब्बल ६५० विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी केवळ ६ शिक्षकांवर असल्याने शैक्षणिक व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत झाली आहे.

शिक्षक भरतीसाठी वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाने ठोस पावले उचलली नसल्याने संतप्त पालक, ग्रामस्थ आणि शाळा व्यवस्थापन समितीने १५ ऑगस्ट २०२६ पासून शाळा बंद करून ठिय्या आंदोलनाचा इशारा दिला आहे. फुलसावंगी हे परिसरातील महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र असून, येथे इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंत ६५० हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेतात. शाळेसाठी १७ शिक्षकांची पदे मंजूर असताना प्रत्यक्षात केवळ ६ शिक्षक कार्यरत आहेत. त्यामुळे ११ पदे रिक्त असून, अनेक विषयांचे नियमित अध्यापन ठप्प झाले आहे. याशिवाय मंजूर ७ शिक्षकेतर पदांपैकी ५ पदे रिक्त असल्याने प्रशासकीय कामकाजावरही मोठा परिणाम होत आहे. विशेष म्हणजे सन २०२५-२६ च्या समायोजन प्रक्रियेत या शाळेला ४ अतिरिक्त शिक्षक मंजूर करण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात फक्त एकच शिक्षक रुजू झाला, तर उर्वरित तीन शिक्षक अद्यापही शाळेत दाखल झालेले नाहीत. या प्रकारामुळे शिक्षण विभागाच्या नियोजनावर आणि अंमलबजावणीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शाळेतील बहुतांश विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील आहेत. शिक्षणाच्या बळावर भविष्य घडविण्याचे त्यांचे स्वप्न शिक्षकांच्या कमतरतेमुळे धोक्यात आले आहे. ऐन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच ही परिस्थिती निर्माण झाल्याने अभ्यासक्रम वेळेत पूर्ण होणार का, विद्यार्थ्यांची गुणवत्ता कशी वाढणार, असा प्रश्न पालक उपस्थित करीत आहेत. प्रशासनाने तातडीने रिक्त पदे भरून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे, अशी मागणी जोर धरत आहे. अन्यथा स्वातंत्र्यदिनानंतर उभारण्यात येणाऱ्या आंदोलनाची संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील, असा स्पष्ट इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

### पालकांचा थेट इशारा

**"आम्ही अनेकदा निवेदने दिली, अधिकाऱ्यांची भेट घेतली; मात्र प्रशासनाने आमच्या मुलांच्या शिक्षणाकडे सातत्याने दुर्लक्ष केले. आता आणखी सहन करणार नाही. १५ ऑगस्टपूर्वी सर्व रिक्त शिक्षक पदे भरली नाहीत, तर स्वातंत्र्यदिनी ध्वजारोहणानंतर शाळेला कुलूप ठोकून लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल. त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची असेल."**

— शाळा व्यवस्थापन समिती,
पालक व ग्रामस्थ

# चार महिन्यांच्या चिमुकलीच्या मृत्यूने खळबळ..!

## लसीकरणावर कुटुंबीयांचा आरोप, शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे कारण स्पष्ट होणार

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ७ :** नेर तालुक्यातील अजंती पारधीबेडा येथे चार महिन्यांच्या चिमुकलीचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. लसीकरणानंतर मुलीची प्रकृती बिघडून तिचा मृत्यू झाल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला असून, या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी पारधी समाजातील नागरिकांनी तहसील कार्यालयासमोर आंदोलन केले. माहितीनुसार, सोमवारी आरोग्य विभागाने अंगणवाडी केंद्रावर नियमित लसीकरण सत्र आयोजित केले होते. या सत्रात चार महिन्यांच्या मुलीला लस देण्यात आली. कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, लसीकरणानंतर तिची प्रकृती खालावली आणि मंगळवारी सकाळी तिचा मृत्यू झाला. त्यामुळे चुकीच्या लसीकरणामुळेच मृत्यू झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे. दरम्यान, या घटनेनंतर आरोग्य विभागाने प्राथमिक चौकशी करून आपला अहवाल प्रसिद्ध केला आहे. विभागाच्या म्हणण्यानुसार, उपलब्ध पुराव्यांवरून मुलीचा मृत्यू लसीकरणाशी संबंधित असल्याचे आढळून आलेले नाही. मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतरच स्पष्ट होईल, असेही विभागाने नमूद केले आहे. प्राथमिक तपासात लसीकरणासाठी वापरण्यात आलेल्या सर्व लसी विहित मुदतीतील असून त्यांची गुणवत्ता समाधानकारक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. लसीकरणा नंतर मुलीसह सर्व लाभार्थ्यांना काही काळ निरीक्षणाखाली ठेवण्यात आले होते. त्यावेळी कोणत्याही मुलामध्ये प्रतिकूल लक्षणे आढळली नसल्याचे अहवालात म्हटले आहे. आशा सेविकेच्या माहितीनुसार, लसीकरणानंतर मुलगी सायंकाळपर्यंत खेळत होती, नियमित स्तनपानही करत होती आणि रात्री दूध पिऊन झोपली होती. त्या वेळेपर्यंत तिची प्रकृती सामान्य असल्याचेही नोंदविण्यात आले आहे. आरोग्य विभागाच्या पथकाने कुटुंबीय, शेजारी, आशा कार्यकर्ती, आरोग्य कर्मचारी, अंगणवाडी सेविका तसेच त्याच दिवशी लसीकरण झालेल्या इतर बालकांच्या पालकांचे जबाब नोंदवले आहेत. प्राथमिक चौकशीत लसीकरणामुळे मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले नसले, तरी अंतिम निष्कर्ष शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होणार आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# दारव्हा-दिग्रस शेत शिवारातील चोरट्यांच्या टोळीचा पर्दाफाश..!

## ४ गुन्हे उघड, मुख्य आरोपी अटकेत, १.५६ लाखांचा मुद्देमाल जप्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ७ :** दारव्हा व दिग्रस परिसरातील शेतशिवारात पाण्याचे मोटार पंप, तांब्याच्या केबल्स आणि गोदामातील सोयाबीन चोरी करून शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या चोरट्यांच्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत मुख्य आरोपीला अटक करण्यात आली असून चार गंभीर चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपीकडून एकूण १ लाख ५६ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथक ६ जुलै रोजी दारव्हा परिसरात गस्त घालत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे इस्लामपुरा येथे सापळा रचण्यात आला. यावेळी महमंद मुद्दसीर महमंद मुस्ताक (वय २५, रा. इस्लामपुरा, दारव्हा) याला विना क्रमांकाच्या मोपेडसह ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडील तांब्याच्या तारा आणि चौकशीतून चोरीचे चार गुन्हे उघड झाले. आरोपीने साथीदारांसह दिवसा शेतशिवारांची रेकी करून रात्रीच्या अंधारात शेतकरी नसल्याची संधी साधत मोटार पंप, तांब्याच्या वाइंडिंगच्या तारा तसेच गोदामातील सोयाबीन लंपास केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून दोन मोटार पंप, १५ किलो तांब्याची तार, सुमारे चार क्विंटल सोयाबीन आणि गुन्ह्यात वापरलेली विना क्रमांकाची बर्गमन मोपेड असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे दारव्हा पोलीस ठाण्यातील तीन आणि दिग्रस पोलीस ठाण्यातील एक असे एकूण चार चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. गुन्ह्यातील अन्य दोन आरोपी फरार असून त्यांचा पोलीस कसून शोध घेत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शिवशंकर कायंदे व त्यांच्या पथकाने केली. दरम्यान, शेतकरी बांधवांनी शेतशिवारात संशयास्पद व्यक्ती किंवा वाहन आढळल्यास तातडीने पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# 'खड्ड्यांनी हैराण जनता संतप्त..!

## कलगांव–गुंज मार्गासाठी आठ दिवसांचा अल्टिमेटम, अन्यथा बेमुदत चक्काजाम'

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**महागाव, दि. ७ :** महागाव महागाव तालुक्यातील कलगांव–गुंज मार्गाच्या दुरवस्थेविरोधात कलगांव, सवना, गुंज, वेणी आणि वाकोडी येथील ग्रामस्थांनी सोमवारी तीव्र आंदोलन करत प्रशासनासह लोकप्रतिनिधींविरोधात संताप व्यक्त केला.

गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या रस्त्याच्या कामाबाबत केवळ आश्वासने मिळत असून प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी आठ दिवसांत काम सुरू करण्याची मागणी केली. अन्यथा बेमुदत चक्काजाम आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला. तहसीलदार अनुपस्थित असल्याने आरसी-१ शाखेचे लिपिक दीपक चव्हाण यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या नावे निवेदन स्वीकारले. निवेदनात कलगांव–गुंज मार्ग गेल्या दहा वर्षांपासून अत्यंत खराब अवस्थेत असून वारंवार पाठपुरावा करूनही कायमस्वरूपी दुरुस्तीऐवजी केवळ तात्पुरती डागडुजी केली जात असल्याची खंत व्यक्त करण्यात आली. हा मार्ग सूतगिरणी, आयटीआय, महाविद्यालय, साखर कारखाना, सवना येथील ग्रामीण रुग्णालय तसेच पुसद शहराशी जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. दररोज हजारो नागरिक, विद्यार्थी, शेतकरी व रुग्ण या मार्गाचा वापर करतात. मात्र मोठमोठे खड्डे, उखडलेला डांबरी थर आणि धुळीमुळे प्रवास धोकादायक बनला असून अपघातांचा धोका वाढल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. आंदोलनादरम्यान आमदार किसन वानखडे आणि खासदार नागेश पाटील यांच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. मतदारसंघातील रस्त्यांच्या प्रश्नाकडे सातत्याने दुर्लक्ष झाल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी विकासाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. अनेक वक्त्यांनी लोकप्रतिनिधींनी निवडणुकांतील आश्वासनांची पूर्तता करावी, अशी मागणी केली. ग्रामस्थांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, पुढील आठ दिवसांत रस्त्याच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली नाही, तर बेमुदत चक्काजाम आंदोलन करून प्रशासन आणि लोकप्रतिनिधींना जनआक्रोशाची तीव्रता दाखवून दिली जाईल. त्यामुळे आता प्रशासन तातडीने पावले उचलणार की जनतेच्या संतापाला सामोरे जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात

### किन्हीतील शेतकऱ्याची शेतात गळफास घेऊन आत्महत्या..



**बाभूळगाव :** रानडुक्करांच्या सततच्या उपद्रवामुळे उद्ध्वस्त झालेली शेती, दुबार पेरणीचे संकट आणि कर्जाच्या वाढत्या ओझ्याला कंटाळून किन्ही (ता. बाभूळगाव) येथील शेतकरी अरुण शेषराव गावंडे (वय ५२) यांनी शेतातील आवळ्याच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना ५ जुलै रोजी घडली. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत असून शेतकरी सुरक्षेच्या प्रश्नावर पुन्हा एकदा गंभीर चर्चा सुरू झाली आहे. गावंडे यांच्या मालकीची सुमारे सात एकर शेती असून त्यांच्यावर बँकेचे कर्ज होते. यंदा पावसामुळे पहिली पेरणी वाया गेल्याने त्यांनी दुबार पेरणी केली. मात्र त्यानंतरही रानडुक्करांनी पिकांची मोठ्या प्रमाणावर नासधूस केल्याने ते प्रचंड नैराश्यात होते. ५ जुलै रोजी सायंकाळी पिकाचे रक्षण करण्यासाठी शेतात जात असल्याचे सांगून ते घरातून निघाले. बराच वेळ परत न आल्याने कुटुंबीयांनी शोध घेतला असता ते झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळून आले.

घटनेची माहिती मिळताच बाभूळगाव पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. दरम्यान, वन्यप्राण्यांच्या वाढत्या उपद्रवावर तातडीने नियंत्रण, सोलर फेन्सिंग व संरक्षक कुंपणासाठी अनुदान, रानडुक्कर पकडण्यासाठी विशेष मोहीम आणि पिकांच्या नुकसानीची सात दिवसांत भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे केली आहे.



### राज्याच्या 'शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्काराने, प्रयोगशील शेतकरी विनोद मैंद यांचा गौरव

✦ किरण नरवाडे

**महागाव :** महागाव तालुक्यातील उटी येथील प्रयोगशील शेतकरी विनोद मैंद यांच्या कृषी क्षेत्रातील संशोधन, नावीन्यपूर्ण प्रयोग आणि शेतकरीहिताच्या कार्याची राज्य शासनाने दखल घेत त्यांना प्रतिष्ठेचा 'शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार – २०२३' प्रदान करून गौरविण्यात आले. नुकत्याच मुंबईच्या वरळी येथील लोटस डोम येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल,फलोत्पादन मंत्री भारत गोगावले,मंत्री इंद्रनील नाईक, कृषी आयुक्त सुरज मांढरे, कृषी सचिव परिमल सिंह तसेच विस्तार संचालक रफिक नाईकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. विनोद मैंद यांनी निवड पद्धतीद्वारे सोयाबीनच्या दोन, हरभऱ्याच्या चार आणि तुरीच्या एका सुधारित वाणाची निर्मिती करून कृषी संशोधन क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांनी विकसित केलेल्या तुरीच्या वाणाला 'शिवनेरी-४५' असे नाव दिले असून, हे वाण अधिक उत्पादनक्षम असल्याचा त्यांचा दावा आहे. या वाणाच्या बियाण्यांना राज्यभरातील शेतकऱ्यांकडून वाढता प्रतिसाद मिळत आहे. वाण निर्मितीबरोबरच आधुनिक पीक लागवड पद्धती,उत्पादनवाढ आणि कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार यासाठीही त्यांनी सातत्याने प्रयोग केले आहेत. त्यांच्या संशोधनप्रधान कार्यामुळे अनेक शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचा नवा मार्ग मिळाला असून,कृषी क्षेत्रात त्यांनी स्वतंत्र आणि प्रेरणादायी स्थान निर्माण केले आहे.

### झरी-जामणी तालुक्यातील शेतकऱ्यांची गैरसोय..!

**सोसायटी सचिवांचा संपर्क मिळत नसल्याने त्रास**

**झरी :** तालुक्यात एकूण २० सहकारी सेवा सोसायट्या असून त्यासाठी केवळ १० सचिव कार्यरत आहेत. त्यामध्ये मुकुटबन येथे ८, पाटण येथे ३, झरी येथे ४ आणि शिबला येथे २ सचिव कार्यरत असल्याची माहिती आहे. कमी मनुष्यबळामुळे एका सचिवाकडे एकापेक्षा अधिक सोसायट्यांचा कार्यभार असल्याने शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे.

शेती नील दाखला तसेच इतर आवश्यक कागदपत्रांसाठी शेतकऱ्यांना सोसायटी सचिवांचा संपर्क करावा लागतो. मात्र संबंधित सचिवांचे मोबाईल क्रमांक, ते कोणत्या दिवशी कोणत्या सोसायटीत उपलब्ध असतात किंवा त्यांचे कार्यक्षेत्र काय आहे, याची माहिती बहुतेक शेतकऱ्यांना नसल्याने त्यांना वारंवार चौकशी करत फिरावे लागते. त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांचा अपव्यय होत असून शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

यावर उपाय म्हणून प्रत्येक सहकारी सेवा सोसायटीमध्ये सचिवांचे नाव, मोबाईल क्रमांक, कार्यक्षेत्र आणि उपस्थितीचे दिवस दर्शविणारा माहिती फलक लावण्यात यावा. तसेच ही माहिती ग्रामपंचायत, कृषी विभाग आणि सार्वजनिक ठिकाणीही उपलब्ध करून द्यावी,अशी मागणी तालुक्यातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

# नगरसेवकांच्या न्याय्य हक्कांसाठी यवतमाळ येथे बैठक..!

## मुख्यमंत्री व नगरविकास मंत्र्यांना निवेदन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ७ :** येथे यवतमाळ जिल्हा नगरसेवक समन्वय मंचाच्या वतीने जिल्ह्यातील नगरसेवकांची बैठक उत्साहात पार पडली. बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांना जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या मार्फत नगरसेवकांच्या विविध न्याय्य मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनामध्ये नगरसेवकांना किमान १५,००० मासिक मानधन, प्रत्येक नगरसेवकाला ५० लाखांचा समान विकास निधी, टोलमुक्त प्रवास सुविधा, १० लाखांचा वैद्यकीय विमा, शेतकरी कर्जमाफी बाबत न्याय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांतील लोकप्रतिनिधींचे अधिकार व सन्मान वाढविण्याच्या प्रमुख मागण्या करण्यात आल्या. यावेळी नगर सेवकानी स्थानिक स्वराज्य संस्था सक्षम करण्यासाठी सर्व पक्षीय नगरसेवकांनी एकत्र येणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. नगरसेवकांचा हा लढा कोणत्याही राजकीय पक्षाविरोधात नसून स्थानिक स्वराज्य संस्था बळकट करण्यासाठी आणि नगरसेवकांच्या न्याय्य हक्कांसाठी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीला अजय पांडुरंग धोबे, वैशाली सवई, संतोष जैन, करुणा कांबळे, कविता काळपांडे, गजानन रासकर,राधा इंगोले,अहमद जगीरदार,वैशाली लाहेवार,रुपाली कवानी,फरजाणा रहीम, प्रकाश शिकारे, जगीरदार सानऔला, करण तोडसान, पंकजा कघले, नंदेश्वर असुटकर, विजय हडपकर, वीरेंद्र रवांदरे, गणेश रवांदरे, गोपाल कलाने यांच्यासह जिल्ह्यातील विविध नगरपरिषद व नगर पंचायतींचे नगरसेवक उपस्थित होते. नगरसेवकांच्या मागण्यांवर शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास राज्यव्यापी संघटित आंदोलन उभारण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

# सवना वाकोडी रस्त्यावरील समस्यांना तातडीच्या दुरुस्तीचे आदेश

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**महागाव, दि. ७ :** वाकोडी–सवना मार्गावरील रखडलेल्या रस्त्याच्या कामाविरोधात ग्रामस्थांनी बेशरमाच्या झाडाला झेंडूचा हार घालून अनोखे आंदोलन केल्यानंतर या आंदोलनाची दखल घेत उमरखेड–महागाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन वानखेडे यांनी शनिवारी (५ जुलै) सकाळी वाकोडी येथे भेट देऊन रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी केली.

यावेळी संबंधित ठेकेदार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांना घटनास्थळी बोलावून आमदार वानखेडे यांनी रखडलेल्या कामाबाबत माहिती घेतली. रस्त्यावर साचलेले पाणी, चिखल आणि संथ गतीने सुरू असलेल्या कामावर त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत तातडीने दुरुस्ती करण्याच्या सूचना दिल्या. पाहणी दरम्यान ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी रस्त्याच्या समस्येसह पिक विमा, शेती संदर्भातील अडचणी आणि इतर प्रलंबित प्रश्न आमदार समोर मांडले. आमदारांच्या निर्देशानंतर संबंधित ठेकेदाराने जेसीबीच्या साहाय्याने रस्त्यात साचलेले पाणी काढण्याचे काम तात्काळ सुरू केले. तसेच रस्त्यावर मुरूम टाकून तात्पुरती दुरुस्ती करण्यात येईल आणि पावसाळा संपल्यानंतर उर्वरित काम पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते मारुती डोरले, अभिजित देशमुख, राजेश्वर गावंडे, संजय डोरले, रोहित गावंडे, विनोद बिडवई, संकेत डोरले, रवी रंग, वैभव खंडागळे, ज्ञानेश्वर देशमुख आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# दारव्हा शिक्षण विभागात महिला शिक्षिकेच्या मानसिक छळाचा आरोप..!

## प्रभारी गटशिक्षणाधिकाऱ्यांविरोधात शिक्षक संघ आक्रमक

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**दारव्हा, दि. ७ :** दारव्हा पंचायत समितीच्या शिक्षण विभागात एका महिला शिक्षिकेला मानसिक त्रास देऊन शासनाच्या बदली आदेशाकडे दुर्लक्ष केल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या प्रकरणामुळे प्रभारी गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, शिक्षक संघटनांनी संबंधित अधिकाऱ्यांविरोधात कठोर कारवाईची मागणी केली आहे.

सहाय्यक शिक्षिका जयश्री सिताराम राठोड यांची मे २०२५ मध्ये 'पती-पत्नी एकत्रीकरण' धोरणांतर्गत जि.प. प्राथमिक मराठी शाळा, महातोली येथे नियमानुसार बदली झाली होती. मात्र, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही त्यांना संपूर्ण शैक्षणिक वर्ष जुन्याच शाळेत कार्यरत ठेवण्यात आल्याचा आरोप आहे. यंदाच्या शैक्षणिक वर्षात कार्यमुक्त करण्याची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर राठोड या आदेश घेण्यासाठी पंचायत समिती कार्यालयात गेल्या असता, त्यांना मूळ पदस्थापनेऐवजी दुर्गम भागातील दुसऱ्या शाळेवर रुजू होण्याचे आदेश देण्यात आल्याचे सांगितले जाते. त्यांनी मूळ बदली आदेशाची अंमलबजावणी करण्याची विनंती केली असता, त्यांच्यावर दबाव टाकून जवळपास तीन तास कार्यालयात थांबविण्यात आले तसेच कायदेशीर कारवाईची भीती दाखवून आदेश स्वीकारण्यास भाग पाडल्याचा आरोप करण्यात आला आहे. या मानसिक छळामुळे त्रस्त झालेल्या शिक्षिकेने गटविकास अधिकाऱ्यांकडे निवेदन देत, "माझ्या जीवितास काही बरे-वाईट झाल्यास संबंधित अधिकारी जबाबदार राहतील,असा इशारा दिला आहे. यवतमाळ जिल्हा प्राथमिक शिक्षक संघ (रजि. क्र. २३५) यांनीही या प्रकरणात हस्तक्षेप करून निष्पक्ष चौकशी व दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. दरम्यान, प्रभारी गटशिक्षणाधिकाऱ्यांवर यापूर्वीही प्रशासकीय कामकाजातील मनमानी, आर्थिक हितसंबंध आणि कर्मचाऱ्यांच्या कथित मानसिक छळाचे आरोप झाले असल्याची चर्चा आहे. या ताज्या प्रकरणाची जिल्हा परिषद प्रशासन कोणती दखल घेते, याकडे शिक्षकांसह संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# गांधी चौकातील वाहतूक कोंडीवर संताप..!

## तातडीने उपाययोजना करा, अन्यथा नागरिकांचा उद्रेक

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**वणी, दि. ७ :** वणी शहरातील दिवसेंदिवस बिकट होत चाललेल्या वाहतूक कोंडीच्या प्रश्नावर अखेर मानवी हक्क सुरक्षा परिषद (ट्रस्ट) आक्रमक झाली असून, शहरातील वाहतूक व्यवस्था तातडीने सुधारण्याची मागणी करत वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक नरेश रनधिर यांना मंगळवारी निवेदन देण्यात आले.

निवेदनात गांधी चौकातील मोठी कमान ते टूटी कमान या मुख्य मार्गावर दर काही मिनिटांनी वाहतूक ठप्प होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. चारचाकी वाहने आणि ऑटो रिक्षांची अनियंत्रित वर्दळ, अतिक्रमण आणि अपुऱ्या नियोजनामुळे व्यापारी, विद्यार्थी व नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. परिषदेने या मार्गावरील चारचाकी वाहने व ऑटोरिक्षांच्या प्रवेशावर निर्बंध घालण्याची, तसेच आगामी गणेशोत्सव व दुर्गोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विशेष वाहतूक आराखडा तयार करण्याची मागणी केली आहे. सकाळी १० ते दुपारी ३ आणि सायंकाळी ५ ते रात्री ८ या गर्दीच्या वेळेत गांधी चौकात किमान दोन अतिरिक्त वाहतूक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याचीही मागणी करण्यात आली. या निवेदनावर प्रदेश अध्यक्ष राजू धावंजेवार, संपर्कप्रमुख परशुराम पोटे, उपाध्यक्ष विकेश पानपाटे, जिल्हा संपर्कप्रमुख सुमित्रा गोडे, महिला उपाध्यक्षा मनिषा निब्रड, शहराध्यक्ष अजय चन्ने, तालुका महिला अध्यक्षा सुनिता काळे, प्रमिला चौधरी, सुरेश बन्सोड, संजय चिंचोलकर, आकाश दुबे, अमोल कुमरे यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

भारतीय जनता युवा मोर्चाच्या

# युवा संवाद व कार्यकर्ता संमेलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## युवकांनी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या विचारांचा वारसा जपा;मान्यवरांचे आवाहन

**अचलपूर/वार्ताहर**

भारतीय जनता युवा मोर्चा, मेळघाट जिल्हा (अमरावती ग्रामीण) यांच्या वतीने आयोजित 'युवा संवाद व जिल्हा कार्यकर्ता संमेलन' उत्साहपूर्ण वातावरणात आणि कार्यकर्त्यांच्या प्रचंड प्रतिसादात पार पडले. कृषी उत्पन्न बाजार समिती, अचलपूर येथे आयोजित या कार्यक्रमासाठी सभागृह पूर्ण क्षमतेने भरले होते.कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार प्रविण तायडे यांच्या हस्ते अध्यक्षस्थानी भाजप मेळघाट जिल्हाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर होते. यावेळी आमदार केवलराम काळे, अचलपूर नगराध्यक्षा रुपाली अभय माथने, अंजनगाव सुर्जी नगराध्यक्ष अविनाश गायगोले, धारणी नगराध्यक्ष सुनील चोथमल, भाजप जिल्हा महामंत्री गोपाल चंदन आणि नयना जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.




कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून भाजप प्रदेश महामंत्री (ओबीसी मोर्चा) गजानन कोल्हे, भाजप जिल्हा महामंत्री सुधीर रसे आणि सदाशिव खडके यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय योगदानाचा गौरव करत राष्ट्रहितासाठी त्याग, समर्पण आणि अखंड भारताच्या संकल्पनेचा आदर्श युवा पिढीने घ्यावा, असे आवाहन केले. देशहित सर्वोच्च मानून कार्य करण्याची प्रेरणा डॉ. मुखर्जी यांच्या विचारांतून मिळते, असेही त्यांनी सांगितले.भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष तुषार खेरडे यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. जिल्हा सरचिटणीस चेतन काणेकर, प्रणित खवले, महेश कडू, क्षितिज रोहनकर,धम्मराज नवले,दिपक गायन, निखिल श्रीवास्तव तसेच सर्व जिल्हा पदाधिकारी, मंडळ अध्यक्ष,पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.संचालन चेतन काणेकर, प्रास्ताविक धम्मराज नवले, तर आभार निखिल श्रीवास्तव यांनी मानले.मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या पदाधिकारी, कार्यकर्ते, युवा बांधव आणि नागरिकांमुळे हे संमेलन उत्साहपूर्ण आणि संस्मरणीय ठरले.

# पावसामुळे अप्पर वर्धा धरणांतील जलसाठा ५०.७३ टक्क्यांवर

## खडकपूर्णा अद्याप कोरडेच

**अमरावती/का.प्र.**

विदर्भातील रखडलेल्या पावसाने जूनच्या उत्तरार्धात आणि जुलैच्या पहिल्या आठवड्यात घेतलेल्या दमदार हजेरीमुळे अमरावती विभागातील जलप्रकल्पांना मोठा दिलासा मिळाला आहे. गेल्या वीस दिवसांत झालेल्या चांगल्या पावसामुळे विभागातील प्रमुख ९ मोठ्या प्रकल्पांमधील उपयुक्त जलसाठा आता ४० टक्क्यांच्या पुढे सरकला आहे. अमरावती जिल्ह्याची जीवनवाहिनी असलेल्या अप्पर वर्धा प्रकल्पाने अखेर पन्नाशी पार केली असून मध्यम आणि लघु प्रकल्पांच्या पाणीपातळीतही वेगाने सुधारणा होत असल्याचे चित्र आहे. मात्र, बुलढाणा जिल्ह्यातील खडकपूर्णा प्रकल्प अद्यापही 'शून्यावर' आहे.

१७ जून रोजी अमरावती विभागातील ९ मोठ्या प्रकल्पांमध्ये अवघा ३५.४९ टक्के उपयुक्त जलसाठा होता. परंतु, ६ जुलैपर्यंत हा साठा ४०.५५ टक्क्यांवर (५६७.७३ दशलक्ष घनमीटर) पोहोचला आहे. अप्पर वर्धा प्रकल्पात १७ जून रोजी ४३.९२ टक्के असलेला जलसाठा आता ५०.७३ टक्क्यांवर पोहोचला आहे. प्रकल्पात सध्या २८६.१५ दलघमी उपयुक्त पाणी साठले आहे. नळगंगा (बुलढाणा) प्रकल्पात लक्षणीय वाढ झाली असून तो ३८.०६ टक्क्यांवरून थेट ५१.७९ टक्क्यांवर पोहोचला आहे. यवतमाळ जिल्ह्यातील अरुणावती प्रकल्पात ४१.२७ टक्के तर बेंबळा प्रकल्पात ३८.३३ टक्के साठा उपलब्ध झाला आहे. खडकपूर्णा (बुलढाणा) प्रकल्पात १ जूनपासून १२२ मिमी पाऊस होऊनही उपयुक्त जलसाठा अजूनही शून्य टक्क्यांवरच अडकला आहे.

विभागातील २७ मध्यम प्रकल्पांचा विचार केला तर १७ जून रोजी असणारा ३५.०२ टक्के साठा आता ४०.४८ टक्क्यांवर (३१२.४२ दलघमी) गेला आहे. अमरावती जिल्ह्यातील चंद्रभागा प्रकल्प सर्वाधिक ७९.२४ टक्के भरला आहे. त्याखालोखाल पूर्णा ६९.७४ टक्के आणि सपन ४०.४१ टक्क्यांवर स्थिर आहे. बोर्डी नाला प्रकल्पाचा साठा २.८९ टक्क्यांवरून ११.७२ टक्क्यांवर पोहोचला आहे. मात्र, अकोल्यातील घुंगशी बॅरेजमध्ये अद्याप शून्य उपयुक्त साठा असून त्याचे सर्व दरवाजे सध्या उघडे ठेवण्यात आले आहे. विभागातील २५२ लघु प्रकल्पांमध्येही सुधारणा दिसून येत असून ११ जून रोजी २१.२० टक्के असलेला साठा २ जुलैच्या अहवालानुसार २२.२५ टक्क्यांवर पोहोचला आहे. ६ जुलैच्या ताज्या आकडेवारीनुसार, मागीलवर्षी याच दिवशी अमरावती जिल्ह्यात ४०.८७ टक्के साठा होता, तर यंदा तो ४४.१५ टक्क्यांवर आहे. जून महिन्याच्या सुरुवातीला पावसाने दिलेली ओढ पाहता, जुलैच्या पहिल्या आठवड्यात झालेली ही वाढ विदर्भातील शेती आणि पिण्याच्या पाण्याच्या दृष्टीने अत्यंत दिलासादायक मानली जात आहे.

# वन्यप्राण्यांचा धुमाकूळ; तीन एकरांतील पेरलेली तूर उद्धवस्त

**अमरावती/का.प्र.**

नांदगाव पेठ परिसरात वन्यप्राण्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून, त्याचा फटका शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात बसत आहे. ताज्या घटनेत येथील शेतकरी संजय रामभाऊ इंगळे यांच्या तीन एकर शेतातील तुरीचे पीक वन्यप्राण्यांनी पूर्णपणे फस्त केल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे दुबार पेरणीचे संकट आणि आर्थिक अडचणी शेतकऱ्यांसमोर उभ्या ठाकल्या आहेत.

यंदा पावसाने उशिरा सुरुवात केल्यामुळे पेरणीही उशिरा झाली होती. पाऊस पडल्यानंतर मोठ्या कष्टाने पेरलेली तूर उगवू लागली, मात्र वन्यप्राण्यांच्या कळपांनी शेतात घुसून कोवळे पीकच नष्ट केले. काही तासांतच तीन एकरांतील तुरीची लागवड उद्धवस्त झाल्याने शेतकऱ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरले.विशेष म्हणजे, हा प्रकार केवळ एका शेतकऱ्यापुरता मर्यादित नसून नांदगाव पेठ परिसरातील अनेक शेतांमध्ये वन्यप्राण्यांकडून पिकांची नासधूस होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली असून वन विभाग आणि महसूल प्रशासनाने तातडीने लक्ष घालण्याची मागणी जोर धरत आहे.

संबंधित विभागाने त्वरित पंचनामा करून नुकसानभरपाई जाहीर करावी तसेच वन्यप्राण्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी केली आहे. अन्यथा शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची भीती व्यक्त होत आहे. शासनाने तातडीने पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावी.

## जिल्ह्यातील सात तालुके सरासरी पावसाच्या दूरच

**अमरावती-**जिल्ह्यात यंदाच्या जून व जुलै महिन्यात आतापर्यंत झालेल्या पावसाची आकडेवारी पाहता, जूनपासून आजपर्यंत (६ जुलै) जिल्ह्यात सरासरीच्या ९५ टक्के पाऊस झाला आहे. अद्यापही जिल्ह्यातील सात तालुके १०० टक्के सरासरीच्या पुढे गेलेली नसल्याने खरीप हंगामातील पिकांसाठी आवश्यक ओलावा टिकून राहील का, याबाबत शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. केवळ सात तालुक्यांनीच सरासरी गाठली आहे.

जिल्हा प्रशासनाच्या सोमवारच्या अहवालानुसार जूनपासून आजपर्यंत जिल्ह्याची सरासरी पर्जन्यमानाची अपेक्षा १९४.० मिमी असून प्रत्यक्षात १८४.३ मिमी पाऊस नोंदला गेला आहे. त्यामुळे जिल्हा सरासरीच्या केवळ ९५ टक्क्यांवर आहे. तालुकानिहाय पाहता चांदूर बाजार १२८.७ टक्के, अंजनगाव ११६.७ टक्के, नांदगाव खंडेश्वर ११५.६ टक्के, मोर्शी ११५.० टक्के, धारणी १११.० टक्के आणि दर्यापूर १०९.६ टक्के, वरूड १००.५ टक्के या तालुक्यांनी सरासरीपेक्षा अधिक पावसाची नोंद केली आहे. तर भातकुली ६६.४ टक्के, अचलपूर ७०.४ टक्के, धामणगाव रेल्वे ७४.१ टक्के, चिखलदरा ७८.६ टक्के, अमरावती ८२.३ टक्के, चांदूर रेल्वे ८८.१ टक्के आणि तिवसा ९१.९ टक्के या तालुक्यांमध्ये अद्याप सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. जिल्ह्यात २४ तासांत केवळ ०.३ मिमी पावसाची नोंद झाली. जुलै महिन्यात आतापर्यंत ५३.७ मिमी सरासरीच्या तुलनेत ४५.० मिमी (८३.८ टक्के) पाऊस झाला आहे.

# राज्य महामार्गावरील नालीवरील खड्डा तात्काळ बुजवा

## नगरसेवक अविनाश ढेगे यांची सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मागणी

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

शहरातील राज्य महामार्गावर असलेल्या नालीवरील रपटे खचल्यामुळे मोठे खड्डे पडले असून, यामुळे अपघाताची दाट शक्यता निर्माण झाली आहे. हे खड्डे तात्काळ बुजवून रपट्याचे मजबूत बांधकाम करण्यात यावे, अशी मागणी अंजनगाव सुर्जी नगर परिषदेचे प्रभाग क्रमांक १४ चे नगरसेवक अविनाश ज्ञानेश्वर ढेंगे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपविभागीय अभियंत्यांकडे एका पत्राद्वारे केली आहे.

यावेळी नईम बेग बांधकाम सभापती, गजानन विजेकर, श्रीकांत जुनघरे, उपस्थित होते. नगरसेवक ढेंगे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिलेल्या पत्रात नमूद केले आहे की, त्यांच्यामार्फत राज्य महामार्गावर नालीचे बांधकाम करण्यात आले आहे. मात्र, टाकरखेडा नाका येथील मुख्य चौक आणि सारडा हॉस्पिटलसमोरील मुख्य चौकातील नालीवरील रपटा खचला आहे. या ठिकाणी मोठे आणि धोकादायक खड्डे पडले आहेत. हे दोन्ही मार्ग अत्यंत रहदारीचे असून यावरून नागरिकांची व वाहनांची सतत मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते.रस्ता आणि नालीवरील रपटा मधोमध खचल्यामुळे नागरिकांना ये-जा करताना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे.सध्या असलेले नालीवरील रपटे हे जड वाहनांचा भार पेलण्याइतके मजबूत नसल्यामुळे ते खचले आहेत. त्यामुळे भविष्यातील धोका टाळण्यासाठी या रस्त्यावर अत्यंत मजबूत रपटा बांधणे अत्यंत आवश्यक असल्याचे पत्रात म्हटले आहे.



टाकरखेडा नाका येथील मुख्य चौक आणि सारडा हॉस्पिटलसमोरील मुख्य चौकाची तात्काळ पाहणी करावी आणि तेथील खड्डे त्वरित बुजवावेत, अशी मागणी ढेंगे यांनी केली आहे. याकडे दुर्लक्ष केल्यास आणि भविष्यात या ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार किंवा अपघात घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची राहील, असा इशाराही नगरसेवक अविनाश ढेंगे यांनी पत्रातून दिला आहे.

# अमृत भारत एक्सप्रेस आता नियमित

## नागपूर, बडनेरा आणि भुसावळसाठी एक मोठी भेट

**अमरावती/का.प्र.**

पूर्व भारतातील ब्रह्मपूर आणि पश्चिम भारतातील उधना यांना जोडणारी १९०२१/१९०२२ अमृत भारत एक्सप्रेस आता नियमितपणे धावणार आहे. ही ट्रेन आठवड्यातून तीन दिवस धावेल, ज्यामुळे विदर्भासह नागपूर, बडनेरा आणि भुसावळ येथील प्रवाशांना जलद, थेट आणि आधुनिक रेल्वे प्रवासाचा एक नवीन अनुभव मिळेल.

ब्रह्मपूर-उधना दरम्यान रेल्वे संपर्क - पूर्व आणि पश्चिम भारतामधील रेल्वे संपर्क अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने सुरू झालेली ब्रह्मपूर-उधना अमृत भारत एक्सप्रेस, उद्घाटनाच्या विशेष फेरीनंतर आता नियमित साप्ताहिक सेवा म्हणून धावेल. या ट्रेनचे नाव १९०२१ उधना-ब्रह्मपूर असे असेल. आणि ट्रेन क्रमांक १९०२२ ब्रह्मपूर-उधना. ही ट्रेन ओडिशा, छत्तीसगड, महाराष्ट्र आणि गुजरात या चार राज्यांना जोडेल, ज्यामुळे प्रवाशांना उत्तम रेल्वे सुविधा मिळेल. याचे एक विशेष वैशिष्ट्य म्हणजे विदर्भातील प्रवाशांना पूर्व भारताशी थेट रेल्वे जोडणी मिळेल.

१९०२१ अमृत भारत एक्सप्रेस सकाळी ७:१० वाजता उधना येथून सुटेल आणि दुपारी १२:२५ वाजता भुसावळ, दुपारी ४:२० वाजता बडनेरा आणि सायंकाळी ७:२० वाजता नागपूर येथे पोहोचेल. त्यानंतर ही गाडी वर्धा, गोंदिया, दुर्ग, रायपूर, रायगडा, विजयनगरम, श्रीकाकुलम रोड आणि पलासा मार्गे प्रवास करून दुसऱ्या दिवशी दुपारी १:५५ वाजता ब्रह्मपूर येथे पोहोचेल. यामुळे विदर्भातून पूर्व भारताकडे होणारा प्रवास पूर्वीपेक्षा अधिक सोयीस्कर आणि वेळेची बचत करणारा होईल.

नागपूर, बडनेरा आणि भुसावळ यांसारख्या प्रमुख स्थानकांवरील थांब्यांमुळे विदर्भातील व्यावसायिक, विद्यार्थी, नोकरदार, पर्यटक आणि धार्मिक स्थळांना भेट देणाऱ्या प्रवाशांना मोठी सोय होईल. थेट रेल्वे सेवेच्या उपलब्धतेमुळे वेळेची बचत होईल. शिवाय, पूर्वी अनेक प्रवाशांना पूर्व किनारपट्टीच्या भारतात प्रवास करण्यासाठी गाड्या बदलाव्या लागत होत्या. रेल्वे प्रशासनाला आशा आहे की यामुळे विदर्भ आणि पश्चिम भारत यांच्यातील औद्योगिक, व्यावसायिक आणि सामाजिक संबंधांनाही चालना मिळेल.

अमृत भारत एक्सप्रेस सर्वसामान्य जनतेला आधुनिक आणि आरामदायी प्रवास देण्यासाठी तयार करण्यात आली आहे. या ट्रेनमध्ये एकूण २२ डबे असून, त्यात सुधारित आसनव्यवस्था, आकर्षक एलईडी रोषणाई, मोबाईल चार्जिंगची सुविधा, प्रवासी माहिती प्रणाली, अधिक सुरक्षित अंतर्गत रचना आणि स्वच्छतेवर विशेष लक्ष देण्यात आले आहे. रेल्वेने लांब पल्ल्याच्या प्रवाशांना उत्कृष्ट प्रवासाचा अनुभव देण्यासाठी अनेक आधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या.

# पावसाच्या 'पुनर्वसू' नक्षत्राला प्रारंभ

## १३ ते १६ जुलै दरम्यान, दमदार पावसाची शक्यता

**चांदूरबाजार/वार्ताहर**

हजारो वर्षा पूर्वी शेतीचा शोध लागला तेव्हा, हवेची दिशा.वाऱ्याचा वेग,सायंकाळी सुर्य मावळतीच्या वेळी आकाशातील स्थीती. तसेच पक्षांचे आवाज व त्यांच्या वागण्याच्या स्थिती वरून पावसाचा अंदाज बांधल्या जाता होता. मुंग्या, मुंगळे,उधळी या किटकांच्या स्थलांतरा वरून ही जुनी जानकार माणसे पावसाचा अंदाज वर्तवित होती.त्यानंतर पंचांगाशास्त्राची निर्मिती झाली.तेव्हा पासून तत्कालीन खगोल शास्त्रा वरून, नक्षत्र,चंद्र, सूर्य,ग्रह, यांचे आकलन करून पावसाचा अंदाज वर्तविण्यास सुरुवात झाली.आज ही या पंचांग शास्त्रीय हवामान अंदाजावर शेतकऱ्यांचा विश्वास दिसून येतो.त्या पंचांगशास्त्रानुसार पावसाच्या 'पुनर्वसू' नक्षत्राला सुरुवात झाली आहे.

पावसाळ्याच्या एकूण १२ नक्षत्रा पैकी, पावसाचे चौथे नक्षत्र म्हणजे पुनर्वसू नक्षत्र होय. या बारा ही नक्षत्रात पावसाचे मान कसे असेल.हे खगोलशास्त्राचा आधार घेऊन,ग्रह,तारे, नक्षत्र यांची त्या त्या पावसाच्या नक्षत्रातील स्थितीचा अभ्यास करून पावसाचा अंदाज पंचांग शास्त्रा व्दारे वर्तविला जातो. त्या अंदाजानुसार या नक्षत्राचे वाहन'घोडा' आहे. या नक्षत्रात चांगल्या पावसाचा अंदाज असून सर्वदूर खरीपाची पेरणी होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.तसेच अमावस्येच्या सुमारास १३ ते १६ जुलै दरम्यान, सर्वदूर दमदार पावसाची शक्यता दिसून येते.या नक्षत्राचे वाहन घोडा असल्याने, एकाच वेळी सर्वदूर पाऊस न होता पाऊस उडाणचा असेल.आज एका भागात,तर उद्या दुसऱ्या भागात.असा पाऊस होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पावसाळ्याचा हा संपूर्ण अंदाज पंचांग शास्त्राने, ग्रह तात्यांच्या घडामोडींवर आधारित वर्तविला आहे. तरी शेतकऱ्यांनी हवामान खात्याचा अंदाज, आपल्या भागातील प्रत्यक्ष अनुभव व परीस्थिती पाहूनच आपले निर्णय घ्यावेत.

## प्रलंबित प्रकरणांच्या तडजोडीसाठी विशेष लोकअदालत

**अमरावती-**न्यायप्रक्रियेत नागरिकांचा सहभाग वाढवून न्याय आपल्या दारी ही संकल्पना राबविण्याच्या उद्देशाने सर्वोच्च न्यायालयामार्फत समाधान समारोह या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचा समारोप येत्या २१ ते २३ ऑगस्ट रोजी आयोजित विशेष लोकअदालतीने होणार आहे. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा संमती-आधारित प्रक्रियेद्वारे, सलोख्याने व जलद गतीने निपटारा करणे हा या विशेष लोकअदालतीचा मुख्य उद्देश आहे. या माध्यमातून पक्षकारांना दीर्घकालीन न्यायप्रक्रियेतून मोठा दिलासा मिळणार असून, परस्पर सहमतीने वाद मिटविण्याची संधी उपलब्ध होणार आहे. जिल्ह्यातील सर्व वकील, पक्षकार तसेच संबंधित हितधारकांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून वादांचे प्रभावी निराकरण करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष संजय सहारे यांनी केले आहे.

# संक्षिप्त

## वरद तुळजापूरकर- हेडा आकाशवाणीवर



**अमरावती-**'सॉफ्ट स्कीलमधून व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर प्रख्यात सॉफ्ट स्कील ट्रेनर वरद तुळजापूरकर-हेडा यांची मुलाखत सोमवार (दि.१३) आणि मंगळवार (दि. १४) रोजी सकाळी १० वाजता आकाशवाणीच्या अमरावती केंद्रावरून प्रसारित केली जाणार आहे. लोकप्रिय निवेदक नितीन भट यांनी त्यांच्याशी संवाद साधला आहे. 'नमस्कार अमरावती' या कार्यक्रमात ही मुलाखत प्रसारित केली जाईल. सॉफ्ट स्कील म्हणजे काय, टेक्निकल स्कील आणि सॉफ्ट स्कील यातील फरक, आजच्या काळात सॉफ्ट स्किल्सचे महत्त्व, मानवी संवादातील चुका, आत्मविश्वास संपादित करण्यासाठी काय करावे, मुलाखतीचे तंत्र, सेल्फ अवेअरनेस, करिअरच्या प्रगतीसाठी सॉफ्ट स्किल्सचा उपयोग, देहबोली, इमोशनल इंटेलिजन्स कसे विकसित करावे, नाही कसे म्हणावे, खुलून दिसण्याचे महत्व, दुसऱ्याच्या गुणांचा स्वीकार आदी विषयांवर या मुलाखतीत वरद तुळजापूरकर - हेडा भाष्य करतील. या कार्यक्रमाची निर्मिती आकाशवाणी अमरावती केंद्राची असून सादरकर्ते भैय्यालाल टेकाम आहेत. हा कार्यक्रम आकाशवाणी अमरावती केंद्राबरोबरच News On Air या मोबाईल ॲपवर देखील ऐकता येईल.

## गजानन पवार सेवानिवृत्तीनिमित्त निरोप

**अमरावती-** विभागीय माहिती कार्यालयातील कर्मचारी गजानन पवार (माजी सैनिक) हे प्रदीर्घ सेवेनंतर नुकतेच सेवानिवृत्त झाले.



त्यांच्या या सेवानिवृत्ती निमित्त कार्यालयाच्या वतीने आयोजित छोटेखानी समारंभात त्यांना हृद्य व भावपूर्ण निरोप देण्यात आला. विभागीय माहिती उपसंचालक अनिल आलुरकर यांच्या हस्ते पवार यांचा शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय माहिती उपसंचालक होते. सहा. संचालक(माहिती) विजय राऊत, प्रदर्शन सहाय्यक विश्वनाथ धुमाळ, वरिष्ठ लिपीक सुनील काळे, दिनेश धकाते, श्रीमती वैशाली तराळे, लिपीक नि टंकलेखक जयप्रकाश बानाईत, श्रीमती प्रगती कल्पेकर, कॅमेरामन मो. हबीब शेख, कुमार हरदुले, छायाचित्रकार मनीष झिमटे, वाहन चालक सुधीर पुनसे, स्वप्नील महल्ले, अनिल वाडाणे, संदेश वाहक श्रीमती कांचन अंधारे, दिपाली ढोमणे आदी अधिकारी-कर्मचारी यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

## संत गुलाबराव महाराज यांना अभिवादन

**अमरावती-**प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराज यांच्या जयंतीनिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात अपर आयुक्त संजय जाधव यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी उपायुक्त संतोष कवडे, राजीव फडके, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, नायब तहसीलदार श्यामसुंदर देशमुख यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचारी आदी उपस्थित होते. उपस्थितांनीही प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.




## सनबीम स्कूलचा प्रथम वर्धापन दिन



**कुऱ्हा-**सनबीम स्कूलचा प्रथम वर्धापन दिन उत्साहात आणि आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला.अध्यक्ष डॉ. व्ही. एन. सूर्यवंशी सहाय्यक विभागीय सचिव, नाशिक विभाग, गोखले एज्युकेशन सोसायटी तर म्हणून प्रमुख पाहुणे आशिष बांबल सरपंच, करजगाव मान्यवर अतिथी अक्षय देशपांडे क्वालिटी अँड सिस्टिम्स डायरेक्टर, गो. ए. सोसायटी,डॉ. एल. पी. शर्मा कार्यकारी अधिकारी, गुरुदक्षिणा प्रकल्प इतर मान्यवर श्रेया नारके मुख्य समन्वयक, सनबीम स्कूल, सुरेखा जोगी सहाय्यक शाखा सचिव, सनबीम स्कूल.सुलक्षणा तळवतकर अधीक्षक, सनबीम स्कूल समन्वयक, सनबीम स्कूल डॉ. विजय देवळे,डॉ. प्रशांत ठोसर,डॉ. उमाकांत वनवे शाळेचे व्यवस्थापन समिती सदस्य, पालक,सर्व शिक्षक वृंद , शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.श्रेया नारके ब्रँच सेक्रेटरी Sunbeam School यांनी संस्थेविषयी माहिती दिली, व संस्थेतील इतर मान्यवरांनी मार्गदर्शन केले.विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आकर्षक समूहगीत, भाषणे आणि विविध कलागुणांच्या सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी आणि पालकांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाच्या अंती सुलक्षणा तळवलकर यांनी शाळेच्या वतीने सर्व मान्यवर अतिथी चे आभार व्यक्त केले.

## प्रज्ञाचक्षु श्री गुलाबराव महाराज यांची जयंती



**अमरावती-**स्थानिक अस्मिता शिक्षण मंडळ द्वारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे नुकतेच प्रज्ञाचक्षु श्री गुलाबराव महाराज जयंती संपन्न झाली. या प्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मीनल भोंडे या उपस्थित होत्या. याप्रसंगी प्राचार्यांनी श्री गुलाबराव महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन आणि हारार्पण केले आणि मार्गदर्शन करताना श्री गुलाबराव महाराज यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.विदर्भ संतांची कर्मभूमी म्हणून ओळखला जातो.इतर संतांप्रमाणेच श्री गुलाबराव महाराजांनीही अतिशय कमी वयात नावलौकिक मिळविला. त्यांनी केलेल्या लेखन कार्याने विदर्भच समृद्ध झाला नाही तर सर्व विश्वच समृद्ध झाले.त्यांच्या साहित्याचे अध्ययन शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी करून त्याचा प्रसार आणि प्रचार करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी या प्रसंगी केले. कार्यक्रमाचे आयोजन आणि संचालन प्रा.डॉ. गजानन काळे रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा.डॉ. बबीता येवले महिला रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी मानले.कार्यक्रमाला शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# कचऱ्याचे डोंगर हटले, पाण्याचे प्रदूषणही टळले

**नऊ लाख टन कचऱ्याचा डोंगर हलविणाऱ्या 'जनआधार'च्या दिशादर्शक कामाने सर्वांना अचंबित केले आहे. वंचितांच्या जीवनात आत्मप्रतिष्ठेचे स्वप्न रुजविणाऱ्या जनआधार व संजय कांबळे यांचे कौतुक करावे तितके कमीच आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कचऱ्यामुळे होणारे पाणी स्त्रोत व भूजलावरील विपरीत परिणाम आता कमी झाले आहेत.**

लातूर शहरात रोज १५० टन कचरा तयार होत असे. तो २००४ पासून जवळच्या करवंटी गावच्या गायरानात उघड्यावर टाकला जाई. दरवर्षी सुमारे ५४ हजार टन कचरा पडत गेल्यामुळे २०१७ पर्यंत नऊ लाख टनांपेक्षा जास्त कचऱ्याचा डोंगर उभा राहिला. या कचऱ्यातून वाहणारे पाणी (लिचेट) मुरल्यामुळे बाजूच्या चार किलोमीटर परिसरातील सर्व ओढे, नाले, विहिरी, बोअर यांचे पाणी प्रदूषित झाले. त्यामुळे आपोआपच शेतीही नासली, नापीक झाली. दुर्गंधी, डास आणि माश्यांबरोबरच अनारोग्य व रोगराई अशा अनेक समस्यांनी पंचक्रोशीतील लोक हैराण झाले. त्यातूनच उभे राहिले त्या लोकांचे जनआंदोलन. लोकांनी गाऱ्हाणं एनजीटी न्यायालयात नेलं. न्यायालयाने निर्णय गावकऱ्यांच्या बाजूने देत दोन आदेश दिले.

१) करवंटीला कचरा डेपोवर नियमित येणारा सर्व कचरा दररोज प्रक्रिया करून विल्हेवाट लावा. २) असलेला जुना कचरा पूर्णपणे प्रक्रिया करून जागा रिकामी करा. या आदेशात जन-आधार संस्थेचा खास उल्लेख करत त्यांची मदत घेण्यासंदर्भात महानगरपालिकेला सूचना केली होती. 'हो.. ना' करता हे कचऱ्याचे डोंगर हलविण्याचे आव्हान संजय कांबळे आणि त्यांच्या जन-आधार संस्थेकडेच आले.

नगरपालिकेची कचरा विभागाची काही मशिनरी वापरण्याचे करारात ठरले असले, तरी त्या तोकड्या यंत्राद्वारे रोज केवळ शंभर टन कचऱ्यावर प्रक्रिया शक्य होती. वर्षाला ३० हजार टन याप्रमाणे नऊ लाख टनांचा कचरा उचलणे हे आव्हानच होते. जन-आधार संस्थेला यंत्रांच्या खरेदीसाठी भांडवल मिळवणे, हे दुसरे आव्हान होते. पण स्नेही व हितचिंतक, भांडवलदार मित्र व परिचित यांची मदत घेत यंत्रणा उभी केली.

यंत्रणा व रचनेचे उत्तम उदाहरण. संस्थेच्या लोकांना कचऱ्याचे वर्गीकरण विलगीकरण केले. त्याची व्यावसायिक विल्हेवाट लावली. त्यातून दीड हजार लोकांचे अर्थकारण उंचावले. लातूर शहरात पाच ठिकाणी कचरा विलगीकरण केंद्र सुरू केले. त्याला लागूनच 'शेषक' (भंगार - कबाड) खरेदी विक्री केंद्र सुरू केले. बायो मायनिंगची यंत्रणा खास गोव्याहून खरेदी केली. त्या चालवण्याचे लोकांना प्रशिक्षण दिले.

या यंत्रणेमध्ये कचरा विभागणीच्या विविध चाळण्या असतात. ३५ मि.मी. च्या चाळणीतून विटा, चपला, साड्या, रेक्झिन व त्यांचे तुकडे बाजूला होतात. दुसऱ्या १६ मि.मी.च्या चाळणीतून खडी व अनेक उत्पादनांचे सॅचेट्स बाजूला होतात. (उदा. शाम्पू, गुटखा इ.) तिसऱ्या ८ मि.मी. च्या चाळणीतून वाळू, काचेचे तुकडे, कच, खडी बाजूला होते. चौथ्या चाळणीच्या आरपार जाणारे मटेरिअल हे मातीवजा खतच असते. प्रति दिन एक हजार टन क्षमतेच्या तीन मशीन काम करतात. पावसाळ्याचे तीन चार महिने वगळत सुमारे आठ महिने काम चालते. ऑक्टोबर २०१८ पासून सप्टेंबर २०२१ पर्यंत जन-आधार संस्थेने ८० टक्के कचऱ्याचा डोंगर हटवला होता. त्यासोबतच शहरात रोज गोळा होणाऱ्या कचऱ्याची शंभर टक्के विल्हेवाटही लावली जात होती. कचऱ्याचे २९ प्रकारात वर्गीकरण केले जाते. यात प्लॅस्टिकचे पंधरा-सोळा प्रकार आहेत. कॅरीबॅग, दुधाची पिशवी, तेलाची पिशवी काही काळ्या तर काही पांढऱ्या पारदर्शक. पाण्याची बाटली, पीव्हीसी मटेरियल, प्लॅस्टिक कंटेनर, धान्य व सिमेंटच्या बॅग्ज व अन्य. मग येतो कागदाचा नंबर. त्यात खाकी कागद, वर्तमानपत्र, वही पुस्तक, बॉक्स, जाड कागदाच्या वस्तू इ. त्यानंतर चपला, त्यातही प्रकार रबरी, प्लॅस्टिक, लेदर पादत्राणे, त्यानंतर कापडाचे प्रकार चिंधी, नायलॉन, टेरीकॉट, सुती, जिन्स इ. असे वेगळे वेगळे केले जातात. काचेची बाटली वेगळी, फुटलेली बाटली वेगळी, थर्मोकोल, बॅग्ज इ. अशा प्रकारे प्लॅस्टिक, रबर, पॉलिमर, कापडी, लेदर इ. असे सर्व २९ प्रकार वेगळे केले जातात. तिथेच वेगवेगळे ढीग न गट्टे




करून त्यांची विक्रीही तिथेच केली जाते. सुमारे ८० टक्के घटकांची दर आठवड्याला विक्री होते. त्यांचा पुनर्वापर प्रक्रिया सुरू होते. त्याचे सगळे पैसे कचरेवेचकांना मिळतात. ओल्या व कुजणाऱ्या पदार्थांपासून खत केले जाते.

रोज ५ टन गोळा होणाऱ्या शहाळे, नारळाच्या शेंड्या, करवंट्यांपासून कोकोपीट व क्वायर निर्मितीसाठी यंत्रे आणली आहेत. कोकोपीट रोपवाटिकेत वापरले जाते. तिथून हजारो रोपे तयार होतात. रोज तयार होणाऱ्या कचऱ्याची तातडीने विल्हेवाट लागत असल्याने संभाव्य हवा, जमीन आणि पाणी यांचे प्रदूषण टाळले जाते. अनारोग्य, दुर्गंधी याचेही प्रमाण कमी झाले आहे. अखिल भारतीय पातळीवर २०१९ नंतर २०२१ मध्येही इंदूर व सूरतबरोबरच लातूरलाही स्वच्छतेचा प्रथम पुरस्कार मिळाला. इंदूरच्या बक्षिसाचा गवगवा जितक्या प्रमाणात होतो, तितका प्रचार लातूरचा होताना दिसत नाही. नाबलौकिकापेक्षाही अतिवंचित समूहामध्ये आर्थिक बदल घडल्याचा आनंद संजय कांबळे यांना जास्त आहे.

**चांगले काम करूनही आजची वस्तुस्थिती...**

■ 'जनआधार'ची कोट्यवधी रुपयांची बिले गेल्या तीन वर्षांपासून मिळणे बाकी आहेत.

■ कचऱ्यांच्या व्यवस्थापनात केवळ फायद्याचा आशेने उतरणाऱ्यांचे प्रमाण वाढले असून, ते लोक शासनाकडून भरपूर निधी मंजूर घेत आहेत.

■ 'जनआधार'च्या ८५० पैकी ३०० लोकांनाच कामावर घेतले आहे. उर्वरित ५० पेक्षा अधिक लोक पुन्हा बेरोजगार झाले आहेत.

■ सध्या कचरा वर्गीकरण पूर्ण बंद असून, त्यासाठी बांधलेली शेडही पाडली आहे.

■ करवंटी येथे पुन्हा कचऱ्याचे डोंगर तयार होत आहेत. पुन्हा सात गावांचे पाणी, भूजल, माती झपाट्याने प्रदूषणाचे प्रमाण वाढणार आहे.

ओल्या कचऱ्यातील हॉटेलचे उरले वराह पालनासाठी वापरले जाते. या प्रकल्पातून वैदू, पाथरवट, वडार, मसणजोगी या भटक्या जमातीतील तरुणांना रोजगार उपलब्ध झाला आहे. अशा सर्व कामातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष हजारो लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. नियमित रोजगारामुळे वंचितांना आत्मविश्वास, आत्मसन्मान प्राप्त होत आहे.

**प्रवास टोमण्यांपासून प्रतिष्ठेपर्यंतचा...**

संजय कांबळे यांनी बाबा आमटे व गाडगे महाराजांपासून प्रेरणा घेतली आहे. तसेच कॉलेज जीवनानंतर काही दिवस गिरीश प्रभूणे व तळेगाव दाभाडे येथील आनंदराव चाफेकर यांच्यासोबत काम केले आहे. 'हात न पसरू कधी' हे चाफेकर यांचे व 'दान माणसाला नादान बनवते' हे बाबा आमटे यांची वचने त्यांच्या मनावर चांगलीच कोरली गेली आहेत.

सुरुवातीला या कामासाठी त्यांच्या वडिलांचाही विरोध होता. लोकही 'तू तर आता कचऱ्याच झाला बे !' किंवा 'तुम्ही दुसरे काय करू शकणार, शेवटी कचराच उचलणार' असे टोमणे देत. त्याकडे दुर्लक्ष करत आपल्या कामातून संजय कांबळे यांनी आदराचे स्थान प्राप्त केले आहे. २००८ मध्येच त्यांना पुण्यातील 'नातू पुरस्कार' आणि 'परम पुरस्कार' देण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या दोन पुरस्कारांमध्ये 'साहित्य रत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार' मार्च २०१७ मध्ये, तर 'शाहू -फुले - आंबेडकर सेवाकार्य पुरस्कार' २०१९ मध्ये मिळाला. लातूरला दिलेल्यामध्ये मिळालेल्या दोन्ही पुरस्कारांमध्ये त्यांच्या कार्याची गौरवही आपोआपच झाला आहे. २०२१ चा पुरस्कार कचरावेचक महिलेनेच स्वीकारण्याची कल्पनाही त्यांचीच.

'पायरीचा दांड' होण्याचे तत्व त्यांनी पाळले आहे. त्यांच्या समाजाला लोकप्रियतेमुळे राजकीय पक्षांचे आमंत्रणे, आफरे आली तरी त्यापासून संजय कटाक्षाने दूर राहिले आहेत.

**सतीश खाडे**
९८२३०२०२१८,

# भारतीय पासपोर्टची घसरण

ग्लोबल पासपोर्ट इंडेक्स २०२६ च्या अहवालानुसार भारताचा पासपोर्ट एका स्थानाने घसरून एकूण २०० देशांमध्ये १२५ व्या क्रमांकावर आला आहे. हा निर्देशांक इतर पारंपारिक निर्देशांकां सारखा (उदा. हेन्ली पासपोर्ट इंडेक्स ज्यामध्ये भारतीय पासपोर्ट ७८ व्या स्थानावर आहे) केवळ व्हिसामुक्त प्रवासावर अवलंबून नाही, तर त्या देशातील व्हिसामुक्त प्रवासाची सोय, आर्थिक सुबत्ता आणि गुंतवणुकीच्या संधी आणि आरोग्य, सुरक्षा आणि पायाभूत सुविधावर आधारित राहणीमानाचा दर्जा या तीन मुख्य निकषांच्या आधारे मूल्यांकन केले जाते.

युरोपीय देश या तिन्ही निकषांवर सर्वोत्तम कामगिरी करत असल्यामुळेच या यादीत पहिल्या १० पैकी ९ देश युरोपातील आहेत. यामध्ये पहिल्या स्थानावर स्वीडन व नंतर स्वित्झर्लंड (दुसरे), फिनलंड (तिसरे) आणि जर्मनी (चौथे) या देशांचा क्रमांक लागतो. विशेष म्हणजे पहिल्या १० देशांच्या यादीत सिंगापूर (१० वे स्थान) हा एकमेव आशियाई देश आहे. एकीकडे स्वीडन, स्वित्झर्लंड, सिंगापूर सारख्या देशातील नागरिकांना जगातील १५० हून अधिक देशांमध्ये व्हिसामुक्त प्रवेश मिळतो तर दुसरीकडे भारतीय पासपोर्ट धारकांना केवळ २६ देशांमध्ये व्हिसामुक्त आणि ३० देशांमध्ये 'आगमन-समयी व्हिसा' प्रवासाची परवानगी मिळते. त्यामुळे आपल्या नागरिकांना अनेक प्रगत देशात प्रवास करण्यासाठी गुंतागुंतीच्या व्हिसा प्रक्रियेचा सामना करावा लागतो. अशावेळी आपली अर्थव्यवस्था मजबूत होत असताना आपल्या पासपोर्टची जागतिक क्रमवारी सुधारण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याची गरज आहे.

**प्रदीप मोरे**

# भौतिक प्रश्न आणि मानवनिर्मित 'सिस्टीम'

हे दुर्दैव आहे की, अनेकजण अमीर खानचे तिसरे/चौथे/ पाचवे लग्न (किंवा तत्सम अनेक क्षेत्रातील सेलिब्रटीनच्या) रिलेशनशिप, विभक्त होणे याबद्दल तासन्तास रवंथ करत बसतात;पण आपल्या समाजात, देशात अनेक तरुणांची लग्ने न होण्याची मुळे इथल्या आर्थिक, शेती, रोजगार विषयक धोरणात आहेत याचे त्यांना भान देखील नसते.

फालतू मराठी टीव्ही सिरियल्स मधील स्त्री पुरुषांच्या लफड्यांवर चर्चा करत तासन्तास घालवत असतात, पण आपल्या स्वतःच्या किंवा आजूबाजूच्या अनेक संसारातील ताणतणाव यांची मुळे आर्थिक ओढग्रस्ती, घरांचे प्रश्न, आहेत याबद्दल ते अनभिज्ञ असतात.

'क्ष' नावाच्या नटीच्या मुलीने कसे बाळसे धरले किंवा 'य'नटी किती महिन्याची प्रेग्नन्ट आहे याची सोशल मीडियावरील क्लिप्स/तत्सम बातम्यांवर भरभरून गप्पा मारतात.पण स्वतःच्या अर्भकाचे भरणे पोषण,आपल्या आजूबाजूला लहान मुले सारखी आजारी का पडतात, याचा कल्याणकारी राज्य लयाला जाण्याशी काही संबंध आहे हा विचार त्यांच्या मनाला शिवत देखील नाही.

हॉस्पिटलमध्ये असणारा कोणी सुपरस्टार लवकर बरा व्हावा म्हणून झुंडीने पहाटे ३ वाजता कोणत्या तरी देवळात चालत जायचा आचरटपणा करतील .पण घरातील कुटुंबियांच्या आजारपणात आपली आर्थिक ओढाताण होते त्याची मुळे सरकारी हॉस्पिटल्स बंद केल्यामुळे आपल्याला खाजगी हॉस्पिटल्समध्ये आपल्याला हजारो लाखो रुपये भरावे लागणे यामध्ये आहेत हे काही त्यांच्या लक्षात येत नाही.

ही फक्त काही उदाहरण. अनेक देता येतील.उदा नेत्याची larger than life प्रतिमा बनवून त्याचे भक्त तयार होणे..हे सर्व खूप खोलवर, पिढ्यानपिढया रुजवले गेले आहे.

उच्च/ब्राह्मण जातीत जन्मलेल्या व्यक्ती,जमीनदार, राजा,कंपनीचा मालक,राजकीय नेता हि दैवी माणसे आहेत आणि आपण जन्तू,किडा



मुंगी,क्षुद्र आहोत,म्हणजे जन्मापासूनच तसे आहोत.आपण तसेच मरणार आहोत. तेच आपले भागधेय आहे.हेच विचार पार त्यांच्या डीएनए मध्ये पिढ्यानपिढ्या ठोकून ठोकून बसवलेले असतात!

त्यामुळे आपल्या साऱ्या जीवनमरणाच्या भौतिक प्रश्नांची बिले ही लोक नशीब/मागच्या जन्मीचे पाप/ देवाने बनवलेल्या जाती/पाऊस/ निसर्ग/जागतिक युद्ध/डोनाल्ड ट्रम्प/कोरोना (सार्वजनिक आरोग्यसेवा नाही)/आपल्या देशाची लोकसंख्या/ भ्रष्टाचार हा बदचारीत्र्याच्या व्यक्तींमुळे होतो/सरकारकडे पैसेच नाहीत तर सरकार तरी काय करणार...यावर फाडतात.

आपल्या भौतिक प्रश्नांची मुळे विशिष्ट मानव निर्मित सिस्टीममध्ये आहेत, शासकीय ओमिशन वा कमिशन मुळे आपले प्रश्न काही पटींनी गंभीर बनतात असे विचार त्यांच्या मनाला शिवत नाहीत कारण मी आणि माझ्यासारखे असंख्य राजकीय शिक्षण,अर्थ साक्षरता आपल्या परीने करण्याचा प्रयत्न करतो.पण त्याला मर्यादा आहेत.

कोट्यावधी लोकांना आपण देखील माणूस आहोत. कोणत्याही सेलिब्रटीच्या एवढीच आपली स्वतःची स्वप्ने/ आपली स्वतःची लहान मुले सुंदर आहेत,ती स्वप्ने प्रत्यक्षात आणणे आपला घटनादत्त मूलभूत हक्क आहे, आपण एकेकटे कमी पडू.पण या प्रश्नात सामुदायिकपणे हस्तक्षेप करून आपल्याला हवी तशी धोरणे शासनाकडून आखून घेऊ शकतो ही जाणीव त्याच्यामध्ये तयार होणे त्यापेक्षा महत्वाचे आहे.

त्यासाठी लोकांच्या आत्मसम्माना च्या भावना चेतवणे, आजूबाजूची, दुसऱ्या राज्यातील/अगदी दुसऱ्या देशातील अनके उदाहरणे देत त्यांचा आत्मविश्वास जागवणे हे काम अर्थ साक्षरतेपेक्षा बेसिक आहे.ते काम कवी, कथा, आत्मचरित्रकार, कांदबरी, पोवाडे, रॅप सिंगर्स, फिल्म मेकर्स, एकांकिका/ नाटककार, युट्यूबरस, सोशल मीडियावरील लिखाण करणारे,वस्त्यांमधील स्त्रिया, तरुणांच्या नाक्यावरील, कटट्यावरील ओपिनियन मेकर्स करू शकतात.

वैचारिक काम महत्वाचे असतेच. पण ते सकस बियाण्यासारखे. त्या बिया रुजण्यासाठी जमीन नांगरणी, वेळ पडली तर बाहेरून माती आणून घालणे, पूर्वअट आहे.

**संजीव चांदोरकर**

# घंटा बांधेल कोण !

एकदा जंगलात काय झाले कुणास ठाऊक ! पण घटना तेवढीच महत्त्वाच्या होती !!घटना कशी कधी घडते हे कुणालाच सांगता येत नाही, म्हणून ती घटना असते. पण घटनेच्या मुळाशी काही कारण सुद्धा असते.जंगलातील घटनेची फारशी झळ कुणी घेत नाही. कारण जंगलात प्राण्यांचे राज्य असते.तिथे बळी तो कान पिळी हा साधा नियम सर्रास लागु पडतो.

पण असो! ही घटना जरा वेगळीच होती.घटनेमागचे सर्व धागे-दोरे शोधण्याची गरज असल्याशिवाय त्या घटनेच्या पंचनाम्याला अर्थ तरी काय असतो.त्यासाठी त्या घटनेच्या मुळात गेल्यावरच त्या घटनेतील मुख्य घटनेवर प्रकाश पडतो. सर्व तर्कसंगीत घटनेच्या तपासाच्या निमित्ताने जंगलात ज्याचीं निवड केल्या जाईल त्याने त्या घटनेच्या सर्व पुराव्याचे दस्तऐवज गोळा कुणाकडे करणार हा प्रश्न पहिल्यांदापुढे आला. कारण घटनेच्या पुराव्याला नष्ट करून ही घटना घडली नाही याची पूर्ण तयारी करून ती घटना घडवल्या गेली होती.

जंगलात हजारो घटना घडतात पण त्या घटनांची नोंद कुठेच केली जात नाही. कारण त्या घटना सर्व निसर्ग नियमाच्या अधीन घडत असतात.निसर्ग नियम हा संतुलन करणारा एकमेव नियम असल्याने इथे 'उणे अधिक' चे गणित फारसे काम करत नाही. प्रत्येकाचे अस्तित्व स्वतंत्र असल्यानंतर इथे भौतिकशास्त्राचे तर्क वितर्क संशोधनासाठी घेतले जात नाही.जैवविविधतेच्या कारणाने इथे रसायन शास्त्र कुठे हि शिंपडण्याची गरज निसर्गाला भासली नाही. त्यामुळे जीवशास्त्राचे वेगवेगळे नमुने सुरक्षित अंतर ठेवून 'जीव जिवस्य जीवनम' हे जीवन चक्र वलयांकित गतीने गतिमान आहेच. जल वायू परिवर्तन ह्या घडामोडी निसर्गातील सृजनतेच्या घटना आहे.त्या भूचर,जलचर व उभयचर या क्षेत्रातील जीवांच्या विविधतेच्या क्रियांवर क्रियमान आहे.

ही घटना तशी वेगळी यासाठी आहे की, ही घटना घडल्याने भूक, भय, निद्रा, मैथूनच्या पलीकडं विषय आणि त्यासाठीची पूर्तता करणारे प्रश्न निर्माण झाल्याने जंगलात आता या घटनेची दखल घेण्यात आली.आणि घटना काय आहे यावर जंगलात असणाऱ्या सर्व घटकांचा एकसंघ निर्णय व्हावा.कारण निसर्गाच्या नियमाच्या बाहेर गेल्याने घडणाऱ्या प्रत्येक घटनेच्या परिणामाच्या परिणामाला जबाबदार कोण? जंगलातील
प्राणी,पाणी,माती,वनस्पती,
ऊन,वारा,आभाळ यासर्व घटकांच्या आधारावर जंगलातील घडणाऱ्या सर्व घटनांचे पुरावे एकत्र आणून ह्या घटनेच्या मुळात जावं;म्हणून प्रत्येकाच्या जबानी व लेखी जवाबाची जवाबदारी सोपवण्याची तयारी सुद्धा व्हावी.अशी चर्चा जंगलात सुरू झाली. खरे तर घटनेला जबाबदार कोण यावर एक मत व्हावं म्हणून एक समिती निर्माण व्हावी आणि त्या समितीचे सदस्य हे सम विषम न ठेवता एकल समिती असावी म्हणजे फुटण्याची भीती ही राहणारच नाही.हा दूरदर्शीपणा जंगलात आधीच ठरलेला असतो हा नवा शोध आहे.

असो तर घटना नेमकी काय! हे स्पष्ट झाल्याशिवाय पुढील विषय सुटणार नाही म्हणून घटना कुठे, कुणासोबत कशी घडली यासाठी जंगलात मुख्य सूत्रधार कोण असेल? याकडे सर्वांचे लक्ष होते.उगाच लक्षवेधी घटनेकडे लोक उगाच बघत नाही.अशी सर्व व्यवस्था जंगलात आधीच कार्यरत आहे.त्यामुळे इथे विशेष काही नाही हे लक्षात घेतले पाहिजे.कारणं प्रत्येक विषयातील आकर्षण बिंदू आणि स्थिरावणारा आशय वाचक हेरत असतो, त्यामुळे लेखनाचे कसब त्याच्या तर्कसंगतीत वावरत राहते.म्हणून घटना काय आहे यापेक्षा ती कुणाशी संबंधित आहे यावर त्याचा कटाक्ष असतो.जंगलात घटणारी घटना ही झाडेवेली,फुलपाखरे, ऊंच हिमालय झुडुप,शिखरे, वन्य प्राणी व अन्यप्राणी यांच्या मधून असेल हा तर्क सर्वप्रथम विरून टाकला पाहिजे. कारण जंगल म्हटले की, ह्या सर्व घटकांचा नेत्रव्यापार आधीच समक्ष ठाण मांडतो.कारण प्रत्येकाची अपेक्षा ही परकीय असते.दुसऱ्यात असते.जबाबदार कुणी दुसरा किंवा तिराईत असेल असा भाव प्रथमक्षणी उद्भवत असतो.कारण आम्हाला 'मी नाही त्यातला कोंडा लावा आतला' ह्या म्हणी चा वापर स्वतः साठी पूर्ण सुविधेने करता येतो.त्यामुळे घटनेचा संबंध माझ्याशी मुळीच नसेल या मानसिक आधारातून मुक्त करणारी ही घटना आहे.

जंगल हा झाडांचा नाही तर वेड्यांचा आहे.जिथे गगनचुंबी इमारती आहे.जिथे वस्ती आपलेपनापेक्षा आपल्यापुरतीच मर्यादित असणाऱ्या उच्चशिक्षित समजणाऱ्या नागरिकांची आहे.इथे वेडे राहतात असे म्हणायला खूप वाव आहे. कारण या जंगलात प्रत्येकाचा 'इगो' निर्धारीत झाला आहे.त्यामुळे कुणी नेता,अभिनेता,अधिकारी,प्रतिनिधी,प
ादाधिकारी,आचार्य,प्राचार्य
सेवक,सैनिक म्हणून आपली ओळख आपल्या सदनाला लावून त्यात खुशाल राहतात.त्यामुळे ह्या जंगलात सर्वच राजे म्हणून म्हणून जगण्याचा आव आणतात,भाषा मात्र अभिव्यक्ती स्वातंत्र्याची करून आम्ही लोकशाहीचे पाईक आहोत अशा टिमक्या मिरवत हे आपले काम नाही.ही तर त्याची जबाबदारी. अशा बेजबाबदारपणाने वावरणाऱ्या जमातीच्या जंगलात रोज नवनव्या घटना घडतात.त्याला आम्ही वृत्तपत्रे, प्रसारमाध्यमांमध्ये आणि आता समाजमाध्यम म्हणून उदयाला आलेल्या भ्रमणध्वनीवर क्षणोक्षणी कुणी तरीं प्रत्यक्ष टिपलेल्या घटनेच्या चित्रीकरणाचे विश्लेषण करण्यात आमचे सौख्य समजतो.कारण घटना आमच्याशी मुळीच संबंधित नाही.असेल तर आम्ही मेणबत्तीने किंवा काळया फितीने त्याचा निषेध व्यक्त करून पुढील क्षणी जैसे थे.अशा भूमिका इमारतीच्या नवशहरात असो की पुराण नगरीत असो रोजच घडतात.

भविष्य धोक्यात आहे.कारण आमचा वर्तमान आमच्या हातात नाही.आमचा वर्तमान पंचवार्षिक योजनेत आम्ही बंदिस्त केला आहे.

आम्ही लोकशाहीचे नाव घेऊन संविधानाचे पारायण करून दर पाच वर्षासाठी आमचा हक्क दुसऱ्याच्या ताब्यात देऊन टाकतो.त्याला कोण कोण सहमत आहे याचा आढावा घेतला तर नव्याण्णव टक्के नागरिक जबाबदार ठरतात.कारण आमच्या मताने आम्ही कधीच वागत नाही.त्यामुळे आमच्या स्वातंत्र्यावर कायदे,नियम,अटी याचा अंकुश ठेवणारी यंत्रणा अजूनही आहे,ज्याला आम्ही राजकीय क्षेत्र म्हणून स्वीकारले आहे.ज्या क्षेत्राचा वापर आज शोषणासाठी आहे.आणि यात शोषण प्रत्येकाचे आहे. करणाऱ्याचे आणि शोषितांचे सुद्धा.कारण मोठा मासा लहान मासा खातो हा जंगली नियम इथे वापरल्या जातो. आणि मानव म्हणून उदयाला आलेला प्राणी पुन्हा त्याच प्राण्यांच्या वृत्तीत वावरतो. म्हणून रोज घटना घडतात.कारण मीमांसा होते.पण जबाबदार कुणीच नसतो.फक्त जबाबदारी येते ती दुर्बलावर.

मांजरीच्या गळ्यात घंटा बांधणार कोण? या प्रश्नाचे उत्तर प्रत्येकाला पडते.मात्र यावेळी विसरून जातो की हा प्रश्न आहे कुणाचा! तेव्हा आमच्या विचारात कधीच येत नाही, की हा प्रश्न उंदीरांचा आहे.आमचा नाही.कारण आम्ही मानव आहे.

उंदीर आणि मांजर हे आमच्याच ताब्यात आहे. तो ताबा दर वेळी आम्हाला मिळतो.त्याचा हक्क म्हणजे आमचे 'मत' आहे.आम्ही आमच्या मताने दरवेळी निवडून दिलेल्या प्रतिनिधीला कधीच प्रश्न करुन उत्तर मिळवण्याची हिंमत करत नाही म्हणून आमचे मत दुबळे केले आहे. आम्ही घंटा कोण बांधेल या मानसिकतेतून उच्चशहरी, निमशहरी,आणि विकसनशील शहरी म्हणून जगणारे उच्चभ्रू समजतो.त्यामुळे कुठल्याही घटनेशी,दुर्घटनेशी आमचा तिळमात्र संबंध नाही.अशा स्वरक्षित रचना गात फिरतो कुणी नाही रे कुणाचे,सारे दिल्या घेतल्याचे !

देशात दररोज शेतकरी आत्महत्येच्या घटना आता कानबाह्य झाल्या आहे.

तोच नव्याने घटना घडत आहे त्याच विद्यार्थ्यांच्या ज्या आपल्या आयुष्याला उच्चांक देण्यासाठी परीक्षाची तयारी करतात.मात्र पेपर फुटी सारखे प्रकरण सुद्धा घडतात.त्या कुणाच्या भारोश्यावर याचा विचार केला तर सर्व घटनांचा तपास करण्याची व त्यावर प्रतिबंध घालण्याची ताकद आम्हा नागरिकांवर नाही का?

ढग फुटीने शेती ठार,रस्ते गार,पेपरफुटीन विद्यार्थी ठार आणि लोकनेते फुटीने राजकारण विष्ठागार झाले.तरी आम्ही ढग फुटीला पर्यावरण,पेपरफुटीला प्रशासकीय धोरण आणि लोकनेते फुटीला राजकारण जबाबदार म्हणून घटनेच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न करणार की पुन्हा तोच प्रश्न?

घंटा बांधणार कोण !!...



**डॉ.प्रवीणकुमार राऊत**
भारतीय नागरिक
७७९८६४५५६५

# आ. साजिद पठाण यांच्या कामांचा 'हिशेब' मांडत भाजपवर पलटवार

■ प्रतिनिधी | अकोला ■

महापालिकेतील शहर सुधार आघाडीने नुकतेच सत्तेतील दीडशे दिवसांचा विकासाचा लेखाजोखा मांडत स्वतःची पाठ थोपटून घेतली असली, तरी त्या दाव्यांवर आता काँग्रेसने जोरदार प्रतिहल्ला चढविला आहे. विरोधी पक्षनेते डॉ. जिशान हुसेन यांनी पत्रकार परिषद घेऊन अकोला पश्चिमचे आमदार साजिद खान पठाण यांच्या विकासकामांचा तपशील सादर करत भाजपवर राजकीय टीकेची झोड उठवली. शहर सुधार आघाडीच्या विकासाच्या दाव्यांना 'पोकळ' ठरवत, 'ज्यांनी शहराच्या समस्यांकडे दुर्लक्ष केले, त्यांनी विकासाचे प्रमाणपत्र वाटण्यापूर्वी वास्तव पाहावे,' असा घणाघात केला. यावेळी नगरसेवक गुड्डू पठाण, सामाजिक कार्यकर्ते आर्किटेक्ट सोहेल खान उपस्थित होते.

डॉ. हुसेन म्हणाले की, आमदार साजिद पठाण यांनी पहिल्याच विधिमंडळ अधिवेशनात अकोल्याचे आराध्यदैवत राजराजेश्वर मंदिराला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळावा, हा प्रश्न प्रभावीपणे मांडला. त्यानंतर मंदिर विकासासाठी ५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. मात्र, आता या निधीत कपात करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. 'एका मुस्लिम आमदाराने मंदिरासाठी पाठपुरावा करून निधी मंजूर करून घेतल्यामुळे काही स्थानिक भाजप नेत्यांची राजकीय कोंडी झाली असून, त्यातूनच निधी कमी करण्याचे प्रयत्न होत आहेत,' असा गंभीर आरोपही त्यांनी केला. मोर्णा नदी विकास आराखडा, गणेश घाटाचे सुशोभीकरण, उर्दू घरासाठी १५ कोटी रुपयांचा निधी, अकोला विमानतळ विस्तारासाठी भूसंपादनाकरिता २०० कोटी रुपयांची मंजुरी, वैद्यकीय महाविद्यालय व लेडी हार्डिंग रुग्णालयातील रिक्त पदे भरण्यासाठी सातत्याने पाठपुरावा, तसेच कस्तुरबा गांधी रुग्णालय पुन्हा पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी शासनदरबारी सुरू असलेले प्रयत्न यांचा उल्लेख करत त्यांनी आमदार पठाण यांच्या विकासाभिमुख भूमिकेवर प्रकाश टाकला.

## – 'विकासाचे श्रेय घेणाऱ्यांनी आधी शहराची दुर्दशा पाहावी'
## – विरोधी पक्षनेते डॉ. जिशान हुसेन यांचा घणाघात



याशिवाय केंद्र सरकारच्या भूमिगत गटार योजनेमुळे खराब झालेल्या शहरातील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी तब्बल ७३५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. शहरातील नागरिकांची महसुली कामे वेळेत व्हावीत, यासाठी नवीन अप्पर तहसीलदार पद मंजूर करून कार्यालयालाही मंजुरी मिळवून दिल्याचा दावा त्यांनी केला. डॉ. हुसेन यांनी सांगितले की, आमदार निधीतून आतापर्यंत सुमारे १० कोटी रुपयांची विकासकामे करण्यात आली असून, त्यामध्ये कोणताही राजकीय भेदभाव करण्यात आलेला नाही. महापौरांच्या प्रभागालाही सुमारे ८० लाख रुपयांचा निधी देण्यात आला. जिल्हा नियोजन समिती, दलित वस्ती सुधारणा आणि नागरोत्थान योजनेतील निधी वाटपातही सर्व नगरसेवकांना समान वागणूक देण्यात आली, असा दावा त्यांनी केला.

### 'शहर सुधार आघाडी नव्हे, शहर बिघाड आघाडी'

पत्रकार परिषदेत डॉ. हुसेन यांनी शहर सुधार आघाडीवरही जोरदार निशाणा साधला. 'शहर सुधारण्याचे आश्वासन देणाऱ्यांनी प्रत्यक्षात शहराची दुरवस्था केली आहे. पहिल्याच पावसात नियोजनाचा फज्जा उडाला. रस्ते, नाले आणि नागरी सुविधा यांचा बोजवारा उडाल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे,' अशी टीका त्यांनी केली. त्यांनी आरोप केला की, महापालिकेत विरोधी पक्षांकडून विधायक सूचना मांडल्या जात असतानाही त्या दडपण्याचा प्रयत्न होत आहे. विरोधी नगरसेवकांवर निलंबनाची कारवाई करणे आणि लोकशाही प्रक्रियेला बाधा आणण्याचे प्रकार वाढले असल्याचा आरोप त्यांनी केला.

महापालिकेने मालमत्ता करात कचरा संकलनाच्या नावाखाली करण्यात आलेल्या सुमारे ६०० रुपयांच्या वाढीवरही त्यांनी तीव्र आक्षेप घेतला. 'ही करवाढ नागरिकांच्या खिशावर डल्ला मारणारी असून कंत्राटदारांचे हित जपण्यासाठीच निर्णय घेतले जात आहेत. यापूर्वीही अवाजवी करवाढीविरोधात सर्वोच्च न्यायालयापर्यंत लढा दिला होता. आता शहराच्या हिताविरोधातील निर्णयांची कागदपत्रे गोळा करून नागपूर खंडपीठात याचिका दाखल करणार आहोत,' असा इशारा त्यांनी दिला. यापुढील काळात शहरवासीयांवर अन्याय करणाऱ्या प्रत्येक निर्णयाविरोधात रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. पत्रकार परिषदेत काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# शासकीय जागेवरील अतिक्रमण सरपंचांना भोवले!
## महागावच्या सरपंच प्रमिलाबाई ढोरे अपात्र

■ प्रतिनिधी | अकोला ■

शासकीय जमिनीवरील अतिक्रमणाचा मुद्दा आता केवळ महसूल विभागापुरता मर्यादित राहिलेला नसून, तो लोकप्रतिनिधींच्या पात्रतेवरही परिणाम करू शकतो, याची प्रचिती बार्शीटाकळी तालुक्यातील महागाव ग्रामपंचायतीच्या प्रकरणातून आली आहे. शासकीय जागेवर अतिक्रमण करून बांधकाम केल्याचे सिद्ध झाल्यानंतर महागाव ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. प्रमिलाबाई शेवराव ढोरे यांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम १४(१)(ज-३) अंतर्गत पदासाठी अपात्र ठरविण्याचा महत्त्वपूर्ण आदेश अकोला जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आहे.

या निर्णयामुळे ग्रामपंचायत स्तरावरील लोकप्रतिनिधींच्या जबाबदाऱ्या, कायदेशीर बंधने आणि शासकीय मालमत्तेबाबतचे नियम पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत.

या प्रकरणाची सुरुवात महागाव येथील पुंडलिक भास्करराव ढोरे यांनी दाखल केलेल्या अपात्रता अर्जातून झाली. अर्जात सरपंचांनी शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून बांधकाम केल्याचा आरोप करण्यात आला होता. त्यानंतर जिल्हाधिकारी न्यायालयाने संबंधित प्रकरणाची सुनावणी घेत दोन्ही बाजूंचे म्हणणे, ग्रामपंचायतीकडून सादर करण्यात आलेले अहवाल, महसुली नोंदी तसेच उपलब्ध कागदपत्रांचा सखोल अभ्यास केला.

### जिल्हाधिकाऱ्यांचा महत्त्वपूर्ण आदेश, ग्रामपंचायत प्रतिनिधींना कायद्याचा स्पष्ट इशारा

सुनावणीनंतर संबंधित बांधकाम शासकीय जागेवर असल्याचे निष्पन्न झाल्याचे आदेशात नमूद करण्यात आले असून, त्याआधारे सरपंचांना अपात्र घोषित करण्यात आले. या प्रकरणात अर्जदारांच्या वतीने ॲड. विनीत शिरसाट यांनी प्रभावी युक्तिवाद केला. त्यांनी सादर केलेले दस्तऐवजी पुरावे, कायदेशीर तरतुदी आणि न्यायालयीन मुद्दे विचारात घेऊन जिल्हाधिकारी न्यायालयाने अपात्रतेचा अर्ज मंजूर केला. कायदेतज्ज्ञांच्या मते, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील कलम १४(१)(ज-३) ही तरतूद लोकप्रतिनिधींनी शासकीय जमिनीवर अतिक्रमण करू नये किंवा अशा प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यात सहभागी होऊ नये, यासाठी करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित प्रकरणात सक्षम प्राधिकरणाने नोंदी आणि पुराव्यांच्या आधारे दिलेला आदेश ग्रामपंचायत प्रशासनाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे.

या आदेशामुळे जिल्ह्यातील ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांमध्येही मोठी चर्चा सुरू झाली असून, शासकीय मालमत्तेशी संबंधित प्रकरणांकडे दुर्लक्ष केल्यास त्याचे गंभीर कायदेशीर परिणाम होऊ शकतात, असा स्पष्ट संदेश या निर्णयातून गेल्याची प्रतिक्रिया विविध स्तरांतून व्यक्त होत आहे. दरम्यान, या आदेशाविरोधात संबंधितांना कायद्यानुसार सक्षम प्राधिकरणाकडे अपील करण्याचा अधिकार उपलब्ध असल्याने पुढील न्यायालयीन प्रक्रिया काय वळण घेते, याकडेही स्थानिक स्वराज्य संस्थांतील पदाधिकारी आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना

■ प्रतिनिधी | अकोला ■

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेत प्रोत्साहनपर लाभाची तरतूद केल्यामुळे नियमित परतफेड करणाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. राज्य शासनाने सर्वात मोठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६ जाहीर करुन शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

२०१७ मध्ये दीड लाख रुपयांपर्यंत, तर २०१९ मध्ये दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात आली होती. यावेळीही दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती देण्यात येत आहे. अल्पमुदतीची थकीत पीककर्जे, तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित कर्जाचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे.

# सैनिक हत्येप्रकरणातील आरोपीचा जामीन रद्द
## न्यायालयाचे पुन्हा अटक करण्याचे आदेश

■ प्रतिनिधी | अकोला ■

जुने शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अकोली बु. मार्गावर २४ मार्च २०२६ रोजी सुट्टीवर घरी आलेल्या भारतीय सैन्यातील जवान सुशील दिलीप तेलगोटे यांच्या निर्घृण हत्येप्रकरणी महत्त्वपूर्ण न्यायालयीन घडामोड समोर आली आहे. या प्रकरणातील आरोपी अंकित उर्फ छोटू विठ्ठल खंडारे याला यापूर्वी मंजूर करण्यात आलेला जामीन न्यायालयाने रद्द करत जिल्हा पोलीस प्रशासनाला त्याला तात्काळ अटक करण्याचे आदेश दिले आहेत.

या प्रकरणात मृत सैनिकाच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून जुने शहर पोलिसांनी तपास करून यशवंतसिंह उर्फ गोल्या गणेश ठाकूर, जय विनोद मुरेकर, निलेश उर्फ बाला धुमाजी सोलापूरे आणि अंकित उर्फ छोटू विठ्ठल खंडारे यांना अटक केली होती. त्यानंतर न्यायालयाच्या आदेशानुसार सर्व आरोपींना न्यायालयीन कोठडीत पाठविण्यात आले होते.

न्यायालयीन कोठडीत असताना आरोपी अंकित खंडारे याने जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. या अर्जावरील सुनावणीनंतर तृतीय अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश तेजवंतसिंह संधू यांनी त्याला जामीन मंजूर केला होता. जामिनावर सुटल्यानंतर आरोपी आपल्याला सातत्याने धमकावत असून जीवे मारण्याची धमकी देत असल्याचा आरोप मृत सैनिकाच्या वडिलांनी केला. यासंदर्भात त्यांनी जुने शहर पोलीस, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे लेखी निवेदन देऊन आरोपीचा जामीन रद्द करण्याची मागणी केली होती.

मात्र संबंधित यंत्रणेकडून कोणतीही कार्यवाही न झाल्याने मृत सैनिकाच्या वडिलांनी ॲड. नजीब शेख यांच्या माध्यमातून बीएनएस कलम ३८३(३) अंतर्गत न्यायालयात जामीन रद्द करण्यासाठी अर्ज दाखल केला. न्यायालयाने संबंधितांना नोटीस बजावून उत्तर सादर करण्याचे आदेश दिले. सुनावणीदरम्यान शहर उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या वतीने आरोपीचा जामीन रद्द करण्याची भूमिका मांडण्यात आली. तसेच ॲड. नजीब शेख यांनीही सविस्तर युक्तिवाद केला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर तृतीय अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश तेजवंतसिंह संधू यांनी आरोपी अंकित विठ्ठल खंडारे याचा जामीन रद्द करत त्याला पुन्हा अटक करण्याचे आदेश जिल्हा पोलीस प्रशासनाला दिले. न्यायालयाच्या या निर्णयाचे मृत सैनिकाच्या वडिलांनी महार रेजिमेंटमधील जवानांनी स्वागत करून समाधान व्यक्त केले. विशेष सूत्रांच्या माहितीनुसार, अकोला जिल्ह्यात हत्या प्रकरणातील आरोपीला जामीन मंजूर केल्यानंतर त्याच न्यायालयाने परिस्थितीचा विचार करून तो जामीन रद्द करण्याचा आदेश दिल्याची ही बहुधा पहिलीच घटना मानली जात आहे. या प्रकरणात ॲड. नजीब शेख यांना ॲड. सोहराब आणि शिबा मलिक यांचेही सहकार्य लाभले.

# शासकीय मूकबधीर विद्यालयात प्रवेश सुरू

**अकोला :** येथील मलकापूर परिसरातील शासकीय मूकबधीर विद्यालयात प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. संस्थेत इयत्ता पहिली ते सातवीदरम्यान मुलांना प्रवेश मिळेल. वयोमर्यादा ६ ते १६ वर्षे. विद्यार्थी कर्णबधीर असावा. जिल्हा शल्यचिकित्सकाचे ४० टक्क्यांहून अधिक दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र असावे. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा. संस्थेत प्रवेश विनामूल्य असून, निवास, भोजन, अंथरूण-पांघरूण, शालेय साहित्य व इतर आवश्यक सुविधा विनामूल्य मिळतील.

# नगराच्या साचेबद्ध विकासासाठी नगर रचना विभाग
## कन्सल्टिंग सिविल इंजिनिअर असो. चा डीपी ज्ञान संवाद कार्यक्रम

■ प्रतिनिधी | अकोला ■

सिविल इंजिनिअर वर्ग हा नागरी नियोजनाचा कणा आहे.नगर रचना व सिव्हिल इंजिनिअर्सच्या सामूहिक प्रयत्नाने नगरचा साचेबद्ध विकास शक्य असल्याचा सूर कन्सल्टिंग सिविल इंजिनिअर असो.च्या ज्ञान संवाद कार्यक्रमात व्यक्त करण्यात आला. स्थानीय वेलकम सभागृहात असो. ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअरिंगच्या वतीने शहर विकास आराखडा संदर्भात ज्ञान संवाद कार्यक्रम संपन्न झाला. असो.चे अध्यक्ष इंजि अभिजित परांजपे यांच्या अध्यक्षतेत संपन्न या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून नगर रचना विभागाचे एडीपीपी आकि. 'सादिक अली,मनपाच्या नगररचना विभागाचे एडीपीपी इंजि. राजय साबळे,तज्ञ अभियंता राहुल कासट समवेत एसीसीचे सचिव इंजि श्याम ठाकूर,कोषाध्यक्ष इंजि संजय भगत,जीसी सदस्य इंजि अनुराग अग्रवाल आदी उपस्थित होते. मान्यवरांच्या स्वागताने या संवाद कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. सर्वप्रथम तज्ञ अभियंते राहुल कासट यांनी विकास आराखडा का आवश्यक आहे.



यावर ऊहापोह केला.त्यांनी विकास आराखडा तयार करताना कोणते घटक विचारात घेतले जातात, तो तयार करताना लोकसंख्या वाढ, भूवापर, पायाभूत सुविधा, रस्ते-जाळे, सार्वजनिक सुविधा, पर्यावरण, भविष्यातील विस्तार, आणि नियमावली यांचा विचार कसा केला जातो यावर सांगोपांग माहिती दिली.या नंतर मनपाचे एडीपीपी इंजि. राजय साबळे यांनी नगराचा विकास आराखडा कसा वाचावा यावर प्रकाश टाकला. त्यांनी आपल्या सत्रात 'विकास आराखडा वाचन, त्यातील झोनच्या जमिनी,त्यावरील आरक्षण, विकास मर्यादा, आणि मंजुरीसाठी आवश्यक नकाशा-तपशील समजून घेण्याची पद्धत आदींवर तांत्रिक विश्लेषण केले.समारोपीय सत्रात नगर रचना विभागाचे एडीपीपी आकि.सादिक अली यांनी 'विकास आराखड्याशी सुसंगत लेआउट नियोजन कसे करावे या विषयावर तांत्रिक माहिती दिली.यात साईट लेआऊट,वापर विभागणी,सीटबॅक,एक्सेस,खुला भूखंड, पार्किंग, युटिलिटी नियोजन,एडजोयनिंग झोन आदींची माहिती देत उपस्थित अभियंत्यांशी संवाद साधला. अध्यक्षीय मनोगत इंजि अभिजीत परांजपे यांनी करून या संवाद कार्यक्रमाची माहिती दिली. संचालन इंजि इस्माईल नजमी यांनी तर आभार इंजि श्याम ठाकुर यांनी मानलेत. यावेळी असो.चे पंकज कोठारी, नरेश अग्रवाल, मयूर सिंघानिया,रिजवान कुरेशी, शेखर मुखेडकर ,कपिल ठक्कर ,निखिल टावरी,नरेंद्र पाटील, अनिश शहा, बबलू गुप्ता, पंकज भटकर, प्रदीप अग्रवाल,मनिष राऊत, अजय फायदे,मार्कंड पांडे, महेंद्र दवे समवेतबहुसंख्य अभियंते उपस्थित होते.

# प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२६
## नामांकन अर्ज सादर करण्याचे आवाहन

**अकोला :** केंद्र सरकारच्या महिला व बालविकास मंत्रालयामार्फत 'प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२६' साठी नामांकन अर्ज मागविण्यात आले आहेत. देशातील विविध क्षेत्रात असामान्य कामगिरी करून समाजासाठी प्रेरणादायी ठरलेल्या बालकांचा गौरव करण्यासाठी हा प्रतिष्ठेचा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

# उघड्यावर कचरा टाकणाऱ्या दुकानदारांवर पालिकेची कारवाई
## अकोट नगरपरिषदेचा स्वच्छतेवर भर; सातत्याने नियमभंग करणाऱ्यांना दंड

■ प्रतिनिधी | अकोट ■

शहरातील सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर कचरा टाकून अस्वच्छता निर्माण करणाऱ्या दुकानदार व व्यावसायिकांविरोधात अकोट नगरपरिषद प्रशासनाने दंडात्मक कारवाई सुरू केली आहे. वारंवार सूचना व नोटिसा देऊनही नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली असून, भविष्यातही अशी मोहीम सुरू राहणार असल्याचे नगरपरिषदेने स्पष्ट केले आहे.

नगरपरिषदेच्या आरोग्य व स्वच्छता विभागाकडे शहरातील विविध भागांमध्ये उघड्यावर कचरा टाकला जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. पावसाळ्यात अशा कचऱ्यामुळे दुर्गंधी निर्माण होऊन नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन मुख्याधिकारी शशिकांत बाबर यांच्या निर्देशानुसार विशेष



तपासणी मोहीम राबविण्यात आली. पाणीपुरवठा अधिकारी प्राजक्ता पांडे व आरोग्य निरीक्षक अक्षय फडतडे यांच्या नेतृत्वाखाली शहरातील विविध भागांची पाहणी करण्यात आली. यावेळी सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्या नागरिक व व्यावसायिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

नगरपरिषद प्रशासनाने यापूर्वी संबंधितांना लेखी तसेच तोंडी सूचना देत कचरा नगरपरिषदेच्या कचरा संकलन वाहनातच टाकण्याचे आवाहन केले होते. मात्र, त्याकडे दुर्लक्ष झाल्याने कारवाई करण्यात आल्याचे प्रशासनाने सांगितले.

३ जुलै २०२६ रोजी पाच आस्थापनांवर, तर ७ जुलै रोजी आठवडी बाजारातील मटन मार्केट परिसरातील सात दुकानदारांवर सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकल्याप्रकरणी दंड आकारण्यात आला. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी नियमभंग करणाऱ्यांविरोधात यापुढेही कारवाई सुरूच राहणार असल्याचे नगरपरिषद प्रशासनाने स्पष्ट केले आहे.पावसाळ्यात उघड्यावर कचरा टाकल्यास संसर्गजन्य आजारांचा धोका वाढू शकतो. त्यामुळे नागरिक आणि व्यावसायिकांनी कचरा केवळ नगरपरिषदेच्या कचरा संकलन वाहनातच द्यावा. अन्यथा संबंधितांवर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे आवाहन अकोट नगरपरिषद प्रशासनाने केले आहे.

# मतदार नोंदणीच्या कामात कसूर खपवून घेणार नाही

**अकोला :** भारत निवडणूक आयोगाच्या वतीने सध्या विशेष मतदार नोंदणीचा अत्यंत महत्त्वाचा कार्यक्रम राबविला जात आहे. हे काम विहीत कालमर्यादेत पूर्ण करण्याचे आहेत. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता परस्पर रजेवर गेल्यास कडक कारवाई करणार असल्याचा इशारा जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिला आहे.

## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ८५०/२०२६ — प्रोसेस नं.७४८७/२०२६
चौ.ता. २७/०७/२०२६ — दिनांक : ११/०६/२०२६

**अर्जदार :** १. प्रफुल सोमचंद लोडाया २. धर्मेंद्र सोमचंद लोडाया ३. अनिल सोमचंद लोडाया २ ते ४ रा. ई-२९, व्ही. एच. बी. कॉलनी, गौरक्षण रोड, अकोला. ता. जि. अकोला. ४. हेमलता जयंतीलाल धुल्ला-मयत तर्फे वारस ४अ. योगेश जयंतीलाल धुल्ला ४ब. उमेश जयंतीलाल धुल्ला रा. डोंबिवली, मुंबई. ५. प्रतिक्षा दिलीप डाघा रा. डोंबिवली, मुंबई. ६. राजेंद्र सोमचंद लोडाया रा. जेतपूर, गुजरात.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. सोमचंद कानजी लोडाया २. सोनबाई सोमचंद लोडाया
**पत्ता :-** रा. व्ही. एच. बी. कॉलनी, गौरक्षण रोड, अकोला. ता. जि. अकोला. मो. नं. ९९६०९८९३०९

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सोमचंद कानजी लोडाया यांचे दि. २५/०२/२००५ रोजी व तसेच मयत सोनबाई सोमचंद लोडाया यांचे दि. १५/०८/२०११ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ११/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर सूचना

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे सपना भैय्या वाकोडे यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाने,

मिळकतीचे वर्णन: मौजे - पोटा, मालमत्ता क्रं. ३५ याचे एकूण क्षेत्रफळ ७५० चौ. फुट. वार्ड क्रं. १, ता. मुर्तीजापूर आणि जिल्हा. अकोला.

सदर मिळकत माझे पक्षकार नामे सपना भैय्या वाकोडे यांना वारसाने - वडिलोपार्जित मिळालेली आहे. तसेच वरील नमूद मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय इतर भानगड, कोणाचा मालकी अथवा वारस हक्क, इतर बँक गहाण-बोजा नोंद कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्रं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या ७ दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही. आणि सदर मालमत्ता Piramal Finance ltd. येथे कर्जासाठी केलेल्या अर्जानुसार गहाण करण्यात येईल करिता हि जाहीर सूचना देत आहे.

ठिकाण- तालुका मुर्तीजापूर जिल्हा अकोला.
दि. ०७/०७/२०२६

**आपला**
**ॲड. रवींद्र रु. वाटाणे**
स्नेहगंधा कॉलनी, अमरावती,
मो. नं. ९८२३६९८७४५

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९९३/२०२६ — प्रोसेस नं. ८२८५/२०२६
चौ.ता. १२/०८/२०२६ — दिनांक : ०२/०७/२०२६

**अर्जदार :** १. स्वप्नील वासुदेव ढोरे २. जयश्री वासुदेव ढोरे ३. कृतिका वासुदेव ढोरे सर्व रा. जवाहर नगर, विश्वास सुपर शॉपीजवळ, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : वासुदेव नामदेव ढोरे
**पत्ता :-** रा. जवाहर नगर, विश्वास सुपर शॉपीजवळ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत वासुदेव नामदेव ढोरे यांचे दि. ११/०४/२०२० रोजी अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १२/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ८६९/२०२६ — प्रोसेस नं.७६५४/२०२६
चौ.ता. २८/०७/२०२६ — दिनांक : १७/०६/२०२६

**अर्जदार :** १. सचिन साहेबराव कोहरे २. नागोराव साहेबराव कोहरे ३. विनायक साहेबराव कोहरे सर्व रा. मोहता मिल चाळ, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत :१. साहेबराव मोतीराम कोहरे २. रत्नमाला साहेबराव कोहरे
**पत्ता :-** रा. दोन्ही रा. मोहता मिल चाळ, अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत साहेबराव मोतीराम कोहरे यांचे दि. ०६/१०/२०२५ रोजी व तसेच मयत रत्नमाला साहेबराव कोहरे यांचे दि. २८/११ / २०१८ रोजी मोहता मिल चाळ, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २१०**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# राम मंदिरातील कथित गैरव्यवहारावर घंटानाद आंदोलन

## प्रतीकात्मक देणगीतून गरजू विद्यार्थ्यांना शालेय बॅग; निष्पक्ष चौकशीची मागणी



**आष्टी शहीद/जनमाध्यम**
अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी मंदिराशी संबंधित कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर आष्टी येथे घंटानाद आंदोलन करण्यात आले. आंदोलनानंतर नागरिकांकडून संकलित करण्यात आलेली प्रतीकात्मक देणगी गरजू विद्यार्थ्यांना शालेय बॅग वाटपासाठी देण्याचा निर्णय घेत सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला.

खा.अमर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या आंदोलनाची सुरुवात श्रीराम मंदिरात सामूहिक प्रार्थना व घंटानादाने झाली. उपस्थितांनी प्रभू श्रीरामांच्या चरणी प्रार्थना करत श्रद्धेचे पावित्र्य अबाधित राखण्याचा निर्धार व्यक्त केला. त्यानंतर नागरिक, व्यापारी, युवक व सामाजिक कार्यकर्त्यांनी शहरात फिरून प्रतीकात्मक स्वरूपात देणगी संकलित केली.

आंदोलनकर्त्यांनी तहसील कार्यालयात जाऊन राष्ट्रपती आणि पंतप्रधान यांच्या नावे निवेदन सादर केले. अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी मंदिराशी संबंधित कथित गैरव्यवहाराची स्वतंत्र, निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, तसेच आरोपांमध्ये तथ्य आढळल्यास संबंधित दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी,अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

संकलित करण्यात आलेली प्रतीकात्मक देणगी तहसील प्रशासनाकडे सुपूर्द करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, प्रशासकीय नियमांमुळे ती स्वीकारणे शक्य नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. त्यानंतर आंदोलनकर्त्यांनी जमा झालेली संपूर्ण रक्कम गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शालेय बॅग वाटपासाठी देण्याचा निर्णय घेतला.

राष्ट्रवादी युवक काँग्रेस (शरदचंद्र पवार) महाराष्ट्र प्रदेश सचिव शुभम उद्धवराव नागपुरे म्हणाले,'हे आंदोलन कोणत्याही धर्माच्या किंवा श्रीराम मंदिराच्या विरोधात नाही. प्रभू श्रीराम हे सत्य, न्याय आणि आदर्शाचे प्रतीक आहेत.

त्यामुळे मंदिराशी संबंधित कथित गैरव्यवहाराच्या आरोपांची निष्पक्ष चौकशी होणे ही श्रद्धावानांची अपेक्षा आहे. प्रशासनाने देणगी स्वीकारण्यास असमर्थता दर्शविल्यानंतर ती रक्कम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक मदतीसाठी वापरण्याचा निर्णय घेण्यात आला.'

या आंदोलनात आष्टी तालुक्यातील नागरिक, युवक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले. संपूर्ण आंदोलन शांततेत पार पडले. श्रद्धेचा संदेश समाजसेवेशी जोडत रामभक्तीचा खरा अर्थ समाजहितात असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित करण्यात आले.

# केळी उत्पादक शेतकऱ्यांसाठी केळी परिषद व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**वर्धा/जनमाध्यम**
कृषी विभाग व जिल्हाधिकारी यांच्या संयुक्त विद्यमानाने जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांसाठी २२ जुलै रोजी केळी मूल्यसाखळी विकास व केळी उत्पादक शेतकरी यांची केळी परिषद व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृह क्रमांक एक येथे आयोजित केळी परिषद व प्रशिक्षण कार्यक्रमात केळी लागवडीपासून ते विपणनापर्यंतच्या संपूर्ण मूल्यसाखळीवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. कार्यक्रमामध्ये नागपूर येथील फलोत्पादन विभागाचे प्रमुख डॉ. विनोद राऊत हे केळी लागवड तंत्रज्ञान या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

तसेच पणन मंडळ नागपूरचे उपसरव्यवस्थापक राजेश सरोदे हे बाजार जोडणी व सुविधांसह वाहतूक योजना या विषयावर माहिती देणार आहेत.

याशिवाय जळगाव, अंजनगाव व वर्धा बाजारपेठांमधील केळीच्या दरातील फरक या विषयावर सचिन पावडे मार्गदर्शन करणार आहे.

वर्धा जिल्हा केळी उत्पादक संघाच्या प्रमुख सहभागातून मुक्त चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे.

या चर्चासत्राद्वारे विविध बाजार समित्यांतील केळीच्या दरातील तफावत, बाजारपेठेतील संधी, शेतकऱ्यांसमोरील अडचणी तसेच त्यावरील उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे.

या परिषदेमुळे केळी उत्पादक शेतकऱ्यांना आधुनिक उत्पादन तंत्रज्ञान, काढणीनंतरची हाताळणी, बाजारपेठेची उपलब्धता, वाहतूक सुविधा, मूल्यवर्धन तसेच अधिक लाभदायी विपणन व्यवस्थेबाबत माहिती मिळणार असून उत्पन्नवाढीस चालना मिळण्यास मदत होणार आहे.

जिल्ह्यातील सर्व केळी उत्पादक शेतकरी, शेतकरी गट, एफपीओ यांनी २२ जुलै रोजी आयोजित या परिषदेस मोठ्या संख्येने उपस्थित राहून तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

## संक्षिप्त

### प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी अर्ज आमंत्रित

**वर्धा**-शौर्य, समाजसेवा, पर्यावरण, क्रीडा, कला व संस्कृती आणि विज्ञान, तंत्रज्ञान अशा क्षेत्रात नैपुण्यपूर्ण कामगिरी केलेल्या ५ वर्षावरील व १८ वर्षापर्यंतच्या मुलांना केंद्र शासनाच्या महिला व बालविकास विभागामार्फत प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार दिला जातो. या पुरस्कारासाठी ऑनलाईन अर्ज३१ जुलैपर्यंत अर्ज स्विकारण्यात येणार आहे. मुलाचे वय ५ वर्षापेक्षा अधिक व ३१ जुलै २०२६ रोजी १८ वर्षापेक्षा कमी असणे आवश्यक आहे. शौर्य, समाजसेवा, पर्यावरण, क्रीडा, कला व संस्कृती आणि विज्ञान, तंत्रज्ञान अशा क्षेत्रात नैपुण्यपूर्ण कामगिरी केलेल्या मुलांना www.awards.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावयाचा आहे. पुरस्काराबाबतची सविस्तर माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असून पुरस्कारासाठी प्रस्ताव स्वतः मुले किंवा त्यांच्यावतीने राज्य सरकार, जिल्हाधिकारी, पंचायत राज संस्था, नागरी स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्था आदी अर्ज कर शकतात, असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी कळविले आहे.

### इलेक्ट्रिक करंटचा धक्का जीवावर

**हिंगणघाट** - कामावर असताना इलेक्ट्रिक बोर्डाचा करंट लागल्याने एका मजुराचा मृत्यू झाल्याची घटना छोटी वणी येथील शिवाय मिल परिसरात घडली. मनू शंकर तिवारी (वय ३६, मूळ रा. भरोली, जि. सिवान, बिहार, ह.मु. छोटी वणी) असे मृताचे नाव आहे. मनू तिवारी कंपनीत नियमित कामगार म्हणून कार्यरत होता. काम सुरू असताना अचानक त्याला विद्युत प्रवाहाचा जोरदार धक्का बसला आणि तो जागीच कोसळला. सहकाऱ्यांनी तत्काळ त्याला उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले. या घटनेमुळे सहकाऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. याप्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली असून घटनेचा अधिक तपास सुरू आहे.

### धावत्या रेल्वेतून पडून प्रवाशाचा मृत्यू

**वर्धा** - धावत्या रेल्वेगाडीतून पडल्याने एका ४० वर्षीय व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना कवठा (रेल्वे) ते दहेगाव रेल्वे स्थानकादरम्यान मलकापूर शिवारात उघडकीस आली. राकेश वासुदेव भोकरे (रा. झाडगाव गोसावी, ह.मु. वर्धा) असे मृताचे नाव आहे. रेल्वे रुळाजवळ त्यांचा मृतदेह आढळून आल्यानंतर परिसरात खळबळ उडाली.
घटनेची माहिती रेल्वे स्टेशन प्रबंधकांनी पोलिसांना दिली. त्यानंतर पुलगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. प्राथमिक माहितीनुसार धावत्या रेल्वेतून पडल्याने हा अपघात झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली असून मृत्यूचे नेमके कारण शोधण्यासाठी पुढील तपास सुरू आहे.

# कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेंतर्गत शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण

**वर्धा/जनमाध्यम**
भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेंतर्गत देशभरात विशेष अंमलबजावणी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या पार्श्वभूमीवर बुधवार १४ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.

कृषी पायाभूत सुविधा निधी योजना आत्मनिर्भर भारत अभियान अंतर्गत सुरू करण्यात आली आहे. शेतमालाच्या काढणीनंतरच्या पायाभूत सुविधा तसेच सामुदायिक शेतीसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्यासाठी या योजनेद्वारे सवलतीच्या दरात कर्ज उपलब्ध करून दिले जाते.

त्यामुळे शेतमालाची साठवणूक, प्रक्रिया, मूल्यवर्धन, वाहतूक आणि विपणन अधिक सक्षम होऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीस चालना मिळत आहे.

योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना बँकांकडून मंजूर होणाऱ्या रुपये २ कोटीपर्यंतच्या कर्जावर ३ टक्के व्याज सवलत तसेच क्रेडिट गॅरंटीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. गोदामे, शीतगृहे, पॅक हाऊस, ग्रेडिंग व सॉर्टिंग युनिट, प्राथमिक प्रक्रिया केंद्रे, कृषी लॉजिस्टिक्स, सायलो, रिपनिंग चेंबर, ई-मार्केट सुविधा, जैव-इनपुट उत्पादन युनिट, कृषी औजारे बँक यांसह विविध कृषी पायाभूत सुविधा प्रकल्पांना या योजनेचा लाभ मिळतो.

या विशेष मोहिमेदरम्यान जिल्ह्यात जनजागृती, शेतकरी मेळावे, कार्यशाळा, बँक समन्वय तसेच लाभार्थी मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. पात्र शेतकरी, संस्थांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी तालुका कृषी अधिकारी, आत्मा, कृषि विभाग अथवा जवळच्या राष्ट्रीयकृत, अनुसूचित बँकेशी संपर्क साधावा.

पात्र शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था, कृषि उद्योजक व इतर लाभार्थींनी या योजनेचा लाभ घेऊन कृषि पायाभूत सुविधा उभारण्यासाठी पुढाकार घ्यावा. योजनेचा लाभ घेण्यासाठी https://agriinfra.dac.gov.in या संकेतस्थळावर अथवा अधिक माहितीसाठी दि.१४ जुलै रोजी आयोजित कार्यशाळेस उपस्थित राहून योजनांची माहिती घ्यावी, असे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी कळविले आहे.

# व्हॉट्सॲपवरील आक्षेपार्ह पोस्ट अंगलट, तक्रारीनंतर गुन्हा दाखल

**सिंदी रेल्वे/जनमाध्यम**
सोशल मिडियावर एका थोर व्यक्तीबाबत आक्षेपार्ह मजकूर प्रसारित करणे एका व्यक्तीला चांगलेच महागात पडले. व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये आक्षेपार्ह वक्तव्ये प्रसारित केल्याप्रकरणी स्थानिक रहिवासी सुधाकर विठोबाजी वाघमारे यांच्याविरुद्ध सिंदी रेल्वे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमोल सुरेशराव सोनटक्के यांनी दिलेल्या लेखी तक्रारीनुसार, संबंधित व्हॉट्सॲप संदेशामुळे समाजात तेढ निर्माण होण्याची तसेच सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था बिघडण्याची शक्यता असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तक्रारीची दखल घेत पोलिसांनी उपलब्ध पुरावे तपासले. चौकशीनंतर सुधाकर वाघमारे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) अंतर्गत संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सिंदी रेल्वे पोलिस करीत आहेत. दरम्यान, सोशल मीडियावर कोणताही आक्षेपार्ह किंवा कायद्याचे उल्लंघन करणारा मजकूर प्रसारित करण्यापूर्वी नागरिकांनी जबाबदारीने वागावे, अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागू शकते, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

## वारकऱ्यांनी पुण्यातच वारीमध्ये सहभागी व्हावे

**मुंबई**-इंद्रायणी नदीला मोठ्या प्रमाणात पूर आला असून आळंदी शहरात प्रवेश करणारे नदीवरील चारही पूल पाण्याखाली गेले आहेत. त्यामुळे सध्या आळंदी शहरात येणे सुरक्षित नाही. ज्या वारकरी व भाविकांनी आळंदीच्या दिशेने प्रवास सुरू केला आहे, त्यांनी ज्या ठिकाणी आहात, त्या ठिकाणीच सुरक्षित थांबावे.देहू व आळंदी येथे न जाता पुणे शहरात वारीमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, प्रशासन, पोलीस यंत्रणा व आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच नदीपात्र, घाट परिसर व बंद करण्यात आलेल्या पुलांकडे जाणे टाळावे. आपल्या सुरक्षिततेसाठी प्रशासन आवश्यक ती सर्व उपाययोजना करत आहे. सर्वांनी संयम बाळगून प्रशासनाला सहकार्य करावे.



# रेड क्रॉसतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव व आमसभा

**आर्वी/जनमाध्यम**
इंडियन रेड क्रॉस सोसायटी, आर्वी शाखेच्या वतीने दहावी व बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ तसेच शाखेची प्रथम आमसभा उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांनी गुणवत्तेत सातत्याने वाढ करत आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजहितासाठी करावा, असे प्रतिपादन पीएमश्री नगरपालिका हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य विश्वंभर पायले यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र इंडियन रेड क्रॉस सोसायटीचे सदस्य व हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अरुण पावडे होते. प्रमुख अतिथी म्हणून नगराध्यक्षा स्वाती गुल्हाने, उपाध्यक्ष गौरव जाजू, सोमेश्वर साठवणे, रेड क्रॉसचे उपाध्यक्ष राजा तेलरांधे, सचिव डॉ. अभिलाष धरमठोक व कोषाध्यक्ष रवी शहा उपस्थित होते.

यावेळी बारावी विज्ञान शाखेत वर्धा जिल्ह्यात प्रथम आलेली हुतात्मा राष्ट्रीय कनिष्ठ महाविद्यालय, आष्टीची विद्यार्थिनी मिसबा नियाजी फातिमा हिच्यासह आर्वी शहरातील विविध शाळांतील दहावी-बारावीतील गुणवंत विद्यार्थी आणि रेड क्रॉस सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच आर्वी तालुक्यात विज्ञान शाखेत प्रथम आलेल्या विद्यार्थ्याला स्व. ज्ञानेश्वराव होले स्मृतिप्रीत्यर्थ डॉ. भूषण होले यांच्या हस्ते रोख पारितोषिक व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. डॉ. अरुण पावडे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या कर्तृत्वाच्या बळावर समाज, गाव व कुटुंबाचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अभिलाष धरमठोक यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. दर्शन चांभारे व प्रा. अभय दर्भे यांनी, तर आभार प्रवीण शिरपूरकर यांनी मानले. कार्यक्रमानंतर रेड क्रॉस सोसायटी, आर्वी शाखेची प्रथम आमसभा पार पडली.

## क्रीडा प्रतिभा केंद्राकरीता प्रशिक्षकांसाठी अर्ज आमंत्रित

**वर्धा**-क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत मिशन लक्ष्यवेध योजना राबविण्यात येत आहे. योजनेंतर्गत जिल्हा क्रीडा संकुल येथे क्रीडा प्रतिभा केंद्र स्थापन करण्यात येत आहे. या केंद्रस्तरावरील ॲथलेटिक्स व शुटींग या खेळासाठी प्रशिक्षकांची निवड करण्यात येणार आहे. यासाठी इच्छुक पात्र खेळाडूंनी १० जुलैपर्यंत अर्ज सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

अर्जदार खेळाडू मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी प्राप्त केलेला असावा. बीपीएड, एमपीएड, क्रीडा विज्ञानातील पदवीधारकास प्राधान्य राहील. एनएसएनआयएस, डिप्लोमा इन कोचींग ॲथलेटिक्स ॲन्ड शुटींग किंवा समतुल्य अभ्यासक्रम पुर्ण केलेले किंवा समतुल्य अभ्यासक्रम पुर्ण केलेले किंवा जागतिक ॲथलेटीक्स संघटनेचा अभ्यासक्रम पुर्ण केलेले किंवा सहा आठवड्याचा एनएसएनआयएस सर्टीफिकेट कोर्स उत्तीर्ण केलेला असावा. किमान राज्यस्तरावर १ वर्षाचा प्रशिक्षणाचा अनुभव असावा. राज्य, राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धासाठी खेळाडूंना प्रशिक्षण देणारे किंवा युवा खेळाडूंसोबत काम करण्याचा अनुभव असलेल्या प्रशिक्षकास प्राधान्य देण्यात येईल. अर्जदाराचे वय २१ ते ४५ वर्ष असावे. मराठी अनिवार्य असेल. इंग्रजी भाषेला प्राधान्य देण्यात येईल. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्य स्तरावरील पदकप्राप्त असावा. प्रगती नोंदी, अहवाल तयार करणे व डेटा संकलनाकरीता मुलभुत संगणक प्राविण्य तसेच वैद्यकीय फीटनेस प्रमाणपत्र आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.


## जाहीरनामा

ज्याअर्थी, विधि व न्याय विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांची दिनांक ११/०८/२०२३ ची अधिसूचना अन्वये जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार, ज्या जन्म व मृत्यूच्या नोंदणीबाबत १ वर्षापेक्षा अधिक कालावधीने सूचना प्राप्त होते, अशा प्रकरणात नोंदी घेण्यासाठी कार्यकारी दंडाधिकारी, ज्यांना जिल्हा दंडाधिकारी यांनी प्राधिकृत केले आहे, अशा कार्यक्षेत्रासाठी ज्या ठिकाणी अशा व्यक्तीचा जन्म व मृत्यू झाला आहे, त्याबाबतच्या अचूकतेबाबत खात्री करुन विलंब शुल्क आकारुन अशा नोंदी घेण्याबाबत आदेशित करण्याची सुधारीत तरतूद करण्यात आली आहे. जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ मधील कलम १७ व महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम, २००० मधील नियम १३ (३) नुसार जन्म-मृत्यू घटना नोंदणी संदर्भातील निबंधक, जन्म व मृत्यू यांनी अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यासंबंधी तरतूद करण्यात आली आहे. तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक : जमृनों २५२५/ई.ऑ.९९११८१) प्र.क्र.२२/कु.क. दिनांक १२ मार्च, २०२५ मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ व सुधारणा अधिनियम, २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म-मृत्यु नोंदीबाबतची कार्यपध्दती निश्चित केली आहे.

ज्याअर्थी, सुमित्रा गोपाळराव सावरकर, रा. रसुलाबाद ता. आर्वी जि. वर्धा यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, रसुलाबाद येथे उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या मृत्यू नोंदीचे अनुपलब्धता प्रमाणपत्र, रहीवासाचे पुरावे, मालमत्तेचे पुरावे, ओळखीबाबतचे पुरावे व कौटुंबिक पुराव्यासह ग्राम विकास अधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक, ग्रामपंचायत कार्यालय, रसुलाबाद ता. आर्वी जि. वर्धा यांनी या कार्यालयास प्रस्ताव सादर केला आहे.

त्याअर्थी, सुमित्रा गोपाळराव सावरकर, रा. रसुलाबाद ता.आर्वी जि. वर्धा यांच्या विलंबाने मृत्युच्या नोंदीबाबत कोणाचे काही आक्षेप / हरकती असल्यास त्या सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत (विहीत मुदतीत) कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व वेळी लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. विहीत मुदतीनंतर आक्षेप / हरकतींचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

स्वा.
(हरीश काळे)
तहसिलदार आर्वी


# स्मार्ट मीटरबाबतचे गैरसमज दूर करण्यासाठी आज ग्राहक मेळावे, तक्रारींचे जागेवरच निराकरण

**वर्धा/जनमाध्यम**
महावितरणच्या नागपूर परिमंडळांतर्गत स्मार्ट (ToD) मीटरबाबत वीज ग्राहकांमध्ये पसरलेले गैरसमज दूर करण्यासाठी आणि मीटर संदर्भातील तक्रारींचे तत्काळ निराकरण करण्यासाठी बुधवार ८ जुलै रोजी उपविभागनिहाय ग्राहक मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. मागील काही दिवसांपासून समाज माध्यमांवर (सोशल मिडिया) स्मार्ट मीटरच्या कार्यपद्धतीबाबत काही चुकीची माहिती आणि अफवा पसरवल्या जात आहेत. या संदर्भात ग्राहकांनी कोणताही संभ्रम न ठेवता, अधिकृत माहितीसाठी या मेळाव्यांना उपस्थित राहावे, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

महावितरणचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी दिलेल्या माहितीनुसार, स्मार्ट (ToD) मीटर हे पूर्णतः तांत्रिकदृष्ट्या अचूक असून ते सामान्य वीज ग्राहकांसाठी अत्यंत फायदेशीर आहेत. हे मीटर ग्राहकांना दिवसा सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत वीज वापरावर प्रति युनिट ८५ पैशांची सवलत मिळवून देत आहेत. मात्र, सोशल मिडियावर काही व्यक्तींकडून हेतुपुरस्सर दिशाभूल करणारी माहिती प्रसारित केली जात आहे, ज्याचा उद्देश ग्राहकांमध्ये भीती निर्माण करणे हाच आहे. वास्तव पाहता, औद्योगिक ग्राहकांकडे अनेक वर्षांपासून अशा प्रकारच्या मीटरचा यशस्वी वापर सुरू आहे. त्यामुळे ग्राहकांनी अशा अफवांवर विश्वास न ठेवता महावितरणच्या अधिकृत सूत्रांवर विश्वास ठेवावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

वर्धा जिल्ह्याअंतर्गत वर्धा विभागातील सेलु उपविभाग (विकास चौक), बस स्टँड (सिंधी रेल्वे), देवळी उपविभाग (वायगाव, सोनेगाव), वर्धा शहर उपविभाग (सुहास हॉस्पिटल, ठाकरे मार्केट), वर्धा ग्रामीण-१ (कस्तुरबा चौक-सेवाग्राम, बोरगाव ग्रामपंचायत), वर्धा ग्रामीण-२ (उमरी, येळकेळी).

हिंगणघाट विभागातील हिंगणघाट शहर उपविभाग (कारंजा चौक, बस स्टँड चौक, नंदोरी चौक), हिंगणघाट ग्रामीण उपविभाग (अजंती गाव, जांब




ग्रामपंचायत) तर आर्वी विभागातील आर्वी उपविभाग (एसटी बसस्थानक), एसटी बसस्थानक रोहणा. आष्टी उपविभाग: आष्टी शहर (आष्टी नगरपंचायत चौक), साहूर शाखा (माणिकवाडा व्हिलेज बस स्टॉप चौक).कारंजा उपविभाग: कारंजा (जयस्तंभ चौक), येनगाव (ज्वालादेवी मंदिर). खरांगणा उपविभाग: खरांगणा बस स्टॉप, पिंपळखुटा बस स्टॉप. पुलगाव उपविभाग: पुलगाव बस स्टँड, नाचणगाव नाका चौक या ठिकाणी सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत हे मेळावे पार पडणार आहेत. या मेळाव्यांना संबंधित उपविभाग प्रमुख व तांत्रिक कर्मचारी उपस्थित राहून ग्राहकांच्या मनात असलेल्या शंकांचे निरसन करणार आहेत. स्मार्ट मीटरमुळे वीजबिल वाढल्याच्या तक्रारींची यादिकाणीच तांत्रिक तपासणी करून त्यावर योग्य ती कार्यवाही केली जाणार आहे. या उपक्रमामुळे ग्राहकांना थेट अधिकाऱ्यांशी संवाद साधण्याची संधी उपलब्ध होणार असून, त्यातून पारदर्शकता वाढण्यास मदत होणार आहे

स्मार्ट मीटरचे फायदे समजल्यानंतर परिमंडळातील हजारो ग्राहकांनी स्वेच्छेने हे मीटर बसविण्यासाठी अर्ज केले आहेत. या ग्राहकांना 'महा ऊर्जा मित्र' मोबाईल ॲपवर आपल्या वीज वापराचा रिअल-टाइम तपशील पाहता येत असल्याने, त्यांना वीज वापर नियंत्रित करून बिलात बचत करणे शक्य झाले आहे. आतापर्यंत नागपूर परिमंडळात एकूण ७ लाख ५१ हजार ६८२ स्मार्ट (ToD) मीटर बसविण्यात आले आहेत, ज्यात नागपूर जिल्ह्यातील ६ लाख १ हजार ८६२ आणि वर्धा जिल्ह्यातील १ लाख ४९ हजार ८२० मीटरचा समावेश आहे. हे सर्व ग्राहक आता सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत वापरलेल्या वीजेवर ८५ पैसे प्रति युनिट सवलतीचा लाभ घेत आहेत.

मेळाव्या व्यतिरिक्तही, स्मार्ट मीटरच्या अचूकतेबाबत किंवा वाढीव वीजबिलांबाबत कोणालाही काही शंका असल्यास, त्यांनी महावितरणच्या www.mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा महावितरण मोबाईल ॲपचा वापर करावा. याव्यतिरिक्त १९१२,१९१२०, १८००-२१२-३४३५ किंवा १८००-२३४-३५ या २४ तास उपलब्ध असलेल्या टोल फ्री क्रमांकांवर संपर्क साधून तक्रार नोंदवण्याचे आवाहन महावितरणने केले आहे. अफवांना थारा न देता ग्राहकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असेही महावितरणने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २२१
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालय- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# महावितरण अमरावती परिमंडळाच्या मुख्य अभियंतापदी दिलीप दोडके रुजू

## ग्राहकाभिमुख सेवा, पायाभूत सुविधा व दर्जेदार वीजपुरवठ्यावर भर

**अमरावती :** महावितरणच्या अमरावती परिमंडळाच्या मुख्य अभियंतापदी दिलीप दोडके हे रुजू झाले आहे. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी तत्काळ अमरावती शहर विभागाचा आढावा घेत वीजपुरवठा, प्रलंबित कामे, तांत्रिक सुविधा आणि ग्राहकसेवा यासंदर्भात अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. परिमंडळातील प्रलंबित विकासकामे वेळेत पूर्ण करणे, वीज वितरण यंत्रणा अधिक सक्षम करणे, ग्राहकांना दर्जेदार व अखंडित वीजपुरवठा उपलब्ध करून देणे आणि तक्रारींचे जलद निराकरण करणे यावर विशेष भर राहणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.



महावितरणचे मुख्य अभियंता अशोक साळुंके यांची मुख्य कार्यालयात बदली झाल्यानंतर हे पद रिक्त झाले होते. त्यांच्या जागी दोडके यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मुळ नागपूरचे असलेले दोडके यांनी येथील व्ही.आर.सी.ई. (आताचे व्हीएनआयटी) येथून अभियांत्रिकी पदवी पूर्ण केल्यानंतर सन १९९९ मध्ये तत्कालीन महाराष्ट्र राज्य वीज मंडळात (एमएसईबी) सहाय्यक अभियंता म्हणून चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर येथे त्यांनी सेवेला सुरुवात केली.

त्यानंतर उपकार्यकारी अभियंता, कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता तसेच मुख्य अभियंता या विविध पदांवर त्यांनी यशस्वीपणे काम केले आहे. अकोला, भांडूप, नागपूर, मुंबई तसेच विविध क्षेत्रीय, प्रादेशिक आणि मुख्य कार्यालयातील जबाबदाऱ्या सांभाळत त्यांनी तब्बल २६ वर्षांचा समृद्ध प्रशासकीय व तांत्रिक अनुभव मिळविला आहे.

## युवक बेपत्ता



**खल्लार/प्रतिनिधी:-** खल्लार नजिकच्या रामगाव येथील विशाल भिमदास घरडे हा ३५ वर्षीय युवक घरुन बाहेर जातो असे सांगून एक महिन्यापासून बेपत्ता आहे.

विशाल घरडे हा व त्याचे म्हातारे आई वडील हे शेती काम करुन कुटूंबाचा उदरनिर्वाह करीत असून मुलगा एक महिन्यापासून बेपत्ता झाल्याने म्हातारे आई वडील चिंताग्रस्त झाले आहेत.

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**जाहीरनामा/सायटेशन**

किरकोळ अर्ज क्र.१३०३/२०२६
**सविता व इतर विरुध्द निरंक**
पुढील ता.१८.०८.२०२६

अर्जदार :
1. Savita Motiramji Devakar
Age 62 Yrs. Occu.: Household
2. Vinod Motiramji Devakar
Age 41 Yrs. Occu.: Labour
Both R/o. Shukravar Bazar, Juni Vasti Badnera, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत मोतीराज आत्मारामजी देवकर** हे दिनांक १४.०६.२०१६ रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सविता व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सविता व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०३.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,
अमरावती

## CHANGE IN NAME

**Name -**
SHOEB KHAN JAMEEL KHAN
**Old Date Of Birth-**
15/09/1997
**New Date Of Birth-**
30/10/196
**Address-**
Quasab Pura, Chandur Bazar, Ta. Chandur Bazar, Dist.Amravati 444704

## फ्लॅट विकणे आहे

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.

**संपर्क:**
९४२२८५७१६९, ९४२२९१८५६९

## CHANGE IN NAME

**Name-**
Shaikh Malik Shaikh Mahmood
**Old Name-**
Sk. Malik Sk. Mahmood
**New Name-**
Shaikh Malik Shaikh Mahmood
**Address-**
Quasab Pura, Chandur Bazar, Tq. Chandur Bazar, Dist. Amravati - 44704

## CHANGE IN NAME

**(Given name) -**
Mohammad Farhan Mohammad Mushtaque
**Old name) TO**
Mohammad Farhan Mohammad Mustaque
**(New Name)**
I will be known by my new name Mohammad Farhan Mohammad Mustaque for all purpose in future

**Adress -** Quasab pura, chandur Bazar, TQ Chandur Bazar, Amravati rural 444704 Maharashtra India

## शेत विक्रीबाबत जाहीर सुचना

**श्री रामचंद्र संस्थान शिराळा,** ता. जि. अमरावती, र.नं. अे.५७०/ अमरावती या न्यासाच्या मालकीची ताब्यात असलेली शेत जमीन विक्री करावयाची आहे.

**मिळकतीचे वर्णन:-**

**१) मौजे शिराळा, ता.जि.अमरावती येथील सर्व्हे नं.१७३, (गट नं.१७३) भोगवट वर्ग १. एकूण क्षेत्रफळ ० हेक्टर ८९ आर, आकार रूपये ५.९०,** ही शेती विक्री करावयाची आहे भाग २.

लेखी मागणी दिनांक ०२/०८/२०२६ रोजी पर्यंत खालील पत्त्यावर पाठवावी. आलेल्या सर्व निविदा त्याच दिवशी सकाळी ११.०० वाजता पंचासमोर उघडण्यात येईल. निविदा / मागणी पाठविणाऱ्यांची सभेला उपस्थिती आवश्यक राहील. मंजूर निविदेप्रमाणे २५ टक्के विसार करावा लागेल.

मा.जॉईंट चॅरीटी कमिश्नर साहेबांची परवानगी मिळाल्यावर खरेदी देण्यात येईल. खरेदीचा खर्च घेणाऱ्यालाच करावा लागेल. मा.जॉईंट चॅरीटी कमिश्नर यांनी परवानगी नाकारल्यास किंवा अन्य जास्त किंमत देणाऱ्या व्यक्तीस परवानगी दिल्यास अमानत / विसार बिनव्याजी परत करण्यात येईल.

**दिनांक : ०६/०७/२०२६**

अध्यक्ष
(श्री मनोज निळकंठराव देशमुख)
श्री रामचंद्र संस्थान शिराळा ता.जि.अमरावती.
र.नं.ओ-५७०/अमरावती

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहितीकरीता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिध्द करण्यात येते की,
**मिळकतीचे वर्णन -** जिल्हा अमरावती, ता.अंजनगांव सुजी, मौजे लोहराजपूर येथील भूमापन गट नं.८८ याचे एकुण क्षेत्र ०० हे.८४ आर यापैकी लिहून देणार **१) पुष्पा सुरेश जोशी** यांचे मालकीचे क्षेत्र ०० हे.८४ आर ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरीता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देऊन आमचे अशिलांना सदर मिळकत भाडेपट्टा/योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल कलेले आहे. तसेच सदर नोटीस प्रसारित करणेसाठी संमती पत्र लिहून दिले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसा हक्क, इजमेंट, शेजाऱ्यांची वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कूळ, ॲक्विजिशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वादद, कोर्ट डिकी इ.संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असल्यास किंवा हरकत असल्यास तक्रार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येऊन हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आल्यास ती सदर मिळकतीवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.
अमरावती
दिनांक ०८.०७.२०२६

उपरोक्त अशिलातर्फे
**ॲडव्होकेट के.डी.शिराळे,**
पत्ता- ऑफिस नं.डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२
शाहू ब्लड बॅंकेजवळ, कोल्हापूर,
संपर्क क्र.०२३१-२६६८८४७

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.४०८/२०२६ ने.ता.१७.०८.२०२६

**अर्जदार -**
१. श्रीमती मोनाली प्रविण तुळे, वय ३७ वर्षे, धंदा - घरकाम
२. कु.धनश्री प्रविण तुळे, वय १७ वर्षे, धंदा - शिक्षण
३. कार्तिक प्रविण तुळे, वय १४ वर्षे, धंदा - शिक्षण
नं.२ व ३ ची अ.पा.क.आई अर्जदार नं.१
४. पद्मा ज्ञानेश्वर तुळे, वय ६६ वर्षे, धंदा - घरकाम
सर्व रा.बऱ्हाणपूर, पो.रिध्दपूर, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरध्द --

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ व ३ यांचे वडील व अर्जदार नं.४ चा मुलगा **नामे प्रविण ज्ञानेश्वरराव तुळे** हे दि.०८.०२.२०२६ रोजी **एल**.जी.आय.हॉस्पीटल, नागपूर, ता.जि.नागपूर येथे मयत झाले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०२.०७.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार, अमरावती यांचे कार्यालय**
जन्म/मृत्यू बाबत जाहीरनामा
रा.मा.क./एम.आर.सी.-८१/वलगांव/१७१/२०२५-२०२६

अर्जदार - श्री.नाजेमा बानो पूर खॉं, रा.वलगांव, ता.जि.अमरावती

-- **विरुध्द** --

गैरअर्जदार - निबंधक जन्म/मृत्यू ग्रामपंचायत कार्यालय, वलगांव, ता.जि.अमरावती

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, अर्जदार हे वरील पत्त्यावर कायम रहिवासी आहे. अर्जदार **श्री.नाजेमा बानो नूर खॉं,** रा.वलगांव, ता.जि.अमरावती यांचा जन्म दिनांक २१.०९.१९९३ रोजी त्यांच्या राहत्या घरी वलगांव येथे जन्म झाला. निबंधक जन्म मृत्यू ग्रामपंचायत वलगांव येथे जन्माची नोंद घेतली नाही. अर्जदाराला उपरोक्त जन्म प्रमाणपत्राची गरज असल्यामुळे जन्माची नोंद महानगरपालिका अधिनियम १९६९ मधील कलम १३(३) व त्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी नियम २००० मधील नियम ९(३) नुसार जन्माच्या नोदणीचा आदेश होण्याबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास सदर कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार, अमरावती येथील दाखल अर्जातील श्री नाजेमा बानो नूर खॉं, रा.वलगांव, ता.जि.अमरावती यांचा जन्म दिनांक ०६.०७.१९८४ रोजी त्यांच्या राहत्या घरी वलगांव येथे जन्म झाला. त्यांच्या जन्माच्या दिनांकास किंवा त्याबाबत हरकत असल्यस दिनांक ०३.०७.२०२६ पर्यंत स्वतः किंवा आपल्या वकीलामार्फत येऊन हरकत न घेतल्यास सदरहू अर्जदार यांची साक्ष घेवून जन्म नोंद सदर कार्यालयात घेण्याचा आदेश किंवा तसे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक .०६.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

शिक्का

**तहसीलदार तथा करीता,**
**तालुका दंडाधिकारी,**
**अमरावती**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहितीकरीता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिध्द करण्यात येते की,
**मिळकतीचे वर्णन -** जिल्हा अमरावती, ता.अंजनगांव सुजी, मौजे मुऱ्हा बु. येथील भूमापन गट नं.८१ याचे एकुण क्षेत्र ५ हे.३१ आर यापैकी लिहून देणार **१) संतोष हरिभाऊ कावरे** यांचे मालकीचे क्षेत्र ०१ हे.०३ आर ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरीता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देऊन आमचे अशिलांना सदर मिळकत भाडेपट्टा/योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल कलेले आहे. तसेच सदर नोटीस प्रसारित करणेसाठी संमती पत्र लिहून दिले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसा हक्क, इजमेंट, शेजाऱ्यांची वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कूळ, ॲक्विजिशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वादद, कोर्ट डिकी इ.संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असल्यास किंवा हरकत असल्यास तक्रार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येऊन हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आल्यास ती सदर मिळकतीवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.
अमरावती
दिनांक ०१.०७.२०२६

उपरोक्त अशिलातर्फे
**ॲडव्होकेट के.डी.शिराळे,**
पत्ता- ऑफिस नं.डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२
शाहू ब्लड बॅंकेजवळ, कोल्हापूर,
संपर्क क्र.०२३१-२६६८८४७

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार, अमरावती यांचे कार्यालय**
जन्म/मृत्यू बाबत जाहीरनामा
रा.मा.क./एम.आर.सी.-८१/वलगांव/१७०/२०२५-२०२६

अर्जदार - श्री.शेख शाहीद शेख वजीर, रा.वलगांव, ता.जि.अमरावती

-- **विरुध्द** --

गैरअर्जदार - निबंधक जन्म/मृत्यू ग्रामपंचायत कार्यालय, वलगांव, ता.जि.अमरावती

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, अर्जदार हे वरील पत्त्यावर कायम रहिवासी आहे. अर्जदार **श्री.शेख शाहीद शेख वजीर**, रा.वलगांव, ता.जि.अमरावती यांचा जन्म दिनांक **०६.०७.१९८४** रोजी त्यांच्या राहत्या घरी जन्म झाला. निबंधक जन्म मृत्यू ग्रामपंचायत वलगांव येथे जन्माची नोंद घेतली नाही. अर्जदाराला उपरोक्त जन्म प्रमाणपत्राची गरज असल्यामुळे जन्माची नोंद महानगरपालिका अधिनियम १९६९ मधील कलम १३(३) व त्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी नियम २००० मधील नियम ९(३) नुसार जन्माच्या नोदणीचा आदेश होण्याबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास सदर कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार, अमरावती येथील दाखल अर्जातील श्री नाजेमा बानो नूर खॉं, रा.वलगांव, ता.जि.अमरावती यांचा जन्म दिनांक ०६.०७.१९८४ रोजी त्यांच्या राहत्या घरी वलगांव येथे जन्म झाला. त्यांच्या जन्माच्या दिनांकास किंवा त्याबाबत हरकत असल्यस दिनांक ०३.०७.२०२६ पर्यंत स्वतः किंवा आपल्या वकीलामार्फत येऊन हरकत न घेतल्यास सदरहू अर्जदार यांची साक्ष घेवून जन्म नोंद सदर कार्यालयात घेण्याचा आदेश किंवा तसे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक .०६.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

शिक्का

**तहसीलदार तथा करीता,**
**तालुका दंडाधिकारी,**
**अमरावती**

## WANTED

Asmita Shikshan Mandal, Amravati
**Mahatma Jyotiba Fule Mahavidyalaya,**
College Road, Parvati Nagar, Amravati-444605
Phone No.0721-2512526
**NAAC Grade 'A'**

**WALK-IN-INTERVIEW**

Application are invited for Clock hour basis on following posts for the session 2026-27.

| Faculty | Subject | No.of CHB Post | Minimum Qualification |
|---|---|---|---|
| ARTS (Per.Non Grant) | M.A.Sociology<br>M.A.Political Sci.<br>M.A.Psychology & Counselling.<br>E.V.S. | 01<br>01<br>02<br>01 | M.A.- 55%<br>M.A.- 55%<br>M.A.- 55%<br>M.Sc.(Env.Sci.) |
| COMMERCE (Per.Non Grant) | B.Com./ M.Com.<br>English<br>Marathi | 05<br>01<br>01 | M.Com.- 55%<br>M.A.- 55%<br>M.A.- 55% |
| COMPUTER SCIENCE (Per.Non Grant) | B.C.A., M.Sc. | 04 | M.Sc. (Computer Sci./ Computer Soft-ware) or M.C.A.- 55% |

Eligible Candidate should attend walk in interview along with an application on plain paper supported by attested true copies of qualification on **Wednesday, dt.15.07.2026 at 9.30 a.m.** in the college.

**Prof.Dr.Mukul M.Bhonde,**
**Secretary**
**Asmita Shikshan Mandal**
**Amravati.**

**Dr.Meenal Thakare Bhonde,**
**Principal**
**Mahatma Jyotiba Fule Mahavidyalaya**
**Amravati.**

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.३६८/२०२६ ने.ता.२२.०७.२०२६

**अर्जदार -**
१. श्री.तुषार गुरुदेवराव भुयार, वय ३५ वर्षे, धंदा - शेती
रा.चिखलसावंगी, ता.मोर्शी, जि.अमरावती
२. श्रीमती राजश्री अजयराव धोटे, वय ३७ वर्षे, धंदा - घरकाम
रा.हैदतपूर, ता.जि.अमरावती

-- विरध्द --

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार यांचे वडील **नामे गुरुदेव नारायणराव भूयार** हे दि.**२९.०२.२००८** रोजी **चिखलसावंगी**, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झाले आहेत. तसेच अर्जदाराची आई नामे **पद्मा गुरुदेव भुयार** ही दि.**०४.०१.१९९५** रोजी डिस्ट्रीक्ट हॉस्पीटल, अमरावती, ता.जि.अमरावती येथे मरण पावलेली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २४.०६.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहितीकरीता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिध्द करण्यात येते की,
**मिळकतीचे वर्णन -** जिल्हा अमरावती, ता.अंजनगांव सुजी, मौजे मुऱ्हा बु. येथील भूमापन गट नं.२३९ याचे एकुण क्षेत्र ०२ हे.४० आर यापैकी लिहून देणार **१) सुधीर भगवंतराव काळे** यांचे मालकीचे क्षेत्र ०० हे.८१ आर ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरीता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देऊन आमचे अशिलांना सदर मिळकत भाडेपट्टा/योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल कलेले आहे. तसेच सदर नोटीस प्रसारित करणेसाठी संमती पत्र लिहून दिले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसा हक्क, इजमेंट, शेजाऱ्यांची वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कूळ, ॲक्विजिशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वादद, कोर्ट डिकी इ.संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असल्यास किंवा हरकत असल्यास तक्रार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येऊन हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आल्यास ती सदर मिळकतीवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.
अमरावती
दिनांक ०८.०७.२०२६

उपरोक्त अशिलातर्फे
**ॲडव्होकेट के.डी.शिराळे,**
पत्ता- ऑफिस नं.डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२
शाहू ब्लड बॅंकेजवळ, कोल्हापूर,
संपर्क क्र.०२३१-२६६८८४७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहितीकरीता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिध्द करण्यात येते की,
**मिळकतीचे वर्णन -** जिल्हा अमरावती, ता.अंजनगांव सुजी, मौजे लोहराजपूर येथील भूमापन गट नं.१०६ याचे एकुण क्षेत्र ०१ हे.६२ आर यापैकी लिहून देणार **१) शुभम अरुण नवले,** यांचे मालकीचे क्षेत्र ०० हे.८१ आर ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरीता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देऊन आमचे अशिलांना सदर मिळकत भाडेपट्टा/योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल कलेले आहे. तसेच सदर नोटीस प्रसारित करणेसाठी संमती पत्र लिहून दिले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसा हक्क, इजमेंट, शेजाऱ्यांची वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कूळ, ॲक्विजिशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वादद, कोर्ट डिकी इ.संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असल्यास किंवा हरकत असल्यास तक्रार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येऊन हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आल्यास ती सदर मिळकतीवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.
अमरावती
दिनांक ०८.०७.२०२६

उपरोक्त अशिलातर्फे
**ॲडव्होकेट के.डी.शिराळे,**
पत्ता- ऑफिस नं.डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२
शाहू ब्लड बॅंकेजवळ, कोल्हापूर,
संपर्क क्र.०२३१-२६६८८४७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहितीकरीता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिध्द करण्यात येते की,
**मिळकतीचे वर्णन -** जिल्हा अमरावती, ता.अंजनगांव सुजी, मौजे मुऱ्हा बु. येथील भूमापन गट नं.१२३ याचे एकुण क्षेत्र ०४ हे.५३ आर यापैकी लिहून देणार **१) सुनंदा रविंद्र पांडे** यांचे मालकीचे क्षेत्र ०० हे.५१ आर ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरीता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देऊन आमचे अशिलांना सदर मिळकत भाडेपट्टा/योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल कलेले आहे. तसेच सदर नोटीस प्रसारित करणेसाठी संमती पत्र लिहून दिले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसा हक्क, इजमेंट, शेजाऱ्यांची वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कूळ, ॲक्विजिशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वादद, कोर्ट डिकी इ.संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असल्यास किंवा हरकत असल्यास तक्रार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येऊन हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आल्यास ती सदर मिळकतीवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.
अमरावती
दिनांक ०८.०७.२०२६

उपरोक्त अशिलातर्फे
**ॲडव्होकेट के.डी.शिराळे,**
पत्ता- ऑफिस नं.डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२
शाहू ब्लड बॅंकेजवळ, कोल्हापूर,
संपर्क क्र.०२३१-२६६८८४७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहितीकरीता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिध्द करण्यात येते की,
**मिळकतीचे वर्णन -** जिल्हा अमरावती, ता.अंजनगांव सुजी, मौजे मुऱ्हा खु. येथील भूमापन गट नं.१२४ याचे एकुण क्षेत्र ०१ हे.०५ आर यापैकी लिहून देणार **१) दिनेश बाळकृष्ण बोंदरे** यांचे मालकीचे क्षेत्र ०१ हे.०५ आर ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरीता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देऊन आमचे अशिलांना सदर मिळकत भाडेपट्टा/योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल कलेले आहे. तसेच सदर नोटीस प्रसारित करणेसाठी संमती पत्र लिहून दिले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसा हक्क, इजमेंट, शेजाऱ्यांची वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कूळ, ॲक्विजिशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वादद, कोर्ट डिकी इ.संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असल्यास किंवा हरकत असल्यास तक्रार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येऊन हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आल्यास ती सदर मिळकतीवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.
अमरावती
दिनांक ०८.०७.२०२६

उपरोक्त अशिलातर्फे
**ॲडव्होकेट के.डी.शिराळे,**
पत्ता- ऑफिस नं.डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२
शाहू ब्लड बॅंकेजवळ, कोल्हापूर,
संपर्क क्र.०२३१-२६६८८४७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहितीकरीता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिध्द करण्यात येते की,
**मिळकतीचे वर्णन -** जिल्हा अमरावती, ता.अंजनगांव सुजी, मौजे मुऱ्हा खु. येथील भूमापन गट नं.१३७ याचे एकुण क्षेत्र ०४ हे.१५ आर यापैकी लिहून देणार **१) दिपाली उमेशराव बारब्दे** यांचे मालकीचे क्षेत्र ०० हे.९७ आर ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरीता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देऊन आमचे अशिलांना सदर मिळकत भाडेपट्टा/योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल कलेले आहे. तसेच सदर नोटीस प्रसारित करणेसाठी संमती पत्र लिहून दिले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसा हक्क, इजमेंट, शेजाऱ्यांची वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कूळ, ॲक्विजिशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वादद, कोर्ट डिकी इ.संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असल्यास किंवा हरकत असल्यास तक्रार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येऊन हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आल्यास ती सदर मिळकतीवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.
अमरावती
दिनांक ०८.०७.२०२६

उपरोक्त अशिलातर्फे
**ॲडव्होकेट के.डी.शिराळे,**
पत्ता- ऑफिस नं.डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२
शाहू ब्लड बॅंकेजवळ, कोल्हापूर,
संपर्क क्र.०२३१-२६६८८४७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहितीकरीता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिध्द करण्यात येते की,
**मिळकतीचे वर्णन -** जिल्हा अमरावती, ता.अंजनगांव सुजी, मौजे मुऱ्हा खु. येथील भूमापन गट नं.१३१ याचे एकुण क्षेत्र ०१ हे.६२ आर यापैकी लिहून देणार **१) प्रकाश रामकृष्ण नवले** यांचे मालकीचे क्षेत्र ०० हे.८१ आर ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरीता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देऊन आमचे अशिलांना सदर मिळकत भाडेपट्टा/योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल कलेले आहे. तसेच सदर नोटीस प्रसारित करणेसाठी संमती पत्र लिहून दिले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसा हक्क, इजमेंट, शेजाऱ्यांची वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कूळ, ॲक्विजिशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वादद, कोर्ट डिकी इ.संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असल्यास किंवा हरकत असल्यास तक्रार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येऊन हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आल्यास ती सदर मिळकतीवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.
अमरावती
दिनांक ०८.०७.२०२६

उपरोक्त अशिलातर्फे
**ॲडव्होकेट के.डी.शिराळे,**
पत्ता- ऑफिस नं.डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२
शाहू ब्लड बॅंकेजवळ, कोल्हापूर,
संपर्क क्र.०२३१-२६६८८४७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहितीकरीता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिध्द करण्यात येते की,
**मिळकतीचे वर्णन -** जिल्हा अमरावती, ता.अंजनगांव सुजी, मौजे मुऱ्हा बु. येथील भूमापन गट नं.१२९ याचे एकुण क्षेत्र ०२ हे.३२ आर यापैकी लिहून देणार **१) गजानन रामेश्वर पखान, २) दिलीप रामेश्वर पखान** यांचे मालकीचे क्षेत्र ०२ हे.३२ आर ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरीता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देऊन आमचे अशिलांना सदर मिळकत भाडेपट्टा/योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल कलेले आहे. तसेच सदर नोटीस प्रसारित करणेसाठी संमती पत्र लिहून दिले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसा हक्क, इजमेंट, शेजाऱ्यांची वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कूळ, ॲक्विजिशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वादद, कोर्ट डिकी इ.संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असल्यास किंवा हरकत असल्यास तक्रार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येऊन हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आल्यास ती सदर मिळकतीवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.
अमरावती
दिनांक ०८.०७.२०२६

उपरोक्त अशिलातर्फे
**ॲडव्होकेट के.डी.शिराळे,**
पत्ता- ऑफिस नं.डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२
शाहू ब्लड बॅंकेजवळ, कोल्हापूर,
संपर्क क्र.०२३१-२६६८८४७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहितीकरीता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिध्द करण्यात येते की,
**मिळकतीचे वर्णन -** जिल्हा अमरावती, ता.अंजनगांव सुजी, मौजे मुऱ्हा बु. येथील भूमापन गट नं.१२७ याचे एकुण क्षेत्र ०२ हे.३९ आर यापैकी लिहून देणार **१) श्रीकांत रामेश्वर ताथोड** यांचे मालकीचे क्षेत्र ०२ हे.३९ आर ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरीता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देऊन आमचे अशिलांना सदर मिळकत भाडेपट्टा/योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल कलेले आहे. तसेच सदर नोटीस प्रसारित करणेसाठी संमती पत्र लिहून दिले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसा हक्क, इजमेंट, शेजाऱ्यांची वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कूळ, ॲक्विजिशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वादद, कोर्ट डिकी इ.संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असल्यास किंवा हरकत असल्यास तक्रार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येऊन हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आल्यास ती सदर मिळकतीवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.
अमरावती
दिनांक ०८.०७.२०२६

उपरोक्त अशिलातर्फे
**ॲडव्होकेट के.डी.शिराळे,**
पत्ता- ऑफिस नं.डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२
शाहू ब्लड बॅंकेजवळ, कोल्हापूर,
संपर्क क्र.०२३१-२६६८८४७

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३००**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त



### कापूस,तुर,सोयाबीन पेरणीला प्रारंभ

**शिराळा-**परिसरातील पेरणीला वेग आला असून साठ सत्तर टक्के पेरण्या झाल्या असल्याचा अंदाज आहे.मात्र सोयाबीन कडे शेतकऱ्यांनी पाठ फिरवल्यामुळे पेरा कमी झाला आहे.सोयाबीन मागील वर्षी पाहिजे तसे झाले नाही. शिवाय भाव पण मिळाला नाही त्यामुळे शेतकऱ्यांनी सोयाबीन कमी करुन कापुन पेरा अधिक केला आहे.दोन दिवसांपासून पाऊस थांबला असल्यामुळे शेतकऱ्यांच्या मनात धाकधूक सुरू आहे.तुर सोयाबीन व कापूस पेरणी मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. शिराळा परिसरातील देवरा,देवरी, अंतोरा, ब्राम्हणवाडा भगत, पुसदा, नांदुरा बु,यावली शहिद येथे पेरणी अधिक प्रमाणात झाली आहे. शिराळा येथील पांदण रस्ते झाल्यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.



### महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयामध्ये वृक्षारोपण

**अमरावती-**स्थानिक अस्मिता शिक्षण मंडळ द्वारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे नुकतेच वनमहोत्स अंतर्गत महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मीनल भोंडे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. वातावरणामुळे तापमानात होणारी वाढ, पाणीटंचाई, जैव विविधतेचा ऱ्हास,वायू प्रदूषण, यासारख्या गंभीर समस्या निर्माण होत असून त्याचा प्रतिकूल परिणाम कृषी क्षेत्रावर होत आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने नुकताच वन महोत्सव साजरा करण्याची घोषणा केली. वृक्ष रोपण करून राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत हा वनमहोत्सव साजरा करण्याचे आवाहन शासनाकडून करण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयाच्या परिसरात प्राचार्य डॉ. मीनल भोंडे यांच्या हस्ते आणि उपस्थितीत सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले. यात बदाम,आंबा,सप्तपर्णी, कडुलिंब, आवळा अश्या वृक्षांचा समावेश करण्यात आला.कार्यक्रमाचे आयोजन आणि संचालन प्रा. डॉ. गजानन काळे रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. बबीता येवले महिला रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी मानले.



### मूकबधिर विद्यालयात साहित्य वाटप

**चांदूररेल्वे -** तालुका व शहर शिवसेनेच्या वतीने दिव्यांग कैवारी, शिवसेना नेते आमदार बच्चू ऊर्फ ओमप्रकाश कडू यांच्या वाढदिवसानिमित्त शहरातील मूकबधिर शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य,पेन, पेन्सिल,नोट बुक व मुलांना बिस्कीट नास्ता वाटप करून आमदार बच्चू कडू यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजेश पांडे,शहर प्रमुख गोलू यादव, श्रीकांत शिंदे फाउंडेशनचे जिल्हा अध्यक्ष गोपी यादव,आकाशचौधरी, भैय्या डोंगरे,अजय माहुलकर,रोहित पवार,ओम शेलार,तुषार खोडके सह असंख्य शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कॉंग्रेसनगरातून दुचाकी लंपास

**अमरावती -** फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कॉंग्रेसनगरातून अज्ञात चोराने घरासमोरून दुचाकी लंपास केली. ही घटना सोमवार, ६ जुलै रोजी उघडकीस आली. वैष्णवी गजानन शेळके (२५), रा. टेंभुर्णी, चांदूर रेल्वे, यांनी घरासमोर एमएच २७ ईडी ६२०१ या क्रमांकाची दुचाकी उभी केली होती. दुसऱ्या दिवशी त्यांना दुचाकी दिसली नाही. त्यामुळे त्यांनी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### ४५ हजारांची दुचाकी चोरी

**दर्यापूर -** रोजी दर्यापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तुळजापूर शिवारातील शेताजवळ अज्ञात चोरान दुचाकी चोरी केली.ही घटना सोमवार, ६ जुलै रोजी उघडकीस आली. अविनाष गजानन अज्ञात वानखडे वय २९ वर्ष रा भंडारज अंजनगाव सुर्जी जि अमरावती ता. तुळजापूर शिवारातील शेताजवळ उभी केलेली एमएच-२७-बीपी-७५२४ क्रमांकाची सुमार ४५ हजार किंमतीची मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिसांकडून तपास सुरू आहे.

## विनोद पांढरे यांचे निधन

**अंजनगाव सुर्जी -** शहरातील काठीपुरा येथील रहिवासी स्व. श्री. विनोद मोतीसा पांढरे यांचे वयाच्या ६० वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले. ते ६ जुलै, मंगळवार रोजी काळाच्या पडद्याआड गेले. त्यांच्या निधनाने काठीपुरा परिसरासह संपूर्ण अंजनगाव सुर्जी शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.मंगळवार,६ जुलै रोजी दुपारी स्व. विनोद पांढरे यांची अंत्ययात्रा काठीपुरा येथील त्यांच्या राहत्या घरून निघाली. नातेवाईक, मित्रमंडळी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने अंत्ययात्रेत सहभागी झाले होते. शहरातील हिंदू स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.स्व. विनोद पांढरे यांच्या पश्चात दोन मुले पवन पांढरे व आनंद पांढरे असा परिवार आहे.पांढरे कुटुंबियांच्या दुःखात अंजनगाव सुर्जी शहर सहभागी आहे. ईश्वर मृतात्म्यास शांती देवो व कुटुंबियांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो, हीच प्रार्थना.



# खाकीची बॉर्डर ॲक्शन सीमेवर आता ‘नो एन्ट्री’ गुन्हेगारीला लागणार ब्रेक

### महाराष्ट्र-एमपी पोलिसांचा गुन्हेगारीविरोधात ‘मास्टर प्लॅन’ ची आंतरराज्य समन्वय बैठक

**अचलपूर/वार्ताहर**

महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश या दोन्ही राज्यांच्या सीमांवरून होणारी गुन्हेगारी, अमली पदार्थाची तस्करी आणि फरार आरोपींना चाप लावण्यासाठी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची एक महत्त्वाची आंतरराज्य समन्वय बैठक परतवाडा येथील शासकीय विश्रामगृहात पार पडली. अमरावती ग्रामीण पोलिस दलाकडून या बैठकीचे आयोजन केले होते. सीमा भागात खाकीचा कडक बंदोबस्त आणि कारवायांचा संयुक्त धडाका उडवून देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला. या बैठकीत प्रामुख्याने सीमावर्ती भागातील कायदा व सुव्यवस्था, गुन्हे प्रतिबंध, सराईत व फरार गुन्हेगारांबाबत माहितीची देवाणघेवाण, अमली पदार्थांची तस्करी, अवैध शस्त्रांची वाहतूक,



गोवंश वाहतूक, दारूबंदी आणि इतर अवैध धंद्यांवर संयुक्त कारवाई यावर सविस्तर चर्चा झाली. यासोबतच वाहन चोरी, सायबर गुन्हे, मानव तस्करी, वन्यजीव गुन्ह्यांसंदर्भात परस्पर समन्वय वाढवून प्रभावी उपाययोजना राबविण्याचा निर्णय दोन्ही राज्यांच्या पोलिस दलांनी घेतला. या बैठकीला महाराष्ट्राकडून अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. महेश अमरावती पाटील, ग्रामीणचे पोलिस अधीक्षक निकेतन कदम, अतिरिक्त पोलिस अधीक्षक दत्ता तोटेवाड, धारणीचे उपविभागीय पोलिस अधिकारी माधव गरुड, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अशोक लांडे व सीमावर्ती पोलिस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी उपस्थित होते. तर मध्य प्रदेशकडून नर्मदापुरम परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक मिथिलेश कुमार शुक्ला, बैतुलचे पोलिस अधीक्षक वीरेंद्र कुमार जैन, पांढूर्ना चे पोलिस अधीक्षक प्रकाशसिंह परिहार, बऱ्हाणपूरचे अतिरिक्त पोलिस अधीक्षक प्रदीप शेंडे यांच्यासह बैतूल, बऱ्हाणपूर, खंडवा व पांढुर्णा जिल्ह्यांतील सीमावर्ती पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी उपस्थितीत होते.

> या समन्वय बैठकीमुळे दोन्ही राज्यांतील पोलिस यंत्रणेमधील परस्पर सहकार्य अधिक दृढ होऊन सीमा भागातील गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवणे आणि नागरिकांची सुरक्षा अधिक बळकट करणे शक्य होईल.
>
> -निकेतन कदम,
> पोलिस अधीक्षक

# धामणगाव विधानसभा मतदार यादीचे पुनरिक्षण मोहीम सुरू

### गृहभेटी दरम्यान बीएलओंना सहकार्य करून अचूक माहिती द्यावी

**चांदूररेल्वे/वार्ताहर**

धामणगाव विधानसभा मतदारसंघात सध्या मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण २०२६ चा कार्यक्रम वेगाने सुरू आहे.या मोहिमेअंतर्गत ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत बीएलओ (मतदार केंद्र अधिकारी) घरोघरी जाऊन प्रत्यक्ष गृहभेटी देत आहेत. या गृहभेटी दरम्यान नागरिकांनी बीएलओला आवश्यक व अचूक ती माहिती द्यावी, जेणेकरून कुठलाही मतदार मतदानापासून वंचित राहणार नाही.

या विशेष मोहिमेबाबत माहिती देताना २००२ च्या मतदार यादीत असलेल्या नावाशी नवीन मतदार जोडण्याचे आणि यादी अद्ययावत करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असल्याचे निवडणूक विभागाने सांगितले. या संदर्भात चांदूररेल्वे उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी (३६ धामणगाव विधानसभा मतदारसंघ ) उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरे,तहसीलदार पूजा माटोडे, नायब तहसीलदार अजय बनारसे यांनी मतदारांना प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

पारदर्शकता आणि अचूकतेवर भर-या गृहभेटींचा मुख्य उद्देश मतदार यादी संपूर्णपणे अचूक आणि दोषमुक्त करणे हा आहे. या मोहिमेमुळे मतदारसंघातील एकही पात्र नागरिक मतदानाच्या हक्कापासून वंचित राहणार नाही, तसेच कोणत्याही अपात्र व्यक्तीचे नाव मतदार यादीत समाविष्ट होणार नाही, याची विशेष काळजी घेतली जात असल्याचे प्रशासनातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

नागरिकांना आवाहन- आपल्या घरी येणाऱ्या बीएलओ अधिकारांना योग्य कागदपत्रे व माहिती देऊन सहकार्य करावे, जेणेकरून एकही पात्र मतदार नोंदणीविना राहणार नाही.

> कोणताही पात्र मतदार वंचित राहणार नाही याकरिता मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण (SIR)२०२६
> १. voters.eci.gov.in/ ECINET App वर आपला किंवा आई-वडिलांचा तपशील शोधून ठेवा.
> २. आवश्यकतेनुसार तुमचे अलीकडील छायाचित्र अपडेट करा.
> २. तपशील नसल्यास ECI नमूद खालीलपैकी कोणतेही एक कागदपत्र तयार ठेवा.
> ३) भरलेल्या गणना अर्जावर स्वाक्षरी करून एक प्रत ँध्द ला या व एक प्रत स्वतः जवळ ठेवा.



## राज्यपालांच्या हस्ते पत्रकार हेमंत निखाडे कृषी पुरस्काराने सन्मानित

**अमरावती/का.प्र.**

राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने देण्यात येणारा अमरावती विभागाचा स्व.वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार तिवसा तालुक्यातील गुरुकुंज मोझरी येथील पत्रकार हेमंत किसनराव निखाडे यांना मुंबई येथील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम येथे महामहिम राज्यपाल जिष्णू देव वर्मा व मान्यवरांच्या हस्ते सपत्नीक प्रदान करून गौरव करण्यात आला.



हेमंत निखाडे हे गेल्या २१ वर्षांपासून सर्वांगीण विषयावर पत्रकारिता करत आहे. त्यामध्ये कृषी पत्रकारिता हा महत्वाचा भाग आहे.१५ वर्षात त्यांनी कृषी क्षेत्रात विविध विषयांवर वृत्तपत्राच्या माध्यमातून कृषी संदर्भात लेख,यशस्वी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन यशोगाथा लिहणे,` लिखाण करून पुढाकार घेणे,विकसित शेतीसाठी प्रेरणादायी अश्या बाबी, नाविन्यपूर्ण प्रयोग, शासनाच्या विविध योजनेची व्यापक जनजागृती, उल्लेखनीय कार्य आदी कृषी क्षेत्राशी निगडित बाबींवर केलेल्या लिखाणाची शासनाने २०२३ साठी मागविलेल्या पुरस्कारासाठी दखल घेऊन हेमंत निखाडे यांना कृषी विभागातील अतिशय प्रतिष्ठेचा वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार घोषित करून मुंबई येथे दिमाखदार सोहळ्यात राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते हेमंत निखाडे यांना सपत्नीक मानचिन्ह,प्रशस्तीपत्र,साडी-चोळी,गिफ्ट व रोख रक्कम देऊन सन्मानित केले.यावेळी व्यासपीठावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे,मृद व जलसंधारण मंत्री इंद्रजिल नाईक, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल,रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री भरतसेठ गोगावले, कृषी आयुक्त सुरज मांढरे आदी मान्यवर उपस्थित होते.

### पीडीएमसी महाविद्यालय व रुग्णालयात प्रथमच

# ऑटोमेटेड इम्प्लांटेबल कार्डिओव्हर्टर डिफिब्रिलेटर (AICD) यशस्वीरीत्या प्रत्यारोपित

**अमरावती/का.प्र.**

डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अमरावती येथे प्रथमच ऑटोमेटेड इम्प्लांटेबल कार्डिओव्हर्टर डिफिब्रिलेटर (AICD) चे यशस्वी प्रत्यारोपण करण्यात आले. ही अत्याधुनिक व जीवनरक्षक शस्त्रक्रिया प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PM-JAY) अंतर्गत पूर्णतः यशस्वीरीत्या पार पडली.

ही प्रक्रिया ४७ वर्षीय पुरुष रुग्णावर करण्यात आली. ते डायलेटेड कार्डिओमायोपॅथी (Dilated Cardiomyopathy) या आजाराने ग्रस्त होते. त्यांच्या हृदयाची पंपिंग क्षमता (Left Ventricular Ejection Fraction - LVEF) केवळ २२ टक्के होती. अलीकडेच त्यांना व्हेंट्रिक्युलर टॅकीकार्डिया (Ventricular Tachycardia - VT) चा गंभीर झटका आला होता, ज्यामुळे त्यांच्या जीवाला तात्काळ धोका निर्माण झाला. आपत्कालीन परिस्थितीत बाह्य डिफिब्रिलेटर (External DC Shock) च्या सहाय्याने त्यांच्या हृदयाचे ठोके पुन्हा सुरळीत करण्यात आले. त्यानंतर करण्यात आलेल्या वैद्यकीय तपासणीत भविष्यात पुन्हा जीवघेणा हृदयाच्या ठोक्यांचा विकार होण्याची शक्यता अत्यंत जास्त असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे आंतरराष्ट्रीय उपचार मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांच्यामध्ये ऑटोमेटेड इम्प्लांटेबल कार्डिओव्हर्टर डिफिब्रिलेटर (AICD) प्रत्यारोपित करण्यात आला, ज्यामुळे भविष्यात होणाऱ्या अचानक हृदयविकारामुळे मृत्यूचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होतो.

AICD म्हणजे काय? AICD हे एक लहान, अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक उपकरण असून ते त्वचेखाली प्रत्यारोपित केले जाते. त्याची लीड (तार) हृदयामध्ये बसविली जाते. हे उपकरण दिवस-रात्र सतत हृदयाच्या ठोक्यांवर लक्ष ठेवते.जर हृदयात व्हेंट्रिक्युलर टॅकीकार्डिया (VT) किंवा व्हेंट्रिक्युलर फिब्रिलेशन (VF) सारखी धोकादायक व अनियमित हृदयगती निर्माण झाली, तर AICD काही सेकंदांत ती ओळखून आवश्यकतेनुसार विद्युत धक्का (Life-saving Shock) देतो आणि हृदयाचे ठोके पुन्हा सामान्य स्थितीत



आणतो. त्यामुळे रुग्णाला अचानक होणाऱ्या हृदयविकारामुळे मृत्यूपासून संरक्षण मिळते.

कोणत्या रुग्णांना AICD ची आवश्यकता असते?तज्ज्ञांच्या मते पुढील रुग्णांमध्ये AICD प्रत्यारोपणाचा विचार केला जातो.ज्या रुग्णांची हृदयाची पंपिंग क्षमता (LVEF) ३५ टक्के किंवा त्यापेक्षा कमी आहे.डायलेटेड कार्डिओमायोपॅथी किंवा इस्केमिक कार्डिओमायोपॅथी असलेले रुग्ण.ज्यांना यापूर्वी व्हेंट्रिक्युलर टॅकीकार्डिया (VT) किंवा व्हेंट्रिक्युलर फिब्रिलेशन (VF) झाला आहे.

ज्यांना कार्डिॲक अरेस्ट (Cardiac Arrest) मधून वाचविण्यात आले आहे.

भविष्यात अचानक हृदयविकारामुळे मृत्यूचा धोका जास्त असलेले रुग्ण.वेळेवर उपचार घेतल्यास जीव वाचू शकतो भारतात दरवर्षी हजारो रुग्णांचा मृत्यू अचानक हृदयविकारामुळे होतो. यापैकी अनेक रुग्णांचे प्राण AICD सारख्या आधुनिक उपकरणामुळे वाचू शकतात. त्यामुळे ज्या रुग्णांची हृदयाची पंपिंग क्षमता कमी आहे किंवा ज्यांना वारंवार बेशुद्ध पडणे, हृदयाचे ठोके वेगाने धावणे अथवा VT सारखी समस्या उद्भवली असेल, त्यांनी हृदयरोगतज्ज्ञांचा सल्ला घेऊन AICD ची आवश्यकता तपासून घ्यावी ही जटिल व जीवनरक्षक प्रक्रिया डॉ. नीरज राघानी, वरिष्ठ इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट यांनी आणि डॉ. पुष्पेंद्र साहू, वरिष्ठ कॅथ लॅब तंत्रज्ञ अश्विन नरगडे, सहाय्यक कॅथ लॅब तंत्रज्ञ चेतन गुर्जर, प्रतीक विरुळकर व आनंद मोरे यांच्या सहकार्याने यशस्वीरीत्या पूर्ण केली.या प्रसंगी मेडिसिन विभागाच्या विभागप्रमुख डॉ. शुभांगी वर्मा, डॉ. अजय डफळे, हृदयरोगतज्ज्ञ डॉ. निलेश चांडक तसेच कार्डिओलॉजी व मेडिसिन विभागातील सर्व वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदान लाभले.या यशस्वी कामगिरीसाठी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. ए. टी. देशमुख यांच्या मार्गदर्शनाबद्दल व सातत्यपूर्ण प्रोत्साहनाबद्दल विशेष आभार व्यक्त करण्यात आले.

ही उपलब्धी केवळ वैद्यकीय क्षेत्रातील एक महत्त्वाचा टप्पा नसून, अमरावतीमध्येच अत्याधुनिक हृदयरोग उपचार व AICD प्रत्यारोपण सुविधा उपलब्ध झाल्याचे द्योतक आहे. तसेच प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PM-JAY) अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांनाही या महागड्या व जीवनरक्षक उपचाराचा लाभ घेता येणार आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, संस्थेचे पदाधिकारी व सदस्य, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, डॉ. पवन टेकाडे, डॉ. सोमेश्वर निर्मळ आणि डॉ. स्वप्नील मोहोड यांनी संपूर्ण तज्ञ चमूचे अभिनंदन केले.तसेच गरजू रुग्णांनी या अत्याधुनिक जीवनरक्षक सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

### संत गुलाब बाबा जन्मदिनानिमित्त सोहळा

# गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव व शालेय साहित्य वाटप

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील टाकरखेडा मोरे येथील राजश्री प्रतिष्ठानच्या वतीने श्री संत गुलाब बाबा यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.‘ज्ञानदान हेच श्रेष्ठ दान’ हा संदेश देत या कार्यक्रमात गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले, तसेच दहावी आणि बारावीच्या परीक्षेत उज्ज्वल यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा जाहीर गुणगौरव करण्यात आला. हा सोहळा स्थानिक शिव मंगल कार्यालय, टाकरखेडा मोरे येथे पडला.



या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी गट शिक्षण अधिकारी शरद कान्हेरेकर हे होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य कलावंत, समाजसेविका अपूर्वा सोनार, व वर्षा भुयार, अनुराधा भुस्कट, रसिका उमक, सीमा मोरे, ओमप्रकाश मुरतकर, ज्ञानेश्वरराव खलोकार,मनोज मेळे उपस्थित होते.तसेच जयेंद्र गाडगे, मोहन वरोकार, गजानन उमक, ज्ञानेश्वरराव बेले, तुषार हाडोळे, गोपाल उमक आणि मोहनजी वाहूरवाघ या मान्यवरांची देखील सोहळ्याला प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात श्री संत गुलाब बाबा व थोर पुरुषांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली तसेच दहावी आणि बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवून गावाचे नाव रोशन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते मेडल आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या यशस्वी कार्यक्रमाचे आयोजन राजश्री प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष मंगेश सोनार, मित्र परिवार व समस्त टाकरखेडा मोरे ग्रामस्थांनी केले.तर प्रास्ताविक विलास धर्माळे यांनी केले सूत्रसंचालन उत्तमराव सोनटक्के व आभार प्रदर्शन मंगेश सोनार संस्थापक अध्यक्ष राजश्री प्रतिष्ठान यांनी केले होते. कार्यक्रमाला परिसरातील विद्यार्थी, पालक, शिक्षकवृंद आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बसस्थानक परिसरात अवैध दारूविक्री

### आठवडी बाजाराच्या दिवशी दारूचा महापूर, कारवाईची मागणी

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

येथील बसस्थानक परिसरात खुलेआम अवैध दारूविक्री सुरू असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. विशेष म्हणजे, ग्रामपंचायत कार्यालय, शाळा,दवाखाना,आणि बसस्थानक या परिसरातच हा प्रकार सुरू असल्याने पालक आणि नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, दारूसोबत पिण्यासाठी पाणी व ग्लासचीही व्यवस्था केली जात असून दिवसभर बिनधास्तपणे विक्री सुरू असल्याचे सांगितले जात आहे. यापूर्वी पोलिसांनी काही वेळा कारवाई केल्याचेही नागरिक सांगतात. मात्र, काही वेळातच पुन्हा दारूविक्री सुरू होत असल्याने कारवाईचा अपेक्षित परिणाम होत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे. सध्या शाळा सुरू झाल्यामुळे विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात या परिसरात वर्दळ असते. अशा ठिकाणी अवैध दारूविक्रीमुळे विद्यार्थ्यांवर विपरीत परिणाम होण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. तर मंगळवारी आठवडी बाजाराच्या दिवशी खुले आम विक्री केली जात आहे. या प्रकरणाची अधिकारी व संबंधित प्रशासनाने सखोल चौकशी करावी. अवैध दारूविक्री सुरू असल्याचे आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करून शाळा व सार्वजनिक परिसर दारूमुक्त करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# गाजीपूरच्या स्टोन क्रशरवर प्रक्रिया होणारे खनिज येते कुठून?

## दोन आदिवासी जमिनी, ४८ कोटींचा दंड, सीलिंग कारवाई, दुसरा नवा क्रशर आणि प्रशासनाच्या मौनाने वाढले संशयाचे धुके

### -ट्रान्झिट पास, रॉयल्टी, खनिज खरेदी करार आणि स्टॉक रजिस्टरची संयुक्त चौकशी होणार का?




**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला** : एखादा स्टोन क्रशर सुरू आहे की बंद, हा प्रश्न महत्त्वाचा असतो; पण त्याहीपेक्षा मोठा प्रश्न म्हणजे त्या क्रशरवर प्रक्रिया होणारे खनिज नेमके कुठून येते? कारण याच प्रश्नाचे उत्तर मिळाले, तर गौण खनिजाच्या संपूर्ण व्यवहाराचे वास्तव उघड होऊ शकते. अकोट तालुक्यातील गाजीपूर येथील मे. साई स्टोन क्रशर आणि मे. बालाजी स्टोन क्रशर या दोन उद्योगांच्या संदर्भात नेमका हाच प्रश्न आता चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. कारण उपलब्ध माहितीनुसार या दोन्ही ठिकाणी मोठ्या प्रमाणात गौण खनिजावर प्रक्रिया होत असल्याचे सांगितले जाते; मात्र त्या खनिजाचा अधिकृत स्रोत, खनिज खरेदीचे करार, ट्रान्झिट पास, रॉयल्टी आणि स्टॉक नोंदी याबाबत अधिकृत खुलासा झालेला नाही.

गौण खनिजासंदर्भातील लागू नियमांनुसार, कोणत्याही स्टोन क्रशरवर प्रक्रिया होणारे खनिज हे वैध खाणपट्टाधारकाकडूनच खरेदी केलेले असणे आवश्यक आहे. प्रत्येक वाहनासोबत वैध ट्रान्झिट पास (ई-रॉयल्टी) असणे बंधनकारक असते. याशिवाय क्रशरवर स्टॉक रजिस्टर, वजन काट्याच्या नोंदी, आवक-जावक नोंदवही आणि रॉयल्टीची माहिती अद्ययावत ठेवणे अपेक्षित असते.

त्यामुळे काही मूलभूत प्रश्न निर्माण होत असून त्यामध्ये संबंधित क्रशरचा कोणत्या अधिकृत खदानधारकाशी करार आहे? खनिज कोणत्या खाणीतून आणले जाते? प्रत्येक वाहनासोबत ट्रान्झिट पास असतो का? प्रत्यक्ष साठा आणि स्टॉक रजिस्टर जुळते का? महसूल व भूविज्ञान विभागाने अचानक तपासणी करून या नोंदी पडताळल्या आहेत का? या प्रश्नांची अधिकृत उत्तरे मिळालेली नाहीत.

एकंदरीतच, या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा एका प्रश्नात सामावलेला आहे तो म्हणजे क्रशरवर प्रक्रिया होणारे खनिज नेमके कुठून येते? या एका प्रश्नाचे दस्तऐवजाधारित उत्तर मिळाले, तर ट्रान्झिट पास, रॉयल्टी, स्टॉक रजिस्टर, खनिज खरेदी करार, महसुली दंड, सीलिंग कारवाई आणि प्रशासनाची भूमिका या सर्व बाबींवरील संशय मोठ्या प्रमाणात दूर होऊ शकतो. म्हणूनच जिल्हाधिकारी, महसूल विभाग, भूविज्ञान विभाग, प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि संबंधित यंत्रणांनी संयुक्त विशेष तपासणी करून संपूर्ण प्रकरणावरील अधिकृत भूमिका जाहीर करावी, अशी मागणी आता अधिक तीव्र झाली आहे.

#### ४८ कोटींचा दंड; पण वसुलीचे काय झाले?

या प्रकरणात संबंधित उद्योजक चांडक यांच्यावर आदिवासी खदान प्रकरणी सुमारे ४८ कोटी रुपयांचा महसुली दंड ठोठावण्यात आला आहे. त्यानंतर महसूल विभागाने या दंडाच्या वसुलीसाठी नेमकी कोणती कारवाई केली? किती रक्कम शासनाकडे जमा झाली? उर्वरित वसुलीसाठी कोणती पावले उचलण्यात आली? याबाबत अधिकृत माहिती सार्वजनिक झालेली नाही. जर दंड कायम असेल आणि वसुली अपूर्ण असेल, तर त्यामागील कारणे स्पष्ट करणे प्रशासनासाठी आवश्यक ठरते.

#### उच्च न्यायालयानंतर एसडीओंकडे अपील; प्रक्रियेचीही चौकशी होणार?

उपलब्ध माहितीनुसार, संबंधित उद्योजकाने दंडाला आव्हान देत न्यायालयीन दाद मागितली होती. त्यानंतर अकोटच्या एसडीओ कार्यालयात अपील दाखल करण्यात आले. अपील दाखल करताना लागू असलेल्या कायदेशीर अटींचे पालन झाले का? आवश्यक असल्यास पूर्वअनामत किंवा इतर अटी पूर्ण करण्यात आल्या होत्या का? या प्रक्रियेबाबतही स्वतंत्र पडताळणी व्हावी, अशी मागणी पुढे येत आहे.

#### आदिवासी जमिनींच्या वापराबाबतही प्रश्न

उपलब्ध माहितीनुसार, गट क्रमांक ३८ मधील आदिवासी शेतकरी विलास कालू चिमोटे यांच्या जमिनीवर २०१० मध्ये मे. साई स्टोन क्रशर सुरू करण्यात आल्याचे सांगितले जाते. तसेच शेजारील गट क्रमांक ३७ मधील आदिवासी शेतकरी अंबादास नागोराव पवार यांच्या जमिनीवर मे. बालाजी स्टोन क्रशर उभारण्यात आल्याची माहिती आहे. या दोन्ही प्रकरणांत आदिवासी जमिनीच्या वापरासंदर्भातील आवश्यक शासकीय मंजुरी, सक्षम प्राधिकाऱ्यांची परवानगी आणि लागू कायद्यांचे पालन झाले होते का, याचा खुलासा होणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.

#### मध्यरात्रीची कारवाई आणि त्यानंतरचे मौन

उपलब्ध माहितीनुसार, सन २०२३ मध्ये तत्कालीन जिल्हाधिकारी आणि तत्कालीन जिल्हा खाणीकर्म अधिकाऱ्यांनी मे. साई स्टोन क्रशरवर सील करण्याची कारवाई केली होती. यानंतर संबंधित उद्योजकाने सील उठविण्याची विनंती केल्याचे सांगितले जाते. मात्र, सील उठविण्याचा स्पष्ट आदेश उपलब्ध नसल्याचा दावा केला जात आहे. अशा परिस्थितीत प्रश्न उभा राहतो तो म्हणजे सील नेमके कोणाच्या आदेशाने उघडण्यात आले? या प्रश्नाचे उत्तर संबंधित प्रशासनाने अधिकृत नोंदींसह द्यावे, अशी मागणी होत आहे.

#### शेजारीच दुसरा क्रशर

गट क्रमांक ३७ मध्ये नव्याने उभारण्यात आल्याचे सांगितल्या जाणाऱ्या मे. बालाजी स्टोन क्रशरमुळे या प्रकरणातील प्रश्न आणखी गंभीर झाले आहेत. या उद्योगासाठी आवश्यक महसुली, पर्यावरणीय आणि इतर वैधानिक परवानग्या, तसेच प्रक्रिया होणाऱ्या खनिजाचा स्रोत याचीही चौकशी होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

# जुन्या वादात तरूणावर चाकूने जीवघेणा हल्ला

## एक आरोपी अटक,कवठा बहाळे गावातील घटना





**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा पोलीस ठाणे हद्दीतील कवठा बहाळे गावात जून्या वादातून तरूणावर चाकूने जीवघेणा हल्ला झाल्याची खळबळजनक घटना सोमवारी उशिरा रात्री समोर आली आहे. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या सुनील दादाराव लौदासे (वय ५०, कवठा बहाळे) यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणात पोलिसांनी काही तासातच आरोपी अविनाश अशोकराव मेश्राम (वय ३४,कवठा बहाळे) याला ताब्यात घेतले आहे तर दिनेश विनायक नाईक (वय ३०), अनिकेत रवी रामटेके (वय २९), शुभम दिवाकर (वय ३०, सर्व रा. कवठा बहाळे) हे फरार आहे. त्यांचा शोध घेतला जात आहे.

माहिती नुसार, कवठा बहाळे येथील सुनील लौदांसे (वय ५०) आणि गावातील अविनाश मेश्राम यांच्यात बऱ्याच दिवसांपासून वाद सुरू होता. याच वादातून आरोपी अविनाश मेश्राम यांनी इतर आरोपींसह मिळून सोमवारी सायंकाळी जेव्हा सुनील लौदासे ग्रामपंचायत चौकातील किराणा दुकानावर सामान आणायला गेले होते त्यावेळी आरोपी यांनी त्यांच्यावर टाउंटिंग केली. लौदासे यांनी आरोपींना हटकले असता त्यांनी त्यांच्याशी वाद करून त्यांच्या पोटात चाकूने वार केले. यात ते गंभीर जखमी झाले. घटनेनंतर स्थानिकांच्या मदतीने ☞(पान २ वर)

# नागरिकांना सेवा विहित कालावधीत द्याव्यात

## राज्य सेवा हक्क आयुक्त अरूण डोंगरे



**अमरावती/प्रतिनिधीः-**

नागरिकांना शासनाच्या सेवा विहित कालावधीत मिळाव्यात यासाठी सेवा हमी हक्क कायदा राज्यात लागू झालेला आहे. शासनच्या बहुतांश सेवा ऑनलाईन आणि या कायद्यामध्ये आणण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे या सेवा विहित कालावधीत देण्यात याव्यात, असे निर्देश राज्य सेवा हक्क आयुक्त अरूण डोंगरे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात सेवा हमी हक्क कायद्यातील अधिसूचित सेवांचा आढावा आज घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी आशिष येरेकर, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे आदी उपस्थित होते.

डोंगरे यांनी विभागनिहाय प्रत्येक सेवांचा आढावा घेतला. सध्या शाळा सुरू झालेल्या असल्यामुळे शैक्षणिक कागदपत्रांमध्ये जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला आदी कागदपत्रांसाठी मोठ्या प्रमाणावर अर्ज सादर केले जातात. त्यामुळे हे सर्व अर्ज डॅशबोर्डवर नोंदविण्यात यावेत. तसेच दिलेल्या कालावधीत अर्ज निकाली काढावेत. या डॅशबोर्डवर प्रत्येक अर्जाची नोंद होत असून निकाली काढण्याचा कालावधी दिसून येत असल्याने कार्यालय प्रमुखांनी यावर लक्ष ठेवावे.

जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांनी अधिनस्त कार्यालयांकडे प्रलंबित असलेल्या अर्जांचा आढावा घ्यावा. जिल्हा परिषदेत विभागाची स्वतंत्र ऑनलाईन अर्जाची यंत्रणा आहे. तरीही सेवा हमी हक्कच्या माध्यमातून आलेल्या अर्जावर तातडीने कार्यवाही करावी. याची नोंद पोर्टलवर☞(पान २ वर)

# नमुना गल्लीतील विद्यार्थिनींच्या खोलीत भीषण आग

## सिलेंडर सुरक्षित काढल्याने अनर्थ टळला



**अमरावती/प्रतिनिधीः-**

शहरातील नमुना गल्ली क्रमांक ५ परिसरात मंगळवारी सायंकाळी विद्यार्थिनी राहत असलेल्या भाड्याच्या खोलीत अचानक आग लागून मोठे नुकसान झाले. आगीची तीव्रता वाढत असताना खोलीतील एलपीजी गॅस सिलेंडरमुळे मोठ्या स्फोटाचा धोका निर्माण झाला होता. मात्र अग्निशमन दलाच्या तातडीच्या कारवाईमुळे संभाव्य मोठा अनर्थ टळला.

मिळालेल्या माहितीनुसार, काळे हॉस्पिटलजवळील विद्यार्थिनींच्या निवासस्थानी सायंकाळी सुमारे ६.५० वाजता आग लागल्याची माहिती अग्निशमन विभागाला प्राप्त झाली. त्यानंतर अग्निशमन अधीक्षक अजय पंधरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिफ्ट इन्चार्ज सुनील काकडे व त्यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी पोहोचल्यावर खोलीतून मोठ्या प्रमाणात धूर निघत असल्याचे दिसून आले. परिसरातील अरुंद रस्ता, वाढलेली उष्णता आणि धुरामुळे बचावकार्यात अडथळे निर्माण होत होते. तरीही अग्निशमन जवानांनी धाडसाने आत प्रवेश करून आगीवर नियंत्रण मिळविले. ☞(पान २ वर)

# बँकेतून पैसे काढणारे टार्गेट, टोळीचा पर्दाफाश

## एका आरोपीला अटक,अंजनगाव - परतवाडा पोलिसांची संयुक्त कारवाई



**अमरावती/प्रतिनिधीः-**

बँकेतून पैसे काढणाऱ्या नागरिकांना टार्गेट करून त्यांचे पैसे लंपास करणाऱ्या टोळीतील एका आरोपीला अंजनगाव आणि परतवाडा पोलिसांनी संयुक्त कारवाईत अटक केली आहे. त्याच्याकडून ९० हजार रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. बाबू ☞(पान २ वर)

#### पोलिसांचे नागरिकांना आवाहन

ग्रामीण पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की,बँकेतून मोठी रक्कम काढताना सोबत विश्वासू व्यक्तीला घ्या, रोख रक्कम सुरक्षित बॅगमध्ये ठेवा आणि लवकरात लवकर इच्छित ठिकाणी पोहोचा,अनोळखी व्यक्तीकडून कोणतीही मदत स्वीकारू नका,रक्कम किंवा दागिने वाहनाच्या डिक्कीत उघड्यावर ठेवू नका,संशयास्पद हालचाल दिसल्यास तात्काळ ११२ वर किंवा जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# ऑनलाइन चक्री जुगारावर गुन्हे शाखेची धाड; दोघे ताब्यात

## १४,३८० चा मुद्देमाल जप्त



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात सुरू असलेल्या ऑनलाइन चक्री जुगाराच्या अड्ड्यावर अमरावती शहर गुन्हे शाखेने धाड टाकून दोन जणांना ताब्यात घेतले असून, त्यांच्या ताब्यातून जुगारासाठी वापरण्यात येणारे साहित्य व रोख रक्कम असा एकूण १४,३८० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या निर्देशानुसार शहरातील ☞(पान २ वर)

# लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणारी तरुणी गरोदर

## नांदगाव पेठ पोलीस ठाणे हद्दीतील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-**

लिव्ह-इन रिलेशनशिप मध्ये राहणारी एक तरुणी गरोदर असल्याची घटना नांदगाव पेठ पोलीस ठाणे हद्दीत उघडकीस आली आहे. तिला उपचारासाठी जिल्हा स्त्री रुग्णालयात दाखल करण्यात आले असून तिने दिलेल्या बयानाच्या आधारे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

माहितीनुसार सध्या १८ वर्षीय पीडित युवती ८ महिन्यांची गर्भवती आहे. तिला ३ जुलै रोजी पोटदुखी झाल्याने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीत ☞(पान २ वर)

# नालसाबपुरात गोवंशाच्या हत्येचा व्हिडिओ व्हायरल

## खोलापुरी गेट पोलीस ठाण्यात पिता-पुत्राविरुद्ध गुन्हा दाखल



**अमरावती/प्रतिनिधीः-**

खोलापुरी गेट पोलीस ठाणे हद्दीतील नालसाबपुरा परिसरात गोवंशाची हत्या करून मांस कापतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने खळबळ उडाली आहे. ३ जुलै रोजी घडलेल्या☞(पान २ वर)

# मूर्तिकाराची ६.७० लाखांनी फसवणूक

## चांदूर बाजार पोलीस ठाण्यातंर्गत घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** चांदूर बाजार पोलीस ठाणे हद्दीतील शिरजगाव बंड येथील एका मूर्तिकाराला ऑनलाइन ६ लाख ७० हजाराने फसविण्यात आल्याची घटना समोर आली आहे. चांदूर बाजार पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. माहितीनुसार, शिरजगाव बंड येथील शिवनेरी नगर निवासी सुरज अशोकराव रोकडे (वय ३०) हे मूर्तिकार आहेत. २ जुलै रोजी त्यांच्या मोबाईलवर दोन मेसेज आले. त्यांच्या सेंट्रल बँक खात्यातून ६ लाख ७० हजार ५३२ रुपये काढण्यात आल्याचे कळवण्यात आले ☞(पान २ वर)

# बांबु गार्डन येथे अत्याधुनिक समर्पित प्रादेशिक वन्यजीव बचाव, उपचार व पुनर्वसन केंद्र स्थापन होणार

## -आ.संजय खोडके यांच्या लक्षवेधी सूचनेवरून वनमंत्री गणेश नाईक यांची घोषणा



**मुंबईः-** अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यामधील वनक्षेत्रातील वन्यजीवांचे वाढते अपघात तसेच वन्यतस्करांमार्फत वन्यजीवांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर उपाययोजना करण्याबाबत आ. संजय खोडके यांनी राज्यविधिमंडळात लक्षवेधी लावून धरली होती. त्यापार्श्वभूमीवर राज्यविधिमंडळाच्या वरिष्ठ सभागृहात बोलत असतांना राज्याचे वनमंत्री नामदार गणेश नाईक यांनी अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यातील वनक्षेत्रामधील वन्यजीवांचे प्राण वाचवण्यासाठी व त्यांच्यावर वेळेत यशस्वी उपचार करून पुनर्वसन करण्यासाठी अमरावतीच्या बांबु गार्डन येथे अत्याधुनिक समर्पित प्रादेशिक वन्यजीव बचाव, उपचार व पुनर्वसन केंद्र विकसित करण्याबाबत शासन ठोस पाऊल उचलणार असल्याची घोषणा घोषणा केली.

राज्यविधिमंडळापुढे सादर लक्षवेधीमध्ये आ. संजय खोडके यांनी अधोरेखित केले कि, अमरावती विभागातील संपूर्ण वनक्षेत्रात अपघातांमुळे किंवा मानव-वन्यजीव संघर्षामुळे जखमी होणाऱ्या वन्यजीवांवर ☞(पान २ वर)

# दुचाकी चोरीचा गुन्हा उघड, आरोपी ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-**

गुन्हे शाखा, अमरावती शहरच्या पथकाने दुचाकी चोरीच्या प्रकरणात एका आरोपीला ताब्यात घेत चोरीची होंडा कंपनीची दुचाकी जप्त केली आहे. जप्त वाहनाची किंमत सुमारे ५० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी शहरात अवैध धंदे आणि गुन्हेगारांवर लक्ष ठेवून पेट्रोलिंग करत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, लालखडी परिसरातील एक व्यक्ती चोरीची सिल्वर रंगाची होंडा दुचाकी वापरत आहे. माहितीच्या आधारे पोलिसांनी संबंधित व्यक्तीची चौकशी केली असता, त्याने सदर वाहन कर्जाच्या पैशांच्या व्यवहारातून आझाद नगर येथील एका व्यक्तीकडून मिळाल्याचे सांगितले.

तपासादर☞(पान २ वर)